एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

NAVAKAL

• मुंबई, मंगळवार २१ एप्रिल, २०२६ • वर्ष-१०४, अंक-४७, पाने-८, किंमत: ₹ ७

• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 47 Marathi - Daily - Mumbai, 21 April, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-

• संपादक- रोहित रमाकांत पांडे 24x7 : www.navakal.in Email- contact@navakal.in



नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!

navakal.in

बारशाच्या सोहळ्यात साक्षात 'स्वामी समर्थांची' एन्ट्री!

@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews


## थोडक्यात...

### भारतात डेंग्यूवरील पहिल्या लशीला मंजुरी

**नवी दिल्ली -** भारतात डेंग्यूवरील पहिली प्रतिबंधक लस 'क्युडेन्गा'ला नुकतीच औषध महानियंत्रकांनी अधिकृत मंजुरी दिली आहे. जपानच्या टाकेडा फार्मास्युटिकल्सने विकसित केलेली ही लस डेंग्यूच्या वाढत्या संकटावर मात करण्यासाठी एक मोठे पाऊल मानले जात आहे. ही लस ४ ते ६० वर्षे वयोगटातील लोकांसाठी सुरक्षित मानली गेली असून, त्यांनाच




परवानगी देण्यास मिळाली आहे. डेंग्यूच्या चारही प्रकारच्या विषाणूंपासून ही लस संरक्षण देते. या लसीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे, एखाद्या व्यक्तीला पूर्वी डेंग्यू झाला आहे की, नाही याची तपासणी न करता ही लस देता येते. ही लस तीन महिन्यांच्या अंतराने दोन डोसमध्ये दिली जाते. भारतात या लशीचे उत्पादन हैदराबादमधील बायोलॉजिकल ई. लिमिटेड करणार आहे. डेंगव्हॅक्सिया या जगातील पहिल्या डेंग्यू लशीला २०१५ मध्ये मेक्सिकोमध्ये मंजुरी मिळाली होती. परंतु ती फक्त ज्यांना आधी एकदा डेंग्यू झाला आहे, अशाच लोकांना दिली जाऊ शकते. जगातील पहिली सिंगल-डोस डेंग्यू लस बुटांटन-डीव्हीला ब्राझीलमध्ये गेल्या वर्षी मंजूर करण्यात आली आहे.

### ससूनमधील परिचारिका आजपासून बेमुदत संपावर

**पुणे -** राज्यातील प्रलंबित मागण्यांकडे सरकारने लक्ष द्यावे, यासाठी महाराष्ट्र गव्हर्नमेंट नर्सेस असोसिएशन आणि समन्वय समितीच्या वतीने उद्या २१ एप्रिलपासून बेमुदत संप पुकारण्यात आला आहे. या आंदोलनात ससून रुग्णालयातील परिचारिका सहभागी होणार असल्याने रुग्णसेवेवर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. परिचारिकांच्या प्रमुख मागण्यांमध्ये जुनी पेन्शन योजना लागू करणे, रिक्त पदे तातडीने भरणे, ट्यूटर पदोन्नती प्रक्रिया राबवणे, सेवानिवृत्तीचे वय ५८ वरून ६० वर्षे करणे यांचा समावेश आहे. या मागण्यांकडे वारंवार लक्ष वेधूनही समाधानकारक निर्णय न झाल्याने अखेर संपाचा मार्ग स्वीकारण्यात आल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे. ससून रुग्णालय हे पुणे आणि परिसरातील सर्वात मोठे शासकीय रुग्णालय असल्याने येथे दररोज मोठ्या संख्येने रुग्ण उपचारासाठी येतात. परिचारिका संपावर गेल्यास ओपीडी सेवा, रुग्णांची देखभाल आणि इतर आरोग्य सेवा विस्कळीत होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# 'नारीशक्ती'साठी १ कोटी सह्या! फडणवीसांची घोषणा

# माझ्याशी खुली चर्चा करा! आव्हान विरोधकांनी स्वीकारले

**नारीशक्ती वंदन विधेयक लोकसभेत दोन तृतीयांश बहुमताअभावी नामंजूर झाल्यानंतर विरोधकांवर महिला आरक्षणाच्या मार्गात अडथळा आणल्याचा आरोप करत भाजपाने आक्रमक होत त्यांना जाब विचारण्याची मोहीमच सुरू केली आहे. याचा भाग म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज महिला नेत्यांसह पत्रकार परिषद घेऊन महिला आरक्षण विधेयकावरून विरोधकांवर जोरदार हल्ला चढवला. उद्यापासून भाजपा या मुद्यावर रस्त्यावर उतरणार असून १ कोटी सह्या गोळा करीत विधेयक मंजूर होईपर्यंत लढा सुरू ठेवणार आहे.**



■ मुंबई

**संसदेत** एकजुटीने या विधेयकाला विरोध करून विरोधकांनी देशातील ७० कोटी महिलांचा विश्वासघात केल्याचा आरोप करत देवेंद्र फडणवीसांनी म्हटले की, मी विरोधकांना आज खुले आव्हान देतो की, माझ्या स्तरावरील कुठल्याही नेत्याने माझ्यासोबत महिला विधेयकासंदर्भात खुली चर्चा करावी. विधेयकात काय चूक आहे, ते सांगावे. मी हे आव्हान दिले असले तरी मला माहीत आहे की, विरोधक हे आव्हान स्वीकारणार नाहीत. विरोधकांना उघडे पाडण्यासाठी आम्ही १ कोटी महिलांच्या सह्या गोळा करू. त्यातून विरोधकांना जनमताची ताकद दाखवून देऊ. मात्र, फडणवीसांचे हे आव्हान राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या खा. सुप्रिया सुळे आणि काँग्रेसच्या खा. प्रणिती शिंदे, ॲड. असीम सरोदे, कार्यकर्ते विश्वंभर चौधरी आदींनी लगेचच स्वीकारले आणि त्यांना प्रत्युत्तर दिले की, आम्ही चर्चेला तयार आहोत. तुम्ही बोलवाल तिथे येऊ. त्यामुळे महिला आरक्षण विधेयकावरून राजकीय वातावरण तापलेले राहण्याची शक्यता आहे.

फडणवीस यांच्या पत्रकार परिषदेला शिंदे गटाचे नेत्या आणि विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे आणि ज्योती वाघमारे, राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या नेत्या आणि महिला बालकल्याण मंत्री आदिती तटकरे, भाजपा आमदार चित्रा वाघ, मुंबईच्या महापौर रितू तावडे उपस्थित होत्या. देवेंद्र फडणवीस म्हणाले की, १७ एप्रिल हा दिवस देशाच्या राजकीय व सामाजिक वाटचालीतील एक महत्त्वाचा ठरेल, अशी अपेक्षा होती. पण दुर्दैवाने काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, द्रमुक, उबाठा, शरद पवार गट, समाजवादी पार्टी आदी विरोधी पक्षांनी आपल्या महिलाविरोधी मानसिकतेचे प्रदर्शन करत या विधेयकाला आवश्यक दोन तृतियांश मते मिळू दिली नाहीत. ७० कोटी महिलांचा विश्वासघात केला. त्याहीपेक्षा वाईट म्हणजे या विधेयकाची हत्या केल्यानंतर आनंदोत्सव साजरा केला. पान ७ वर

### नारीशक्तीवरून महापालिकेत गोंधळ

नारीशक्ती विधेयक नामंजूर झाल्याच्या पार्श्वभूमीवर मुंबई महापालिकेच्या सभागृहात आज महायुतीच्या नगरसेवकांनी 'नारी के सन्मान में, महायुती मैदान में' अशा घोषणा देत आज मोठा गोंधळ झाला. यावेळी महायुतीच्या नगरसेवकांनी काळे कपडे परिधान करून विरोधकांचा निषेध नोंदवला. भाजपाचे गटनेते गणेश खणकर विरोधकांवर टीका करताना म्हणाले की, नारीशक्ती विधेयक प्रथम १९९६ मध्ये लोकसभेत मांडण्यात आले होते. त्यावेळी राष्ट्रीय जनता दल, समाजवादी पक्ष आणि काँग्रेस यांनी विविध कारणे देत त्याला विरोध केला. आता पुन्हा महिलांना सन्मानाने विधिमंडळात स्थान मिळावे, यासाठी सर्व तयारी करण्यात आली होती. तरीही विरोधकांनी कुटील राजकारण करून या विधेयकाला विरोध केला.

## निवृत्ती वेतन क्षेत्रातही आता १०० टक्के परकीय गुंतवणूक

**विमा क्षेत्राच्या धर्तीवर निवृत्ती वेतनाच्या क्षेत्रातही थेट परकीय गुंतवणुकीची मर्यादा ४९ टक्क्यांवरून १०० टक्क्यांपर्यंत वाढवण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. त्यासाठी निवृत्ती वेतन फंड नियामक आणि विकास प्राधिकरण (पीएफआरडीए) कायदा - २०१३ मध्ये सुधारणा करून नवीन विधेयक संसदेच्या आगामी अधिवेशनात मांडले जाण्याची शक्यता आहे. मात्र, या निर्णयामुळे परकीय गुंतवणुकीमुळे आपले निवृत्तीवेतन सुरक्षित राहील का, अशी काहीशी चिंताही निवृत्ती वेतन धारकांमध्ये पसरली आहे.**



■ नवी दिल्ली

**सध्या** विमा क्षेत्रात १०० टक्के एफडीआयला परवानगी देण्यात आली आहे. गेल्या वर्षी सरकारने विमा क्षेत्रातील एफडीआय मर्यादा ७४ टक्क्यांवरून १०० टक्क्यांपर्यंत वाढवण्यास मंजुरी दिली. त्यापूर्वी २०१५ मध्ये विमा कायद्यात सुधारणा करून ही मर्यादा ४९ टक्क्यांवरून ७४ टक्के करण्यात आली होती.

सध्या निवृत्ती वेतन क्षेत्रात केवळ ४९ टक्के एफडीआयला परवानगी आहे. प्रस्तावित दुरुस्ती विधेयकात राष्ट्रीय निवृत्ती वेतन न्यासाला (एनपीएस ट्रस्ट) पीएफआरडीएपासून वेगळे करण्याची तरतूद असण्याची शक्यता आहे. त्यामुळे एनपीएस ट्रस्टचे अधिकार आणि कर्तव्ये यापुढे चॅरिटेबल ट्रस्ट किंवा कंपनी कायद्यांतर्गत येऊ शकतात.

हा ट्रस्ट पीएफआरडीएपासून वेगळा करण्याचा आणि १५ सदस्यीय सक्षम संचालक मंडळामार्फत त्याचे व्यवस्थापन करण्याचा सरकारचा मानस आहे. संचालक मंडळातील सर्व सदस्य सरकारचे असण्याची शक्यता आहे. वाढत्या निवृत्ती वेतनाचा भार कमी करण्यासाठी सरकारने जुन्या निवृत्तीवेतन योजनेऐवजी नॅशनल पेन्शन सिस्टीम (एनपीएस) लागू केली आहे. १ जानेवारी २००४ पासून सशस्त्र दले वगळता केंद्र सरकारच्या सेवेत रुजू होणाऱ्या सर्व नवीन कर्मचाऱ्यांसाठी एनपीएस अनिवार्य करण्यात आली आहे.

## इराण-अमेरिकेदरम्यान चर्चेच्या दुसऱ्या फेरीवर अनिश्चिततेचे सावट

■ इस्लामाबाद

**इराण** आणि अमेरिका यांच्या युद्धविराम करण्यासाठी पाकिस्तानच्या इस्लामाबादमध्ये आयोजित करण्यात आलेल्या चर्चेच्या दुसऱ्या फेरीवर अनिश्चिततेचे सावट आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी युद्ध थांबवण्यासाठी इराणवर दबाव टाकताना युद्धविराम केला नाही तर इराणला बरबाद करून टाकू, अशी धमकी दिली आहे. तर आमच्या पायाभूत सुविधांवर हल्ला झाला तर आम्ही वाट्टेल त्या थराला जाण्यास मागेपुढे पाहणार नाही, असे थेट प्रत्युत्तर इराणच्या रिव्हॉल्युशनरी गार्डने ट्रम्प यांना दिले आहे. अशा



परिस्थितीत उद्या हे दोन देश चर्चेसाठी एकत्र येतील का, याकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे.

इराण आणि अमेरिका यांच्यात समेट घडवून आणण्यासाठी पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ आग्रही आहेत. उद्या होणाऱ्या चर्चेसाठी त्यांनी दोन्ही देशांच्या प्रतिनिधींशी चर्चा केली. यामुळे दोन्ही पक्षांनी चर्चा करण्यास वरकरणी सहमती दर्शवली आहे. परंतु प्रत्यक्षात होर्मुजमध्ये होत असलेल्या घडामोडी जगाची चिंता वाढवणाऱ्या आणि युद्धविरामाची शक्यता धुसर करणाऱ्या आहेत. ट्रम्प अजूनही इराणला धमक्या देत आहेत. तर इराणचे रिव्हॉल्युशनरी गार्ड ट्रम्प यांच्या धमक्यांना पान २ वर

## निवडणूक आयुक्तांना हटवण्यासाठी विरोधकांची पुन्हा जोरदार तयारी

■ नवी दिल्ली

**मुख्य** निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या पक्षपाती वागणुकीवर वारंवार टीका करणारे विरोधी पक्ष आता ज्ञानेश कुमार यांना पदावरून हटवण्यासाठी पुन्हा जोरदार तयारी करत आहे. ज्ञानेश कुमार यांच्याविरुद्ध विरोध पुन्हा एकदा अविश्वास ठराव मांडणार आहेत. त्याचा मसुदा तयार करण्याचे काम सध्या सुरू आहे. उच्चपदस्थ सुत्रांनी ही माहिती दिली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, समाजवादी पार्टी आणि डीएमके या प्रमुख पक्षांसह इंडिया आघाडीतील घटकपक्षांचे किमान पाच वरिष्ठ खासदार या नवीन नोटिशीचा मसुदा तयार करण्यात गुंतले आहेत. अविश्वास ठरावाची ही नोटीस लोकसभेत मांडायची की राज्यसभेत किंवा दोन्ही सभागृहांमध्ये एकाच वेळी मांडायची याचा निर्णय अद्याप झालेला नाही. लोकसभेत मोदी सरकारने मांडलेले महिला आरक्षण विधेयक विरोधकांच्या एकजुटीमुळे नामंजूर झाले. त्यामुळे विरोधकांचा उत्साह वाढला आहे.

## टाटा समूह ट्रस्टमध्ये पुन्हा गडबड पारशी विश्वस्ताची अट बदलणार

■ मुंबई

**टाटा समूहाच्या** बाई हिराबाई ट्रस्ट कायद्यात विश्वस्त हे पारशी धर्माचे असावे, अशी अट आहे. आता ही अट काढून टाकण्याची प्रक्रिया केली जाणार आहे.

काही दिवसांपूर्वी टाटा ट्रस्टचे माजी विश्वस्त मेहली मिस्त्री यांनी उद्योगपती वेणू श्रीनिवासन आणि माजी संरक्षण सचिव विजय सिंह हे पारशी नसल्याने ते यांची बाई हिराबाई जमशेटजी टाटा नवसारी चॅरिटेबल इन्स्टिट्यूशन (बाई हिराबाई ट्रस्ट) ट्रस्टवर विश्वस्त म्हणून झालेल्या नियुक्तीला महाराष्ट्र धर्मादाय आयुक्तांकडे तक्रार करून आव्हान दिले होते.

त्यांनी दावा केला आहे की, श्रीनिवासन आणि सिंह हे ट्रस्ट डीडमध्ये नमूद केलेल्या निकषांमध्ये बसत नाहीत. यात पारशी झोराष्ट्रीयन धर्माचे पालन करणे आणि मुंबईतील रहिवासी असणे या अटींचा आहेत. यापूर्वी या महिन्याच्या सुरुवातीला टाटा ट्रस्टचे विश्वस्त श्रीनिवासन यांनी इतर व्यावसायिक कारणे सांगत बाई हिराबाई ट्रस्टमधून राजीनामा दिला होता.

## बारामती पोटनिवडणूक मुद्दाम बिनविरोध होऊ दिली नाही

**पार्थ पवारांचा दावा**

■ बारामती

**बारामती** विधानसभा पोटनिवडणुकीत काही उमेदवारांना मुद्दाम निवडणुकीच्या मैदानात उतरवले आणि निवडणूक बिनविरोध होऊ दिली नाही, असा खळबळजनक दावा राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते पार्थ पवार यांनी केला.

पार्थ पवार म्हणाले की, बारामतीत अनेकांची इच्छा होती की, पोटनिवडणूक बिनविरोध व्हावी. मात्र, प्रत्यक्षात तसे झाले नाही. काही उमेदवारांनी निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आणि त्यामागे काही पक्ष आहेत, असे त्यांनी सूचित



केले. ते म्हणाले की, काही प्रतिस्पर्ध्यांना मुद्दाम मैदानात उतरवले. आम्ही निवडणुकीला पूर्ण ताकदीने सामोरे जाणार आहोत. आम्ही चांगल्या मतांनी निवडून येणार आहोत. पण आम्हाला दोन लाख ७० हजार मतांचा रेकॉर्ड मोडायचा आहे. त्यांनी पुढे सांगितले की, उद्या सांगता सभा आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

उदय सामंत, रामदास आठवले, सुप्रिया सुळे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते या सभेला उपस्थित राहणार आहे. येथे ऊन खूप आहे. देण्यास त्यामुळे मतदारांना बाहेर काढण्यासाठी मोठे प्रयत्न करावे लागणार आहेत.

## 'डीजीसीए'च्या उपमहासंचालकासह रिलायन्स अधिकारी लाचखोरीत अटक

■ नवी दिल्ली

**सीबीआयने** नागरी हवाई वाहतूक महासंचालनालय (डीजीसीए) मधील उपमहासंचालक मुदवनाथ देवुला आणि रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडचे वरिष्ठ उपाध्यक्ष भरत माथूर यांना लाचखोरी प्रकरणात अटक केली आहे. ड्रोन आयातीसाठी आवश्यक परवानगी मिळवून देण्यासाठी २.५ लाख रुपयांची लाच स्वीकारल्याचा आरोप दोघांवर आहे.

सीबीआयच्या माहितीनुसार, डीजीसीएच्या एअरवर्दीनेस संचालनालयात कार्यरत असलेल्या देवुला यांनी ॲस्टेरिया एअरोस्पेस कंपनीचा प्रलंबित अर्ज मंजूर करण्यासाठी लाचेची मागणी केली होती. ॲस्टेरिया कंपनी ही रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडच्या तंत्रज्ञान शाखा जिओ प्लॅटफॉर्म्सची उपकंपनी आहे. १८ एप्रिल रोजी नोंदवलेल्या एफआयआरमध्ये, ड्रोन आयातीच्या तीन अर्जांच्या मंजुरीसाठी प्रत्येकी ५ लाख रुपये, असा एकूण १५ लाख रुपयांचा व्यवहार ठरल्याचा उल्लेख आहे. सुरुवातीला २.५ लाख रुपयांची देवाणघेवाण होत असताना सीबीआयने सापळा रचून आरोपींना आयआयटी दिल्ली उड्डाणपूल परिसरात रंगेहाथ पकडले. त्यानंतर सीबीआयने पान ७ वर

## राजा कायम! संरक्षण, अर्थव्यवस्थेवर ताण

### भेंडवळच्या घटमांडणीचे भाकीत जाहीर

**महाराष्ट्रासह शेजारील राज्यांतील शेतकऱ्यांचे लक्ष लागून असलेल्या बुलडाणा जिल्ह्यातील भेंडवळ येथील पारंपरिक घटमांडणीचे भाकीत आज सूर्योदयाच्या वेळी जाहीर करण्यात आले. या भाकितानुसार, यंदा देशाचा 'राजा' (सत्ताधारी) कायम राहणार असला तरी देशाची संरक्षण आणि आर्थिक स्थिती आव्हानात्मक राहण्याचे संकेत देण्यात आले आहेत.**

■ बुलडाणा

**अक्षय्य** तृतीयेच्या मुहूर्तावर सूर्यास्ताच्या वेळी करण्यात आलेल्या घटमांडणीचे निरीक्षण सकाळी करण्यात आले. मांडणीतील 'पान-विडा' जसाच्या तसा कायम असल्याने, देशात सत्तांतराची शक्यता कमी असून, देशाची सत्ता म्हणजे 'राजा' स्थिर राहील, असे संकेत मिळाले. देशाच्या संरक्षणाचे प्रतीक मानल्या जाणाऱ्या 'करडी'चे दाणे घटाबाहेर पसरलेले आढळले. याचा अर्थ सीमांवरील तणाव वाढण्याची शक्यता आहे.



मांडणीतील 'कारंजी' फुटलेली आढळल्याने देशाच्या आर्थिक स्थितीवर ताण येऊन महागाई किंवा मंदीचे सावट राहू शकते. जूनमध्ये पावसाची दमदार सुरुवात होईल, जुलैमध्ये पाऊस सर्वसाधारण राहील, तर ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये पावसात खंड पडण्याची शक्यता आहे. काही भागांत अतिवृष्टीमुळे पान ७ वर

## चारधाम यात्रेच्या पहिल्याच दिवशी महाराष्ट्राच्या भाविकासह दोघांचा मृत्यू

■ डेहराडून

**चारधाम** यात्रेला कालपासून सुरुवात झाली. मात्र यात्रेच्या पहिल्याच दिवशी महाराष्ट्र व इंदूर येथील दोन भाविकांचा मृत्यू झाला आहे. यमुनोत्री धामकडे जाणाऱ्या पायी मार्गावर ही घटना घडली.

उत्तरकाशी जिल्ह्यात असलेल्या यमुनोत्री धामच्या पायी मार्गावर चढाई करताना महाराष्ट्रातून आलेले ६७ वर्षीय उदम तांबे यांची चढाईदरम्यान अचानक तब्येत बिघडली. श्वास घेण्यास त्रास झाल्याने त्यांना तत्काळ जानकीचट्टी येथील रुग्णालयात नेण्यात आले. मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. प्राथमिक तपासणीत उंचीवर ऑक्सिजनची कमतरता, रक्तदाब श्वसनसंबंधित त्रास हे मृत्यूचे कारण असल्याचे सांगण्यात आले. यमुनोत्री पायी मार्गावरील '१९ कैंची' परिसरात घोड्यावरून जात असताना इंदूर येथील ४० वर्षीय प्रतिमा मिश्रा घोड्याचा तोल गेल्याने त्या खाली पडल्या.

## अदानी उद्योग समूहात आता तीन नवीन कंपन्यांची स्थापना

■ नवी दिल्ली

**गेल्या** दहा-पंधरा वर्षांत झपाट्याने विस्तारत चाललेल्या अदानी उद्योग समूहामध्ये आता तीन नवीन कंपन्यांची भर पडली आहे. अदानी एन्टरप्रायझेस लिमिटेडने (एईएल) विमानतळ शहर विस्तार धोरणाचा भाग म्हणून हॉटेल आणि रिअल इस्टेट विकासावर लक्ष केंद्रित करण्यासाठी या कंपन्या स्थापन केल्या आहेत.

अदानी एअरपोर्ट सिटी लिमिटेड, अदानी गुवाहाटी एअरपोर्ट सिटी लिमिटेड आणि अदानी अहमदाबाद एअरपोर्ट सिटी लिमिटेड अशी नव्याने स्थापन करण्यात आलेल्या कंपन्यांची नावे आहेत. या कंपन्या स्वतःच्या अथवा भाडेपट्ट्यावर घेतलेल्या भूखंडांवर बांधकाम प्रकल्प, रेस्टॉरंटस, बँक्वेटस आणि बिझनेस सेंटरसाठी हॉटेल चालवण्याचे काम करतील. या प्रत्येक उप कंपनीची स्थापना दहा लाख रुपयांच्या भरणा केलेल्या भांडवलासह करण्यात आली आहे.




या तिन्ही कंपन्यांची मालकी अदानी एअरपोर्ट सिटी लिमिटेडकडे आहे.या कंपन्यांच्या माध्यमातून अदानी समूह विमानतळ परिसरात मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधा निर्माण करणार आहे.

नवाकाळ
Email- contact@navakal.in   www.navakal.in   /navakalofficial


# छोट्या जाहिराती

संपर्क करा
८४२२८१७४४५/८१०८११६४२३

**पाहिजेत**

मुंबईमध्ये पेशंटसाठी 12/24 तास आया, वॉर्डबॉय पाहिजेत. पगार- (30,000-90,000) **9820628009** {NC260149}

निराधार महिला आणि पुरुषांसाठी केअर टेकर नोकरी (पगार + जेवण + निवास मोफत) घरकुल केअर सेंटर : **9819426634/ 9969529162** {NC260193}

मावशी, वॉर्डबॉय, कुक, नर्स, DRIVER, पेशंटकेअर (MALE+ FEMALE) पाहिजेत. (राहणेखाणे+ पगार) वीकेअर होम (महिला आश्रम) ठाणे **9136404828.** {NC26122}

हाऊसकिपींग स्टाफकरिता पुरुष आणि महिला अर्जंट पाहिजेत, ठिकाणः विलेपार्ले/ लोखंडवाला मार्केट/ दहिसर/ काचपाडा मालाड (पश्चिम). **9892561872.** {NC260238}

आश्रममध्ये कामासाठी स्त्री/पुरुष पाहिजे. राहणे-खाणे फ्री, पगार 10000/- 20000/-. पनवेल- **9167555200** {NC260158}

भायखळा/ माझगांव विभागात कुरीयर डिलीव्हरी पिकअपसाठी तरुण मुले पाहिजेत- **9870284297** {NC260247}

सीएसटी मुंबई येथील पेस्ट कंट्रोल कंपनीला फवारणी करणारी माणसे पाहिजे. पगार 12000+ गाडीभाडे+ कमिशन **8356824867** {NC260245}

पाहिजे ड्रायव्हर ३ व्हील्स टेम्पोसाठी, रूम-२, समतासदन, पोदार रोड नियर गुरुद्वारा मालाड ईस्ट **9320536295/ 9022357919** {NC260173}

मुलुंड श्रीनगरसाठी त्वरित सिक्युरिटी गार्डची भरती, ड्युटी 8 तास - **9220668889** {NC260258}

सिक्युरिटी गार्ड पाहिजे- वांद्रे, रेस्टॉरंटसाठी. पगारः 19000+ PF, ESIC, जेवण, ३ सुट्टी. संपर्कः **8291856090/ 8291107497** {NC260235}

**पाहिजेत**

पुणे शहरात मध्यवर्ती ठिकाणी टू कलर फोर कलर प्रिंटिंग मशीन वर बॉयलर फिडरमन हेल्पर पाहिजे आहेत संपर्क **9822352233** {NC260243}

पेस्ट कंट्रोल कामासाठी बोरिवली/ वसई ऑफीस टेक्निशियन/ सेल्ससाठी मुले/मुली पाहिजे. **9819660542** {NC260055}

सुरक्षा गार्ड भरती मुंबई सॅलरी 18-25 रहाणे खाणे फ्री **9925736285** {NC260188}

आयुर्वेदिक हेल्थकेअर कंपनीत नोकरीची सुवर्णसंधी! ट्रेनर लीडर मॅनेजर पदासाठी भरती! डायरेक्ट सेलिंगमध्ये कुठेही काम केले असेल तर भेटा. फ्रेशर विद्यार्थी मार्केटिंग स्किल शिका व प्रमाणपत्र मिळवा. वय 18 ते पुढे इच्छुक. पगार 15000/- ते 25000/- संपर्कः **7506576335** {NC260239}

घरकामासाठी (10/12/24 तास) बेबीकेअर/ जापाबाई आणि कुकींगसाठी अनुभवी ''बायका/ मुली'' पाहिजेत. पगार 20,000/- ते 40,000/- रंजीतसर **9321417007/ 9892575886** दादर वेस्ट {NC254740}

तात्काळ भरती- उत्तम करिअर संधी! Force Facility Management Services, Goregaon West फॅसिलिटी राउंडर. एरिया मॅनेजर तात्काळ गरज आकर्षक व वेळेवर पगार कामाचे ठिकाणः संपूर्ण मुंबई संपर्कः **8850103914/ 7506366043** {NC260256}

पेस्ट कंट्रोल, invisible grill च्या मार्केटिंगसाठी अनुभवी मुले पाहिजेत **8108488388** {NC260257}

त्वरित पाहिजे आहे. कंपनीसाठी हुशार अनुभवी, विश्वासू, तरुण Peon पाहिजे. सायकल चालवता येणे आवश्यक. पत्ताः ए टु झेड स्टिलॉइस प्रायव्हेट लिमिटेड, २९, मॅगझिन स्ट्रीट, संगम हॉटेलजवळ, दारुखाना, रे रोड, मुंबई- ४०००१०. दुरध्वनीः **7021734143** {NC260007}

**पाहिजेत**

बालाजी पेस्ट कंट्रोल कंपनीसाठी टेक्निशियन पाहिजेत पगार 18000/- कांदिवली पश्चिमः **9769723507** {NC260255}

**शैक्षणिक**

हमखास पासाची गॅरंटी खर्डीकर क्लासेस. ७वी नापास? डायरेक्ट १०वी. ११वी नापास? डायरेक्ट १२वी. डोंबिवली: **9820627580 / 9820904646** {NC260031}


## वाचकांना सूचना

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी. - **मॅनेजर, 'नवाकाळ'**

# चर्चेच्या दुसऱ्या फेरीवर अनिश्चिततेचे सावट

पान १ वरून

जशास तसे प्रत्युत्तर देत आहे. अमेरिकेने आमच्या तेलसाठ्यावर हल्ला केला तर आम्ही आखाती देशांच्या तेलसाठ्यांवर असा काही हल्ला करून की ट्रम्प यांना पश्चाताप होईल, अशी नवी धमकी इराणने दिली आहे. अमेरिकेच्या नौदलाकडून इराणची नाकेबंदी करण्यात आली आहे.

काल इराणचे एक महाकाय तेलवाहू जहाज अमेरिकेची नाकेबंदी मोडून पुढे जाण्याच्या प्रयत्नात होते. हे जहाज अमेरिकेच्या नौदलाने रोखले आणि नंतर ते जप्त केले. त्यामुळे उभय देशातील तणाव पुन्हा एकदा वाढला आहे. अमेरिकेच्या प्रतिनिधींमध्ये उपाध्यक्ष जे.डी. व्हान्स यांचा सहभाग असेल किंवा नाही याबाबतही अनिश्चितता आहे. आज व्हान्स इस्लामाबादसाठी रवाना झाले, असे सांगण्यात आले. सर्व काही ठीकठाक राहिले तर इराणचे प्रतिनिधी मंडळ उद्या सकाळी इस्लामाबादमध्ये दाखल होणार आहे. दुसरीकडे या युद्धाच्या झळा सोसाव्या लागत असल्याने संतापलेल्या युएईने ट्रम्प यांच्या जिव्हारी लागेल, अशी धमकी दिली आहे. युएई सरकारच्या वतीने एक्स पोस्ट करून ट्रम्प यांना मोठा धक्का दिला आहे. तुम्ही हे युद्ध सुरू केले आहे. आम्हाला जर अमेरिकन डॉलरचा तुटवडा भासू लागला तर तुम्ही आम्हाला डॉलर देण्याची व्यवस्था करा अन्यथा आम्ही डॉलरऐवजी चीनच्या युआनमध्ये व्यवहार करू, अशी धमकी युएईने दिली आहे. त्यामुळे ट्रम्प यांच्यावर युद्धविराम करण्यासाठी दबाव आहे.

# निष्ठावान सभासद असतील तर संस्था संपत नाही

## सहकारी संस्था कार्यकर्ता चर्चासत्रात शिवेंद्रराजे भोसलेंचे प्रतिपादन

पान ८ वरून

जयश्री पांचाळ, निमंत्रक धनंजय शेडगे, सातारा जिल्हा सहकारी बोर्डाचे अध्यक्ष जितेंद्र जगदाळे, उपाध्यक्ष संजीव साळुंखे, मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र सरकाळे, जिल्हा उपनिबंधक संजय सुद्रिक, सुनील ताटे, सातारा जिल्हा सहकारी बोर्डाचे ज्येष्ठ संचालक शाहूराज फाळके, जिल्हा विशेष लेखापरीक्षक श्रीधर कोल्हापूरे, सतीश देशमुख यांसह विविध सहकारी संस्थांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले म्हणाले की, सातारा जिल्ह्याला सहकाराची फार मोठी परंपरा आहे. कै. यशवंतराव चव्हाण यांच्यानंतर या जिल्ह्यात काम करणाऱ्या सर्वांनी जे सहकार क्षेत्र स्थापन केले ते वाढलं पाहिजे, सक्षम झालं पाहिजे हा प्रयत्न प्रत्येकाने केला. म्हणून सातारा जिल्ह्यात सहकाराची जी पाळमुळे आहेत ती खोलवर रुजली आहेत. सहकारात अडचणी आहेत, त्या येत राहणार. आज पुढे असलेल्या अडचणींवर मात केली त्या नवीन अडचणी उभ्या राहणार याबाबत कोणी मनात शंका ठेवू नये. जरी अडचणी आल्या तरी सहकार क्षेत्र सक्षम झालं पाहिजे, वाढलं पाहिजे यासाठी सर्वांनी प्रयत्न करावे. केंद्रात सहकार खाते वेगळे निर्माण करण्याचा जो महत्त्वपूर्ण निर्णय झाला त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या माध्यमातून सहकाराला बळकटी मिळाली आहे. अनेक वर्षापासूनचे प्रश्न प्रलंबित होते. ते केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांच्या माध्यमातून एका क्षणात सुटले. आमचाही कारखाना अडचणीत होता. सभासदांचे जर संस्थेवर प्रेम, विश्वास असेल तर काय होऊ शकतं याचे उदाहरण अजिंक्यतारा सहकारी साखर कारखाना आहे. सभासदांचा संस्थेवर विश्वास, निष्ठा होती म्हणून संस्था पुन्हा एकदा मूळ पदावर येऊ शकली. सभासद जर संस्थेसोबत निष्ठेने असले तर संस्थेला किती अडचणी आल्या तरी ती कधीही संपू शकत नाही. जिल्ह्यातील पक्षीय राजकारण सहकारात येणार नाही यासाठी आमचा प्रयत्न नेहमी राहिला असून पुढेही राहील, तर उपस्थितांना संबोधित करताना आमदार दरेकर म्हणाले की, संघाच्या मार्फत आम्ही व्यवस्था उभ्या करू सरकारच्या मार्फत मदतही मिळवू परंतु सहकारातील कार्यकर्त्यांचा नेत्यांचा जो आत्मविश्वास हरवला आहे तो उभा करण्याची गरज आहे. त्यामुळे पुण्याला उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांच्या उपस्थितीत मेळावा घेतला. त्या मेळाव्यात आत्मविश्वास घेऊन महाराष्ट्रातील जिल्हा बोर्डाचे प्रतिनिधी कर्मचारी गेले. पश्चिम महाराष्ट्र हे सहकाराचे प्रमुख क्षेत्र आहे महाराष्ट्राला ताकतीने सहकार हा सातारा सांगली कोल्हापूर या पश्चिम महाराष्ट्र दाखवलाय. पुन्हा या भूमीतून सहकाराला उर्जितावस्था देण्यासाठी आपण कार्यकर्त्यांचे मेळावा घेतला पाहिजे ते शिबिर आज संपन्न होत आहे. सातारा जिल्हा अनेक थोर नेत्यांचा जिल्हा आहे. कारखानदारीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना ताकद देण्याचे काम सहकारी कारखान्यांनी केले. जिल्हा बँकांच्या माध्यमातून गावच्या विविध कार्यकारी सोसायटी असो किंवा शेतकऱ्यांच्या कुठल्याही प्रकारच्या संस्था असो जिल्हा बँकांच्या माध्यमातून त्यांना ताकद देण्याचे कामही जिल्हा मध्यवर्ती बँकांनीच केले आहे. राज्यातील सहकार चळवळीची परिस्थिती पाहता ती अडचणीची आहे. विदर्भातील सहकार चळवळ जवळपास संपुष्टात आली आहे. विदर्भ, मराठवाड्यात सहकार चळवळ ताकदवान करण्याची गरज आहे. ज्या संस्था सशक्त आहेत या संस्थांनी इतरांना ताकद देण्याचे काम करावे लागेल निश्चितच ते काम येणाऱ्या काळात आपण करू.

### मुंबईत सहकारी कार्यकर्त्यांसाठी हक्काचे सहकार भवन असणार

आपण मुंबईत सहकार भवन उभारणार आहोत. मुंबईत सहकारी कार्यकर्ते येतात, त्यांना राहायची व्यवस्था नसते. म्हणून राज्याच्या मुख्यमंत्र्यांना मी विनंती केली. सायनला सहकार भवनसाठी भूखंड दिला. त्याचे नुकतेच मुख्यमंत्र्यांच्या हस्ते भूमिपूजन झाले आहे. येणाऱ्या दोन वर्षात सहकारी कार्यकर्त्यांसाठी हक्काचे सहकार भवन मुंबईत असणार असेही दरेकरांनी सांगितले.



एमसीएचे अध्यक्ष अजिंक्य नाईक यांनी, माजी भारतीय क्रिकेटपटू राजू कुलकर्णी यांच्यासमवेत एमसीए चॅम्पियन्स ट्रॉफीचे अनावरण केले. यावेळी एमसीएचे पदाधिकारी, सर्वोच्च परिषदेच्या सदस्या, माजी भारतीय क्रिकेटपटू डायना एडुलजी आणि प्रीती डिमरी यादेखील उपस्थित होत्या.

# परळी कृषी उत्पन्न बाजार समिती उपसभापतींवर हल्ला

**परळी** - परळी येथील कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती तथा गोवर्धन गावचे माजी सरपंच संजय देशमुख यांच्यावर अज्ञातांकडून जीवघेणा हल्ला करण्यात आला आहे.

संजय देशमुख हे गोवर्धन गावातून सिरसाळाकडे जात असताना दोन दुचाकींवरून आलेल्या सुमारे सहा जणांनी त्यांच्यावर अचानक हल्ला चढवला. हल्लेखोरांनी लोखंडी रॉड, कोयता आणि काठ्यांनी मारहाण केल्याने ते गंभीर जखमी झाले. घटनेनंतर त्यांना तातडीने स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालय येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचारांनंतर त्यांना घरी सोडण्यात आले आहे.

# भांडूप रेल्वे स्थानकाजवळ बेस्ट बसचा अपघात टळला

■ मुंबई

**भांडुप** रेल्वे स्थानक परिसरात काल दुपारी १२.५० वाजताच्या सुमारास बेस्ट बसचा मोठा अपघात टळला.

नरदास नगरची फेरी पूर्ण करून आलेली बस थांबलेली असताना अचानक मागे सरकू लागली, त्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली. यावेळी बसवाहक वेळेची नोंद करण्यासाठी खाली उतरले होते, तर चालकही नैसर्गिक विधीसाठी बसबाहेर गेला होता. बस मागे सरकत असल्याचे लक्षात येताच नागरिकांनी आरडाओरड केली. चालक तातडीने बसकडे धावले, मात्र तोपर्यंत बस फुटपाथवरील एसटीडी बूथच्या पत्र्याला धडकून थांबली. या घटनेत एसटीडी बूथचे किरकोळ नुकसान झाले असून बसचे कोणतेही नुकसान झाले नाही. या घटनेत कोणतीही जीवितहानीही झाली नाही. घटनेनंतर बसला भांडुप पोलीस ठाण्यात नेण्यात आले.

वाहतूक पोलिसांनी नोंद करून बस पुन्हा सोडण्याची परवानगी दिली. या बसच्या चालकाने हँड ब्रेक निकामी असल्याची तक्रार केली होती. त्यामुळे बसला पुढील तपासणीसाठी विक्रोळी आगार येथे टोईंग करून नेण्यात आले. मात्र, अभियांत्रिकी विभागाच्या तपासणीत हँड ब्रेकमध्ये कोणताही दोष आढळून आला नाही. त्यामुळे संबंधित बस चालकावर लवकरच कारवाई होण्याची शक्यता आहे.

# छत्तीसगडमध्ये खासगी विमान आरा डोंगररांगांमध्ये कोसळले

■ रायपूर

**छत्तीसगडच्या** जशपूर जिल्ह्यातील आरा डोंगररांगांमध्ये आज दुपारी एक खासगी विमान कोसळले. जमिनीवर आदळताच विमानाने पेट घेतला. या अपघातात वैमानिक आणि सह वैमानिकाचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती आहे. प्रत्यक्षदर्शींनी सांगितले की, हे विमान नारायणपूर क्षेत्रातील रतनपहली जंगलावरून जात असताना अचानक डोंगराच्या दिशेने झुकले आणि वेगाने डोंगररांगांवर जाऊन धडकले. ही धडक एवढी जोरदार होती की विमानाचे तुकडे झाले आणि विमानाने पेट घेतला. हा भाग डोंगराळ आणि घनदाट जंगल परिसर असल्यामुळे सुरुवातीला मदतकार्यात अनेक अडचणी येत होत्या. घटनेची माहिती मिळताच स्थानिक गावकरी आणि पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले.विमानात एकूण किती प्रवासी होते,याची निश्चित माहिती अद्याप मिळालेली नाही. हे विमान कोणाच्या मालकीचे होते आणि कुठून कुठे जात होते, याचा तपास पोलीस करत आहेत. तांत्रिक बिघाड किंवा खराब हवामानामुळे हा अपघात झाला असावा, असा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात येत आहे.

# कांदिवलीत भोंदू फकीर अटकेत

■ मुंबई

**कांदिवली** परिसरात पोलिसांनी एका भोंदू फकिराला अटक केली असून, उपचाराच्या नावाखाली महिलांना बेशुद्ध करून त्यांच्यावर अत्याचार केल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे.

अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव इरफान नियाज अहमद (३४) असून तो मूळचा उत्तर प्रदेशातील बहराइच येथील रहिवासी आहे. गेल्या काही वर्षांपासून तो मुंबईत वास्तव्यास असून स्वतःला 'फकीर बाबा' म्हणवत होता. तो महिलांच्या अडचणी जाणून घेत त्यांना 'दोष' दूर करण्याच्या नावाखाली त्यांचा गैरफायदा घेत असे. कांदिवलीतील एका विधवा महिलेत काही दोष असल्याचे सांगून त्याने तिला काही विधी करण्यास भाग पाडले. या विधीदरम्यान संबंधित महिला आणि तिच्या दोन मुलींना काहीतरी देऊन बेशुद्ध केले. त्यानंतर आरोपीने तिच्या मुलीचा विनयभंग केल्याचा आरोप आहे.

# आजचे राशी भविष्य

मंगळवार ता. २१ एप्रिल २०२६
ज्योतिष पंडीत शिरीष प्रभू

| राशी | भविष्य |
|---|---|
| मेष | प्रसन्न दिवस आहे. मेहनतीचे चीज होईल. अनपेक्षित धनलाभाचे योग आहेत. |
| वृषभ | अडथळ्यांची शर्यत पार करावी लागेल. मात्र अंतिमतः यश लाभेल. तणाव दूर ठेवा. पैशाची चणचण भासेल. |
| मिथुन | मनोरंजनातून आनंद लाभेल. नोकरीत अवघड कामे सोपवली जातील. आर्थिक अस्थिरता जाणवेल. |
| कर्क | अनेक तडजोडी कराव्या लागतील. महत्त्वाचे निर्णय आज नकोत. खर्चावर ताबा ठेवा. |
| सिंह | फायदेशीर दिवस आहे. शेजाऱ्यांचा पाठिंबा मिळेल. आर्थिक लाभ होईल. |
| कन्या | फायदेशीर संधी चालून येईल. नोकरीत आर्थिक लाभ होईल. तीर्थाटनाचे योग आहेत. |
| तूळ | योग्य मार्ग सापडेल. नियोजनपूर्वक वाटचाल महत्त्वाची ठरेल. वरिष्ठांशी वाद टाळा. |
| वृश्चिक | विनाघडामोडीचा दिवस राहील. मनस्थिती गोंधळाची असेल. निर्णय चुकण्याचा संभव आहे. |
| धनु | नवीन ओळखी फायदेशीर ठरतील. प्रवास करावा लागेल. कष्टाचे चीज होईल. |
| मकर | मकर : समस्यांवर लक्ष केंद्रित करणे टाळा. कामाबाबत सगळीकडून कौतुकाचा वर्षाव होईल. |
| कुंभ | काटेकोर नियोजनाने कठीण कामेही मार्गी लावता येतील. धार्मिक कारणाने खर्चाची शक्यता. |
| मीन | अडथळ्यांवर मात करून यश मिळवता येईल. चिंता व ताण दूर ठेवा. जोडीदाराशी कठोर बोलणे टाळा. |

# सातार्‍याचे आ.महेश शिंदेंची पक्षांबाबत जाहीर नाराजी

■ सातारा

**सातार्‍यातील** राजकारण पुन्हा एकदा तापले आहे. शिंदेसेनेचे कोरेगावचे आमदार महेश शिंदे यांनी मंत्री व पालकमंत्री शंभुराजे देसाई यांच्यावर जाहीरपणे नाराजी व्यक्त करत जोरदार निशाणा साधला. पक्षाकडून सुरुवातीपासूनच डावलल्याची वागणूक दिली जाते. कोणत्याही कार्यक्रमांना मला बोलावले जात नसल्याचा आरोप त्यांनी केला.

महेश शिंदे यांनी दावा केला की, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सातारा दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर आपणास कार्यक्रमासाठी निमंत्रण देण्यात आले नाही, तसेच कोणाचाही फोनही आलेला नाही. हा पक्षाचा पहिलाच कार्यक्रम नाही की मी जाणार नाही. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाल्यापासून माझे फोटो बॅनरवर दिसत नाहीत. तसेच जिल्ह्यात शिवसैनिक आहेत कुठे आहेत? असे म्हणत पक्षाच्या सातारा जिल्ह्यातील संघटनात्मक स्थितीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

## महाराष्ट्र सागरलक्ष्मी विकली लॉटरी

सोडत दर सोमवारी | तिकीट किंमत रु. 50/- | सोडत क्र. 16 | सोडत दिनांक 20/04/2026

पहिले सामाईक बक्षिस रु. 7 लाख — **SL-03 : 1801**

प्रोत्साहनपर बक्षिस रु. 2500/- — पहिल्या बक्षीसाची विजेता मालिका सोडून इतर सर्व मालिकांसाठी — **1801** — श्री गणेश एन्टरप्रायझेस - दादर, मुंबई

दुसरे बक्षिस रु. 5000/- — **4886** — लॉटरी भांडार - नागपूर; महाराजा लॉटरी सेंटर - इचलकरंजी

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 2790 | 3150 | 3918 | 4407 | 5963 | 7337 | 7709 | 8260 | 9326 | 9384 |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 0063 | 0418 | 1150 | 1684 | 2298 | 2331 | 4087 | 6450 | 9023 | 9757 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 0469 | 0605 | 4028 | 4206 | 4340 | 5284 | 6134 | 7325 | 8159 | 9495 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 0731 | 1698 | 4838 | 5216 | 7181 | 7316 | 7710 | 8182 | 8225 | 8515 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

सातवे बक्षीस रु.100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1166 | 1945 | 2523 | 3353 | 4230 | 5115 | 5768 | 6415 | 7057 | 7865 | 8490 | 9338 |
| | | 1168 | 1966 | 2524 | 3367 | 4233 | 5195 | 5773 | 6427 | 7099 | 7870 | 8508 | 9345 |
| | | 1176 | 2021 | 2525 | 3371 | 4252 | 5221 | 5784 | 6448 | 7105 | 7877 | 8509 | 9352 |
| | | 1184 | 2025 | 2545 | 3388 | 4269 | 5232 | 5787 | 6466 | 7123 | 7889 | 8528 | 9385 |
| | | 1196 | 2026 | 2565 | 3397 | 4304 | 5252 | 5857 | 6525 | 7124 | 7918 | 8532 | 9394 |
| 0005 | 0565 | 1197 | 2097 | 2573 | 3398 | 4306 | 5295 | 5858 | 6526 | 7155 | 7925 | 8589 | 9399 |
| 0014 | 0579 | 1199 | 2122 | 2574 | 3453 | 4349 | 5351 | 5865 | 6547 | 7172 | 7935 | 8642 | 9461 |
| 0020 | 0601 | 1237 | 2129 | 2581 | 3488 | 4364 | 5378 | 5868 | 6548 | 7206 | 7947 | 8658 | 9472 |
| 0024 | 0610 | 1291 | 2132 | 2618 | 3503 | 4394 | 5385 | 5890 | 6555 | 7266 | 7955 | 8668 | 9489 |
| 0026 | 0665 | 1388 | 2136 | 2626 | 3533 | 4427 | 5417 | 5899 | 6559 | 7270 | 7967 | 8704 | 9492 |
| 0037 | 0690 | 1406 | 2139 | 2627 | 3543 | 4428 | 5435 | 5939 | 6560 | 7274 | 7977 | 8780 | 9516 |
| 0043 | 0692 | 1413 | 2142 | 2662 | 3563 | 4439 | 5446 | 5942 | 6566 | 7308 | 7993 | 8783 | 9532 |
| 0046 | 0700 | 1414 | 2146 | 2694 | 3572 | 4442 | 5451 | 5951 | 6569 | 7319 | 8080 | 8788 | 9535 |
| 0070 | 0706 | 1418 | 2172 | 2697 | 3587 | 4455 | 5453 | 5953 | 6571 | 7352 | 8088 | 8805 | 9553 |
| 0082 | 0726 | 1433 | 2182 | 2719 | 3589 | 4458 | 5460 | 5967 | 6581 | 7379 | 8178 | 8806 | 9589 |
| 0092 | 0759 | 1446 | 2204 | 2725 | 3591 | 4473 | 5475 | 5976 | 6588 | 7400 | 8181 | 8819 | 9609 |
| 0096 | 0762 | 1468 | 2207 | 2784 | 3632 | 4506 | 5506 | 5994 | 6618 | 7438 | 8191 | 8825 | 9625 |
| 0100 | 0785 | 1481 | 2222 | 2786 | 3663 | 4518 | 5514 | 6003 | 6623 | 7458 | 8193 | 8836 | 9628 |
| 0102 | 0787 | 1488 | 2247 | 2820 | 3684 | 4524 | 5515 | 6009 | 6626 | 7477 | 8197 | 8838 | 9643 |
| 0130 | 0789 | 1501 | 2253 | 2851 | 3703 | 4547 | 5518 | 6018 | 6641 | 7490 | 8215 | 8840 | 9651 |
| 0133 | 0800 | 1551 | 2266 | 2862 | 3709 | 4548 | 5530 | 6031 | 6646 | 7517 | 8221 | 8847 | 9659 |
| 0144 | 0802 | 1573 | 2267 | 2916 | 3713 | 4549 | 5534 | 6056 | 6651 | 7564 | 8223 | 8848 | 9664 |
| 0202 | 0818 | 1586 | 2273 | 2921 | 3719 | 4581 | 5537 | 6065 | 6657 | 7565 | 8227 | 8880 | 9708 |
| 0205 | 0850 | 1634 | 2280 | 2929 | 3737 | 4626 | 5541 | 6102 | 6686 | 7574 | 8231 | 8884 | 9717 |
| 0220 | 1047 | 1639 | 2283 | 2947 | 3741 | 4643 | 5547 | 6107 | 6695 | 7578 | 8274 | 8890 | 9838 |
| 0234 | 1064 | 1651 | 2288 | 2972 | 3783 | 4652 | 5555 | 6108 | 6756 | 7579 | 8283 | 8908 | 9839 |
| 0250 | 1071 | 1661 | 2289 | 3040 | 3807 | 4710 | 5561 | 6117 | 6766 | 7592 | 8284 | 8938 | 9843 |
| 0275 | 1078 | 1713 | 2293 | 3113 | 3815 | 4740 | 5565 | 6160 | 6769 | 7612 | 8286 | 8940 | 9844 |
| 0290 | 1098 | 1720 | 2315 | 3143 | 3831 | 4749 | 5586 | 6168 | 6790 | 7629 | 8297 | 8942 | 9849 |
| 0316 | 1107 | 1721 | 2326 | 3164 | 3879 | 4849 | 5593 | 6169 | 6816 | 7647 | 8332 | 8964 | 9862 |
| 0342 | 1108 | 1726 | 2327 | 3215 | 3986 | 4878 | 5607 | 6214 | 6833 | 7684 | 8350 | 8992 | 9875 |
| 0343 | 1114 | 1770 | 2343 | 3230 | 4000 | 4943 | 5626 | 6236 | 6854 | 7734 | 8383 | 9026 | 9901 |
| 0359 | 1118 | 1775 | 2371 | 3295 | 4034 | 5005 | 5651 | 6269 | 6857 | 7738 | 8384 | 9048 | 9902 |
| 0360 | 1119 | 1791 | 2382 | 3300 | 4035 | 5008 | 5665 | 6296 | 6860 | 7749 | 8385 | 9059 | 9904 |
| 0405 | 1125 | 1815 | 2411 | 3316 | 4064 | 5019 | 5666 | 6302 | 6895 | 7757 | 8439 | 9101 | 9929 |
| 0420 | 1140 | 1816 | 2432 | 3322 | 4097 | 5025 | 5689 | 6346 | 6918 | 7760 | 8466 | 9139 | 9939 |
| 0440 | 1143 | 1841 | 2433 | 3323 | 4103 | 5063 | 5703 | 6373 | 6949 | 7765 | 8468 | 9177 | 9943 |
| 0474 | 1152 | 1922 | 2471 | 3333 | 4129 | 5065 | 5730 | 6388 | 6966 | 7782 | 8480 | 9241 | 9961 |
| 0495 | 1154 | 1924 | 2501 | 3336 | 4141 | 5075 | 5746 | 6391 | 6999 | 7784 | 8485 | 9290 | 9984 |
| 0520 | 1160 | 1940 | 2522 | 3341 | 4225 | 5096 | 5764 | 6392 | 7017 | 7805 | 8488 | 9292 | 9991 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ताः महाराष्ट्र राज्य लॉटरी

# शुभ राशी ता.२१/४/२०२६

| | | |
|---|---|---|
| ५ | ४ | ९ |
| ५१ | ४१ | ९१ |
| ५६ | ४६ | ९६ |
| १६८ | १३० | २८९ |
| २६७ | २४८ | १२६ |

# लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र सह्याद्री • धनलक्ष्मी विकली लॉटरी •

महाराष्ट्र राज्य लॉटरी | सोडत सायं. 4:30 वाजता

सोडत दर सोमवार • सोडत क्रमांक 16 • तिकीट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 20/04/2026

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- — **SL-06 : 2069** — श्री गणेश एन्टरप्रायझेस, दादर, मुंबई

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 1210 (डायमंड कॉर्पोरेशन, बोरिवली) | 3141 | 3479 | 3530 | 3954 | 4326 | 4454 | 6793 | 7582 | 9186 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 1278 | 2065 | 2094 | 2466 | 5073 | 6924 | 8074 | 8110 | 9408 | 9679 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0435 | 2115 | 2389 | 3271 | 4244 | 4826 | 5806 | 5824 | 6785 | 9342 |

पाचवे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

पाचवे बक्षिस रु. 300/-

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1125 | 2447 | 3634 | 5041 | 6368 | 7170 | 8090 | 8941 |
| | 1130 | 2524 | 3807 | 5165 | 6471 | 7185 | 8149 | 8978 |
| 0020 | 1133 | 2538 | 3834 | 5250 | 6531 | 7262 | 8151 | 9061 |
| 0059 | 1150 | 2619 | 4031 | 5255 | 6544 | 7292 | 8278 | 9244 |
| 0114 | 1213 | 2622 | 4050 | 5346 | 6559 | 7309 | 8280 | 9380 |
| 0180 | 1377 | 3005 | 4124 | 5525 | 6606 | 7471 | 8446 | 9493 |
| 0370 | 1461 | 3057 | 4164 | 5814 | 6645 | 7679 | 8449 | 9508 |
| 0401 | 1646 | 3334 | 4216 | 5912 | 6668 | 7694 | 8481 | 9537 |
| 0555 | 1742 | 3343 | 4344 | 5923 | 6679 | 7740 | 8489 | 9549 |
| 0720 | 1807 | 3363 | 4498 | 5938 | 6686 | 7827 | 8516 | 9629 |
| 0806 | 1863 | 3383 | 4809 | 5974 | 6714 | 7974 | 8585 | 9728 |
| 1108 | 2230 | 3523 | 4863 | 6182 | 6964 | 8016 | 8640 | 9763 |
| 1115 | 2334 | 3556 | 4914 | 6339 | 7105 | 8068 | 8848 | 9900 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ताः महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — गणेशलक्ष्मी भाग्यशाली विकली लॉटरी

सोडत सायं. 5:00 वाजता

सोडत दर सोमवार • सोडत क्रमांक 16 • तिकीट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 20/04/2026

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- — **MG-00 : 1114** — ओम गं गणपतेय नमः लॉटरी - पुणे

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 5000/- — **3089** — श्री गणेश एन्टरप्रायझेस, दादर, मुंबई

तिसरे बक्षिस रु. 2000/- — **9394**

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 1546 | 2348 | 3023 | 3706 | 5441 | 6639 | 6859 | 7647 | 8967 | 9711 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 1828 | 2643 | 3912 | 4027 | 4067 | 4681 | 6017 | 6021 | 6216 | 8452 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 0534 | 4058 | 6302 | 6642 | 7490 | 8094 | 9453 | 9634 | 9744 | 9824 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

सातवे बक्षीस रु.100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1593 | 2602 | 3530 | 4396 | 5135 | 6319 | 6976 | 8204 | 9211 |
| | | 1689 | 2632 | 3637 | 4408 | 5143 | 6320 | 6981 | 8205 | 9288 |
| | | 1726 | 2666 | 3692 | 4464 | 5251 | 6357 | 7020 | 8243 | 9297 |
| 0000 | 0940 | 1731 | 2720 | 3735 | 4506 | 5255 | 6373 | 7094 | 8334 | 9341 |
| 0024 | 0965 | 1741 | 2724 | 3739 | 4541 | 5371 | 6447 | 7101 | 8351 | 9390 |
| 0052 | 1061 | 1839 | 2882 | 3768 | 4558 | 5405 | 6462 | 7189 | 8495 | 9448 |
| 0073 | 1083 | 1956 | 2902 | 3783 | 4565 | 5454 | 6467 | 7207 | 8505 | 9470 |
| 0102 | 1112 | 2016 | 3034 | 3839 | 4604 | 5471 | 6502 | 7325 | 8554 | 9494 |
| 0203 | 1131 | 2060 | 3048 | 3900 | 4629 | 5479 | 6563 | 7409 | 8625 | 9507 |
| 0209 | 1140 | 2132 | 3108 | 4004 | 4684 | 5499 | 6568 | 7413 | 8627 | 9548 |
| 0244 | 1148 | 2210 | 3124 | 4007 | 4716 | 5527 | 6569 | 7425 | 8783 | 9599 |
| 0266 | 1167 | 2216 | 3153 | 4022 | 4742 | 5552 | 6604 | 7472 | 8825 | 9601 |
| 0390 | 1185 | 2221 | 3213 | 4045 | 4760 | 5649 | 6633 | 7556 | 8859 | 9792 |
| 0420 | 1195 | 2242 | 3220 | 4079 | 4781 | 5925 | 6681 | 7588 | 8892 | 9848 |
| 0447 | 1218 | 2246 | 3239 | 4101 | 4856 | 5954 | 6682 | 7700 | 8958 | 9892 |
| 0512 | 1301 | 2270 | 3281 | 4104 | 4965 | 6004 | 6688 | 7742 | 8968 | 9900 |
| 0526 | 1360 | 2291 | 3365 | 4208 | 4976 | 6064 | 6806 | 7831 | 8996 | 9924 |
| 0650 | 1365 | 2355 | 3383 | 4232 | 4981 | 6066 | 6822 | 7877 | 9031 | 9929 |
| 0659 | 1411 | 2466 | 3467 | 4334 | 5045 | 6100 | 6846 | 7893 | 9123 | 9956 |
| 0750 | 1441 | 2561 | 3498 | 4341 | 5057 | 6141 | 6872 | 7917 | 9172 | 9989 |
| 0909 | 1571 | 2582 | 3517 | 4351 | 5063 | 6300 | 6946 | 7993 | 9176 | 9992 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ताः महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र गजलक्ष्मी सोम विकली लॉटरी

महाराष्ट्र राज्य लॉटरी | सोडत संध्या. 4:45 वाजता

सोडत दर सोमवार • सोडत क्रमांक 16 • तिकीट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 20/04/2026

पहिले बक्षिस रु. 10,000/- — **GL-01 : 7812**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 1535 | 2683 | 3389 | 4145 | 4817 | 5596 (वैशाली लॉटरी, बोरिवली) | 5818 (महावीर लॉटरी सेंटर, कोल्हापूर) | 6092 (विराग एन्टरप्रायझेस, नाशिक) | 7479 | 9639 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0224 | 1222 | 3656 | 3902 | 4341 | 4981 | 5476 | 5819 | 8071 | 8262 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 3110 | 3176 | 4339 | 5244 | 6399 | 7453 | 7598 | 7955 | 9458 | 9497 |
| पाचवे बक्षिस रु. 200/- | 1410 | 3185 | 3465 | 3910 | 4281 | 7141 | 7286 | 8221 | 9028 | 9303 |

सहावे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

सहावे बक्षिस रु. 100/-

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1251 | 2078 | 2622 | 3539 | 4445 | 5465 | 6460 | 7225 | 7776 | 8928 |
| | | 1411 | 2112 | 2629 | 3613 | 4452 | 5522 | 6466 | 7228 | 7809 | 8983 |
| 0002 | 0691 | 1446 | 2150 | 2728 | 3733 | 4461 | 5559 | 6467 | 7270 | 7838 | 9099 |
| 0036 | 0736 | 1486 | 2166 | 2762 | 3773 | 4476 | 5614 | 6631 | 7274 | 7873 | 9172 |
| 0044 | 0764 | 1544 | 2178 | 2809 | 3830 | 4578 | 5627 | 6638 | 7288 | 7922 | 9190 |
| 0053 | 0800 | 1574 | 2202 | 2827 | 3841 | 4579 | 5629 | 6667 | 7363 | 7966 | 9227 |
| 0054 | 0807 | 1635 | 2285 | 2911 | 3901 | 4606 | 5636 | 6669 | 7372 | 7973 | 9348 |
| 0072 | 0815 | 1637 | 2324 | 2926 | 4057 | 4873 | 5655 | 6671 | 7379 | 8002 | 9380 |
| 0091 | 0844 | 1711 | 2333 | 3026 | 4064 | 4951 | 5756 | 6674 | 7416 | 8206 | 9390 |
| 0139 | 0860 | 1713 | 2334 | 3053 | 4106 | 4996 | 5760 | 6722 | 7465 | 8281 | 9477 |
| 0180 | 0875 | 1803 | 2343 | 3073 | 4141 | 5053 | 5850 | 6743 | 7491 | 8283 | 9591 |
| 0193 | 0882 | 1814 | 2366 | 3074 | 4181 | 5056 | 5955 | 6823 | 7541 | 8388 | 9597 |
| 0199 | 0889 | 1817 | 2381 | 3250 | 4193 | 5133 | 5995 | 6836 | 7561 | 8485 | 9613 |
| 0205 | 0981 | 1821 | 2420 | 3304 | 4208 | 5135 | 6000 | 6905 | 7563 | 8518 | 9699 |
| 0216 | 1111 | 1854 | 2425 | 3320 | 4240 | 5137 | 6166 | 6913 | 7698 | 8546 | 9707 |
| 0225 | 1139 | 1871 | 2458 | 3329 | 4276 | 5232 | 6168 | 6931 | 7722 | 8739 | 9726 |
| 0304 | 1141 | 1881 | 2462 | 3340 | 4297 | 5253 | 6269 | 6963 | 7737 | 8763 | 9839 |
| 0370 | 1147 | 1888 | 2490 | 3345 | 4318 | 5299 | 6366 | 6981 | 7744 | 8774 | 9864 |
| 0526 | 1182 | 1891 | 2527 | 3355 | 4353 | 5352 | 6367 | 7012 | 7751 | 8778 | 9903 |
| 0589 | 1184 | 2015 | 2558 | 3375 | 4374 | 5359 | 6368 | 7023 | 7752 | 8817 | 9929 |
| 0625 | 1207 | 2020 | 2559 | 3386 | 4415 | 5385 | 6369 | 7079 | 7763 | 8829 | 9958 |
| 0660 | 1220 | 2075 | 2600 | 3528 | 4444 | 5452 | 6381 | 7197 | 7765 | 8832 | 9981 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. • अचूक निकालासाठी अधिकृत गॅझेट पाहावे. • प्रस्तुतकर्ता : महाराष्ट्र राज्य लॉटरी

# माझे ओबीसी प्रमाणपत्र खरे नगरसेविका सहर शेखचा दावा

■ ठाणे

**बोगस** ओबीसी प्रमाणपत्र सादर केल्याचा आरोप असलेली मुंब्र्यामधील एमआयएमची नगरसेविका सहर शेख हिने आज तिचे वडील युनूस शेख यांच्यासोबत पत्रकार परिषद घेऊन आपल्यावरील आरोपाचा इन्कार केला. २०११ मधील ओबीसी प्रमाणपत्र दाखवत त्यांनी ते खरे असल्याचे सांगितले.

ठाणे तहसीलदार उमेश पाटील यांनी सहर शेख यांचे जात प्रमाणपत्र अवैध असल्याचा अहवाल सादर करून याप्रकरणी तिच्यावर गुन्हा दाखल करण्याची शिफारस केली. त्यानंतर सहर शेख नॉट रिचेबल असल्याचे म्हटले जात होते. मात्र, मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर ती आयपीएल सामना बघताना दिसली होती. आज ती पत्रकारांसमोर आली. पत्रकार परिषदेत तिचे वडील युनूस शेख म्हणाले की, आम्ही उमेश शेख यांना भेटण्यासाठी गेलो होतो.

# नेताजींनी स्वातंत्र्य मिळवून दिले याचिकाकर्त्यालाच कोर्टाने फटकारले



■ नवी दिल्ली

**नेताजी** सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिंद सेनेने देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले, असे केंद्र सरकारने जाहीरपणे निवेदन करावे, या मागणीसाठी वारंवार जनहित याचिका दाखल करणाऱ्या याचिकाकर्त्यावर सर्वोच्च न्यायालय चांगलेच संतापले. अशा प्रकारे वारंवार याचिका दाखल करून न्यायालयाचा वेळ वाया घालवणार असाल तर यापुढे तुम्हाला न्यायालयात पाऊल ठेवू देणार नाही, अशा शब्दांत सर्वोच्च न्यायालयाने याचिकाकर्त्याला फटकारले.

पिनाकपानी मोहंती असे याचिकाकर्त्याचे नाव आहे. आझाद हिंद सेनेने देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले असे सरकारने जाहीर करावे, सर्व सशस्त्र (अहिंसेचे तत्त्व न मानणारे) क्रांतिकारकांनी देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी आपले आयुष्य पणाला लावले, अशा मागण्या मोहंती यांनी जनहित याचिकेद्वारे केल्या होत्या. सरन्यायाधीश सूर्य कांत आणि न्या. ज्यॉयमल्ल्या बागची यांच्या खंडपीठासमोर या याचिकेवर सुनावणी झाली. त्याप्रसंगी मोहंती यांची या मागण्यांसाठी केलेली याचिका यापूर्वी सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली होती, हे न्यायाधीशांना नोंदींवरून कळले. त्यामुळे सरन्यायाधीश एवढे संतापले की, 'सुप्रीम कोर्ट मे एन्ट्री बंद कर देंगे', अशा शब्दांत त्यांनी मोहंती यांना फटकारले.तसेच न्यायालयाच्या रजिस्ट्रीला मोहंती यांची या विषयावरील याचिका न स्वीकारण्याचे निर्देश दिले.

# वसई काँग्रेसमध्ये नवीन पदाधिकारी नियुक्त होणार

■ वसई

**काँग्रेसने** सर्वसामान्य आणि सक्रीय कार्यकर्त्यांना महत्त्वाची पदे देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी वसईत सृजन संघटन अभियान सुरू करण्यात आले आहेत.

वसईतील पारनाका येथील काँग्रेसच्या पक्ष कार्यालयात या सृजन संघटन अभियानाला सुरुवात झाली. या अभियानाअंतर्गत नवीन जिल्हाध्यक्ष, ९ शहर (ब्लॉक) अध्यक्ष आणि इतर सेल जिल्हाध्यक्षांच्या नियुक्त्या केल्या जाणार आहेत. पक्षाचे केंद्रीय निरीक्षक बेल्लाई नाईक यांनी सृजन संघटन अभियानाची माहिती देत मार्गदर्शन केले. त्यानंतर जिल्हाध्यक्ष पदासाठी सर्व इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या. या निवडीवर चर्चा करून त्याचा अहवाल दिल्लीतील नेतृत्वाला पाठविण्यात येणार आहे.

# भाजपातच निधी वाटपात दुजाभाव उबाठाचे नगरसेवक पडवळांचा दावा

■ मुंबई

**भाजपामध्येच** निधी वाटपात दुजाभाव होत आहे. याबाबत खासगी चर्चांमध्ये भाजपाचे काही नगरसेवक नाराजी व्यक्त करत असल्याचा आरोप उबाठाचे नगरसेवक सचिन पडवळ यांनी केला आहे. मुंबई महानगरपालिकेच्या विकास निधी वाटपावरून यापूर्वी विरोधकांनी सत्ताधाऱ्यांवर टीका केली होती. मात्र आता सत्ताधारी पक्षातच मतभेद समोर येत असल्याने या प्रकरणाला अधिकच राजकीय रंग चढला आहे. नगरसेवक सचिन पडवळ म्हणाले की, विरोधकांना निधी दिलाच जात नाही. पण, आता भाजपा पक्षातच निधी वाटपात दुजाभाव केला जात आहे. आमच्यावर अन्याय केला जातोच आहे, पण भाजपाच्या काही नगरसेवकांवर देखील अन्याय केला आहे. भाजपाचे नगरसेवक ही नाराजी खासगीत बोलून दाखवत आहेत. अंधेरी पश्चिम मतदारसंघात नगरसेवकांना सर्वाधिक निधी दिला आहे. आधी भाजपाच्या वांद्रे पश्चिमच्या नगरसेवकांकडे असलेली ताकद आता अंधेरी पश्चिमच्या नगरसेवकांकडे जाताना दिसत आहे. त्यामुळे भाजपा नगरसेवकांमध्ये नाराजी आहे.

# पनवेल रेल्वे स्थानकातील लिफ्ट कोसळली! ४ प्रवासी बचावले

■ पनवेल

**पनवेल** रेल्वे स्थानकात आज सकाळी प्लॅटफॉर्म क्रमांक ७ वरील लिफ्ट अचानक कोसळल्याने खळबळ उडाली. अपघाताच्या वेळी लिफ्टमध्ये ४ प्रवासी अडकले होते. मात्र, तातडीने बचावकार्य राबवून सर्वांना सुखरूप बाहेर काढण्यात आले. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

घटनेची माहिती मिळताच रेल्वे प्रशासन, पोलीस आणि आपत्कालीन पथक घटनास्थळी दाखल झाले. लिफ्टमध्ये अडकलेल्या प्रवाशांना बाहेर काढण्यासाठी त्वरित प्रयत्न करून काही वेळातच सर्व प्रवाशांची सुरक्षित सुटका करण्यात यश मिळाले. लिफ्ट कोसळण्यामागील नेमके कारण स्पष्ट झालेले नाही. तांत्रिक बिघाड की, देखभालीतील हलगर्जीपणा याबाबत प्रशासनाने चौकशी सुरू केली.



उद्योजक मुकेश अंबानी यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांनी कुटुंबासह श्री सिद्धीविनायक मंदिरात जाऊन दर्शन घेतले. (छाया दीपक साळवी)

# सातान्यातील दबावाच्या राजकारणाला घाबरू नका

**एकनाथ शिंदे यांचा हल्लाबोल**

■ सातारा

**सातारा** येथील गांधी मैदानावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर सभा घेऊन भाजपाचे नाव न घेता जोरदार हल्लाबोल केला. जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत पातळी सोडून राजकारण करण्यात आले. कोणीही कितीही दबावाचे राजकारण करू द्या. पण तुम्ही घाबरू नका, असा आदेश एकनाथ शिंदे यांनी दिला.

यावेळी उद्योगमंत्री उदय सामंत, पालकमंत्री शंभूराज देसाई, आमदार सुहास बाबर, संजीवराजे नाईक निंबाळकर, चंद्रहार पाटील, रवींद्र धंगेकर आदी उपस्थित होते. शिंदे म्हणाले, की सातारा ही माझ्यासाठी स्वाभिमानाची, शूर वीरांची भूमी आहे. मी उपमुख्यमंत्री म्हणून बोलत नाही तर सातारकर म्हणून बोलत आहे. सातारा हा एकेकाळी काँग्रेसचा बालेकिल्ला होता. पण आता वेगळी 'काँग्रेस' असल्याचे सांगत त्यांनी नाव न घेता भाजपाला टोला लगावला. नाव गेले की परत येत नाही. ते कमवायला फार कष्ट घ्यावे लागतात. तुम्ही मिळकत, संपत्ती, पैसा किती कमावली यापेक्षा माणसं किती कमावली. माणसांचे प्रेम किती कमावले हे महत्त्वाचे आहे. पण नुकत्याच झालेल्या येथील निवडणुकीत तुम्ही ते घालवले. साताऱ्याच्या राजकीय परंपरेमध्ये खालच्या पातळीवरचे राजकारण केले. जिल्हा परिषदेचा अध्यक्ष कोणी होऊ द्यात, पण लोकांच्या मनातला जिल्हा परिषदेचा अध्यक्ष हा शिवसेनेचाच आहे.

# २१ एप्रिलला राष्ट्रीय जनसंपर्क दिन कोल्हापुरात मेळाव्याचे आयोजन

■ कोल्हापूर

**जनसंपर्क** क्षेत्राची देशातील शिखर संस्था असलेल्या पब्लिक रिलेशन सोसायटी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.अजित पाठक यांनी नुकतेच कोल्हापूर चॅप्टरची घोषणा केली आहे. २१ एप्रिल रोजी राष्ट्रीय जनसंपर्क दिवसाचे औचित्य साधत या कोल्हापूर चॅप्टरचे उद्घघाटन होणार आहे. तसेच यानिमित्ताने जनसंपर्क, जाहिरात, विविध माध्यम क्षेत्रात कार्यरत व्यक्ती तसेच माध्यम क्षेत्रातील विद्यार्थी यांच्या मेळाव्याचे आयोजन २१ एप्रिल रोजी शिवाजी विद्यापीठाच्या सांख्यिकी विभागाच्या सभागृहात सकाळी १०:३० वाजता करण्यात आले आहे.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून कोल्हापूर विभागीय माहिती कार्यालयाचे उपसंचालक प्रवीण टाके, भारतीय सुरक्षा सेनेच्या दक्षिण कमांडचे जनसंपर्क अधिकारी अंकुश चव्हाण, सोलापूर विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ.रवींद्र चिंचोलकर उपस्थित राहणार आहेत.

शिवाजी विद्यापीठातील पत्रकारिता व जनसंवाद विभागाच्या विभागप्रमुख व कोल्हापूर चॅप्टरच्या अध्यक्ष, प्रा.डॉ. निशा मुडे-पवार या' पीआर मीट' च्या अध्यक्ष असतील. यावेळी 'एपीक्यूएन'चे संचालक व चॅप्टरचे उपाध्यक्ष डॉ. जगन्नाथ पाटील, महावितरणचे जनसंपर्क अधिकारी तथा चॅप्टरचे सचिव विश्वजीत भोसले, वारणा कॉलेजचे प्राचार्य डॉ. प्रताप पाटील, जिल्हा माहिती अधिकारी सचिन अडसूळ, जेष्ठ संपादक डॉ. दशरथ पारेकर, कार्यकारी संपादक राजकुमार चौगुले व कार्यकारणी सदस्य यांची विशेष उपस्थिती राहणार आहे.

# विरार-अलिबाग मार्गावर ७६५ रुपयांचा टोल! ४० वर्षे टोलवसुली

■ मुंबई

**विरार**-अलिबाग वाहतूक मार्गिका प्रकल्प 'बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा' या तत्त्वावर बांधून पूर्ण झाल्यानंतर संबंधित कंत्राटदार कंपनीला तब्बल ४० वर्षे टोलवसुली करता येणार आहे. या मार्गावर कार, जीप अशा चारचाकी वाहनांसाठी ७६५ रुपयांचा टोल आकारला जाणार आहे. प्रकल्प उभारणीचा खर्च प्रति किलोमीटर ३ हजार कोटींहून अधिकच्या घरात जाणार असल्याने राज्यातील आतापर्यंतच्या रस्ते प्रकल्पांपैकी हा सर्वात महागडा प्रकल्प ठरणार आहे.

विरार-अलिबाग मार्गासाठी टोल आकारणाऱ्या कंपनीवर मार्गाच्या देखभाल-दुरुस्तीची जबाबदारी असणार आहे. टोलवसुलीचा कालावधी ४० वर्षे असला तरी त्याचा आढावा सरकारच्या समितीकडून घेतला जाणार आहे. टोल आकारणीतून मिळणारी रक्कम पाहून टोलचा ४० वर्षांचा कालावधी कमीसुद्धा केला जाऊ शकतो. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून विरार ते अलिबाग यादरम्यान १२८ किलोमीटर लांबीच्या बहुउद्देशीय वाहतूक मार्गासाठी सध्या भूसंपादनाचे काम सुरू आहे. पालघर जिल्ह्यातील नवघर ते पेण तालुक्यातील बलावलीदरम्यान ९६.४१० किलोमीटर लांबीचा संपूर्ण महामार्ग आठ पदरी असेल. या मार्गावर मेट्रो रेल प्रकल्प प्रस्तावित आहे.

# जपानच्या ईशान्य किनाऱ्याजवळ ७.५ रिश्टर स्केलचा शक्तिशाली भूकंप!

**टोकिओ** - जपानच्या ईशान्य किनाऱ्याजवळ आज ७.५ तीव्रतेचा शक्तिशाली भूकंप झाला. जपान हवामान खात्याच्या माहितीनुसार, हा भूकंप पॅसिफिक महासागरात १० किमी खोलीवर झाला. इवाते, आओमोरी आणि होक्काइदो प्रांतांमध्ये किनाऱ्यालगत ३ मीटरपर्यंत उंचीच्या त्सुनामी लाटा येण्याची शक्यता वर्तवण्यात आली. तो नंतर मागे घेण्यात आली होती हा इशारा नंतर मागे घेण्यात आला या भूकंपामुळे मोठी हानी झाल्याचे वृत्त नाही.

भूकंपाचे धक्के नोंदवल्यानंतर तोहोकू शिंकानसेन बुलेट ट्रेन सेवा टोकियो स्टेशन आणि शिन-आओमोरी स्टेशन दरम्यान तात्पुरती थांबवण्यात आली. वीज कंपन्यांनी ओनागावा अणुऊर्जा प्रकल्पासह महत्त्वाच्या सुविधांवर सुरक्षिततेच्या तपासण्या सुरू केल्या.

संभाव्य नुकसान आणि त्सुनामीच्या परिणामावर लक्ष ठेवण्यासाठी आपत्कालीन उपाययोजना लागू करण्यात आल्या. त्सुनामीच्या इशाऱ्यामुळे ओत्सुची व कामाइशी यांसारख्या अनेक बंदर शहरांनी हजारो नागरिकांसाठी स्थलांतराचे आदेश जारी केले.

# वसई-विरारमधील ९३० बेवारस वाहनांची लिलाव प्रक्रिया सुरू

■ वसई

**वसई**-विरार शहरातून वाहतूक पोलिसांनी ९३० वेबारस वाहने जप्त केली. वाहनांचा लिलाव केला जाणार असून, लिलावाची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे

शहरात जागोजागी असणाऱ्या बेवारस वाहनांमुळे अनेक समस्या निर्माण होत असतात. त्यामुळे वसई वाहतूक पोलिसांनी विशेष मोहीम राबवून ९३० बेवारस वाहने जप्त केली आहेत. यातील १५ वाहने ही चोरी करून गुन्ह्यात वापरण्यात आली होती. यातील अनेक वाहने अनेक वर्षांपासून एकाच जागी पडून होती. या वाहनांच्या मालकांचा शोध घेऊन दोन वेळा नोटिसाही काढण्यात आल्या होत्या. मात्र तरीही या वाहनांचे मालक हे वाहने नेण्यासाठी पुढे आले नाहीत. त्यामुळे या वाहनांचा शासनाच्या संकेतस्थळावर लिलाव केला जाणार आहे.

आम्ही परिवहन विभागाला ९३० वाहनांचे मूल्यांकन करण्यास पत्र दिले आहे. त्याचे मूल्यांकन झाल्यानंतर ऑनलाईन स्वरूपात लिलाव केला जाईल, असे वसई वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रशांत लांगी यांनी सांगितले.

# सांडपाणी अडवून गवत शेती ६ जणांवर गुन्हे दाखल

■ नालासोपारा

**नालासोपाऱ्यात** सांडपाणी अडवून केल्या जाणाऱ्या बेकायदेशीर गवत शेती प्रकरणात ६ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले. वसई-विरार शहरात सांडपाणी वाहून नेणारे नैसर्गिक नाले आहेत. मात्र हे नाले अडवून त्यात बेकायदेशीरपणे गवत शेती केली जाते. या गवत शेतीमुळे परिसरात आरोग्याची मोठी समस्या निर्माण होत असते. डासांची उत्पत्ती होऊन डेंग्यू, हिवतापासारखे गंभीर आजार पसरतात. असाच एक प्रकार नालासोपारा पश्चिममेकडील शनी मंदिर-म्हाडा रोड परिसरात उघडकीस आला होता. महापालिकेचे विरोधी पक्षनेते मनोज पाटील यांनी महासभेतही हा मुद्दा उपस्थित केला होता. महापालिकेच्या पथकाने केलेल्या पाहणीत संबंधित ठिकाणी नाल्यामध्ये मातीचा भराव टाकून पाण्याचा नैसर्गिक प्रवाह बंद केल्याचे आढळले. साचलेल्या या सांडपाण्यावर मोठ्या प्रमाणात गवत वाढवून, त्याची कापणी करून विक्री केली जात होती.



सुपे येथे हिंदू-मुस्लीम ऐक्याचे प्रतीक मानल्या जाणाऱ्या शाह मन्सूर दर्ग्याला जय पवार यांनी भेट दिली. यावेळी त्यांनी दर्ग्यात दर्शन घेत सर्व समाजाच्या सुख-शांती, एकता आणि प्रगतीसाठी मनोभावे प्रार्थना केली.

# साताऱ्याचे पोलीस अधीक्षक तुषार दोशी यांची बदली

■ मुंबई

**साताऱ्यात** जिल्हा परिषद अध्यक्ष निवडीवेळी झालेल्या राड्यामुळे वादात अडकलेले साताऱ्याचे पोलीस अधीक्षक तुषार दोशी यांची सांगलीचे पोलीस अधीक्षक म्हणून बदली करण्यात आली आहे. त्यांच्या जागी पुण्याचे पोलीस उपायुक्त निखिल पिंगळे यांना पाठवण्यात आले आहे. सातारा जिल्हा परिषद अध्यक्ष निवडीवेळी मोठा गोंधळ उडाला होता. त्यावेळी पोलिसांनी साताऱ्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई आणि मंत्री मकरंद पाटील यांना धक्काबुक्की झाली होती. त्यानंतर त्यांच्यावर कारवाईची मागणी शिंदेंच्या शिवसेनेने केली होती. या वादानंतर विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी तुषार दोशींच्या निलंबनाचे आदेशही दिले होते.

# टोरेंटतर्फे अग्निसुरक्षा जागरूकता आपत्कालीन प्रशिक्षण सत्राचे आयोजन

■ भिवंडी

**टोरेंट** पॉवर लिमिटेड, भिवंडीतर्फे १४ ते २० एप्रिल या कालावधीत एक व्यापक 'अग्नि सुरक्षा जागरूकता आणि आपत्कालीन प्रतिसाद प्रशिक्षण' कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कर्मचाऱ्यांमधील सज्जता, प्रतिबंधात्मक जागरूकता आणि आपत्कालीन परिस्थितीत प्रतिसाद देण्याची क्षमता वाढवणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.



या सत्राचे संचालन भिवंडी महानगरपालिका अग्निशमन दलाच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी केले. अग्निशमन केंद्र प्रभारी नरेंद्र बावणे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने प्रत्यक्ष अग्निशमनच्या अनुभवातून मिळालेली व्यावहारिक माहिती यावेळी सामायिक केली. सहभागी कर्मचाऱ्यांना आग प्रतिबंधक तंत्रे, औद्योगिक वातावरणातील आगीचे सामान्य धोके आणि आपत्कालीन परिस्थितीत घ्यावयाची योग्य काळजी व कृती याबाबत सविस्तर शिक्षण देण्यात आले.

# अभिनेत्री नंदिता पाटकरचे उत्तराखंडच्या त्रियुगीनारायण मंदिरात विधिवत लग्न

**मराठी चित्रपट आणि मालिका विश्वातील अभिनेत्री नंदिता पाटकर सध्या तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आली आहे. वयाच्या ४४ व्या वर्षी मुंबईत कायदेशीर पद्धतीने विवाह केल्यानंतर आता तिने नाट्य दिग्दर्शक विपुल महागावकरसोबत त्रियुगीनारायण मंदिरात पारंपरिक पद्धतीने विधिवत लग्न केले. या सोहळ्याचे फोटो आणि भावना व्यक्त करणारी पोस्ट तिने शेअर केली. त्या पोस्टला चाहत्यांकडून चांगलीच पसंती दिली आहे.**

■ मुंबई

**काही** दिवसांपूर्वी नंदिता पाटकर आणि विपुल महागावकर यांनी मुंबईत कोर्ट मॅरेज केले होते. त्यानंतर आता उत्तराखंडमधील त्रियुगीनारायण मंदिरात कुटुंबीय आणि जवळच्या व्यक्तींच्या उपस्थितीत विधिवत विवाहसोहळा पार पडला. समाजमाध्यमावरील या चित्रांमध्ये नंदिता पारंपरिक नववधूच्या वेशात दिसत आहे. दोघांचे फोटो मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत. लग्नानंतर भावना व्यक्त करत नंदिताने लिहिले की, काही क्षण आपण ठरवतो, तर काही क्षण आपल्यासाठी आधीच ठरलेले असतात आणि हा त्यापैकीच एक खास क्षण होता. एखाद्या व्यक्तीवर विश्वास ठेवणे आणि स्वतःभोवतीचे कवच दूर करणे सोपे नव्हते, पण ते हळूहळू आपोआप घडले आणि आम्ही दोघांनी एकत्र येण्याचा निर्णय घेतला.



# तामिळनाडूमध्ये भाजपाचे बिहार मॉडेल चालू देणार नाही! राहुल गांधींचा हल्ला

■ चेन्नई

**तामिळनाडूमध्ये** निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी थुथुकुडी येथे आयोजित निवडणूक सभेला संबोधित केले. यावेळी त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजपावर जोरदार टीका केली. राहुल गांधी यांनी म्हटले की, संघ ही तामिळविरोधी आणि द्रविडविरोधी संघटना आहे. संघ आणि भाजपा यांना वाटते की, भारत हा एक लोक, एक संस्कृती, एक धर्म आणि एक भाषा असलेला देश असावा. भाजपा भ्रष्टाचाराच्या माध्यमातून अण्णा द्रमुकला नियंत्रित करत आहे. त्यांचा तामिळनाडूमध्ये बिहार मॉडेल लागू करण्याचा प्रयत्न करत आहे. तो आम्ही यशस्वी होऊ देणार नाही.

राहुल गांधी यांनी म्हटले की, जुनी अण्णा द्रमुक, जी तामिळनाडूच्या जनतेची सेवा करत होती, ती आता पूर्णपणे संपली आहे. आजची अण्णा द्रमुक पोकळ असून, भाजपा तिचा वापर तामिळनाडूच्या राजकारणात प्रवेश करण्यासाठी करू इच्छित आहे. अण्णा द्रमुकचे नेते भ्रष्टाचारामुळे कमकुवत झाले आहेत.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# वर्षभरापूर्वीचा पहलगामचा क्रूर हल्ला

**पाकिस्तान** पुरस्कृत दहशतवादाच्या मुसक्या पूर्णपणे आवळल्या जात असताना फुटीरतावाद्यांच्या मदतीने दहशतवाद्यांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न गेल्या वर्षी सुरू झाला. जवळपास दहा वर्षांनंतर काश्मीरमध्ये वर्षभरापूर्वी याच दिवशी पहलगाम इथल्या पर्यटकांवर हल्ला केला गेला. यात जवळपास २६ पर्यटकांचा मृत्यू झाला ज्यामध्ये महाराष्ट्राचेही सहा पर्यटक होते. वर्षभरापूर्वीचा हा अत्यंत क्रूर पद्धतीचा हल्ला म्हणजे पुन्हा एकदा संपूर्ण देशातच अस्थिरता माजवण्याची सुरुवात ठरणार होती. कारण 'लष्कर-ए-तोयबा'च्या आणि 'जैश-ए-मोहम्मद'च्या या दहशतवाद्यांनी पर्यटकांना त्यांचा धर्म विचारून गोळ्या घालण्याचे अत्यंत नीच कृत्य केले होते. त्या मुद्यावरून देशभरात प्रतिक्रिया उमटतील आणि दंगे भडकतील असादेखील त्यामागचा कट होता. परंतु या हल्ल्याचे सगळे सूत्रसंचालन पाकिस्तानातून झाल्याने त्याच्या मूळावरच पुन्हा घाव घालणे भारतासाठी पहिले कर्तव्य ठरले. त्यानंतर पुढच्या दोन आठवड्यांत भारताने ऑपरेशन सिंदूर राबवून पाकिस्तानातल्या दहशतवादी ठिकाणांचा बिमोड तर केलाच. परंतु जो पाकिस्तान वारंवार अण्वस्त्रांची धमकी देत होता, त्याच्या या अण्वस्त्र ठिकाणांना कायमचे टाळे ठोकण्याचाही अभूतपूर्व प्रकार केला. पहलगामचा हा हल्ला दोन कारणांनी अत्यंत धोकादायक ठरला होता. एक तर या हल्ल्याने दहशतवादाचा धोका कायम असल्याचे पुन्हा अधोरेखित झाले होते. आणि ज्या काश्मिरमध्ये गेल्या सहा वर्षांपासून शांतता प्रस्थापित होत होती, तिथल्या पर्यटनाला पुन्हा पूर्वीसारखे सुगीचे दिवस येऊ लागले होते. त्या प्रयत्नांनादेखील सुरुंग लावण्याचा उद्योग या हल्ल्याने केला. धर्म विचारून अत्यंत क्रूर पद्धतीने लहान मुलांसमोर त्यांच्या आईवडिलांना गोळ्या घालणारे हे दहशतवादी केवळ भारताचेच नव्हे तर जगातल्या सगळ्या मानवतेचे भयंकर शत्रू ठरतात. अशा प्रकारच्या हल्ल्याने भारत दबावाखाली येईल अशीदेखील दहशतवाद्यांना आणि पाकिस्तानला अपेक्षा होती. परंतु गेल्या दहा वर्षांत काश्मीरमधला दहशतवाद तर संपुष्टात आलाच. परंतु देशाच्या विविध शहरांमध्ये बॉम्बस्फोट होण्याची जी कायम भीती वाटत होती तीदेखील नाहीशी करण्यात यश मिळाले.

**धर्म विचारून गोळ्या घालण्याचा क्रूर प्रकार**

गेल्या चाळीस वर्षांत पाकिस्तानपुरस्कृत या दहशतवादापुढे भारताने नांगी टाकल्याचेच चित्र दिसत होते. कारगिल युद्धाचा प्रकार सोडला तर ९० च्या दशकामध्ये देशातल्या सगळ्या प्रमुख शहरांमध्ये अतिशय नियोजनपूर्वक घडवून आणलेले बॉम्बस्फोट म्हणजेच संपूर्ण भारत दहशतीच्या किंवा बॉम्बस्फोटाच्या आगीत होरपळून काढायचा. आणि काश्मीरसारख्या मुद्यावर भारताला वेठीला धरायचे. ही रणनीती पाकिस्तानने आखली होती. भारताशी थेट युद्ध करून आपले उद्दिष्ट साध्य होत नाही आणि थेट युद्धात आपल्याला यशही मिळत नाही. याची जाणीव असल्याने पाकिस्तानने दहशतवादाच्या माध्यमातून हे छुपे युद्ध सुरू केले. आणि ते बऱ्याच अंशी यशस्वी पण ठरले होते. कारण १९९० ते २०१० पर्यंत काश्मीरसह देशाच्या विविध भागांत जे बॉम्बस्फोट आणि हल्ले झाले त्यात एक हजारापेक्षा जास्त नागरीकांचे प्राण गेले. सुरक्षा जवानांचे हौतात्म्य ही सर्वात मोठी चिंतेची बाब ठरली होती. ज्यावेळी ऊरी आणि पठाणकोटच्या लष्करी तळांवर हल्ले झाले ज्यात लागोपाठ साठ ते पासष्ट लष्करी जवानांना हौतात्म्य पत्करावे लागले. या घटना भारतासाठी शेवटच्या सहनशीलतेची शेवटची कसोटी ठरल्या. त्यानंतरचा सर्जिकल स्ट्राईक किंवा हवाई हल्ले या दोन्ही माध्यमातून भारत-पाकिस्तानच्या हद्दीत घुसू शकतो. आणि तिथे पोसली जाणारी ही दहशतीची हिरवी विषारी पिलावळ ठेचून काढू शकतो, हे सिद्ध झालेले आहे. पाकिस्तानला आणि तिथल्या दहशतवाद्यांनासुद्धा भारत अशा प्रकारचेसुद्धा हल्ले करू शकतो याचीच दहशत वाटू लागली होती. दुर्दैवाने काश्मीरमधल्या फुटीरतावादी आणि देशविरोधी काही प्रवृत्तींनी पुन्हा एकदा दहशतवादाला मदत केली. आणि पहलगामच्या ज्या पर्यटन स्थळावर नेहमी बंदोबस्त ठेवला जात होता तो एक विशिष्ट मार्ग खुला ठेवण्याचा देशविघातक कट केला. त्या मार्गानेच हे दहशतवादी घुसले आणि त्यांच्या अंदाधुंद गोळीबारामध्ये २६ जणांचे प्राण गेले.

**गुप्तचर यंत्रणा मजबूत हव्यात**

पहलगामनंतर झालेले ऑपरेशन सिंदूर म्हणजे पाकिस्तानला कायमचे जायबंदी करणारे निर्णायक युद्ध ठरले. यापुढे भारतात दहशतवादी हल्ले करता येणार नाहीत याची पूर्ण खूणगाठ दहशतवाद्यांना वाटू लागली होती. परंतु निराशा आणि सूडाने पछाडलेल्या दहशतवाद्यांनी वेगळे तंत्र वापरून भारतातल्या उच्चशिक्षित म्हणजेच डॉक्टर इंजिनिअरसारख्या धर्मांध तरुणांना जिहादसाठी प्रवृत्त केले. या उच्चशिक्षित तरुणांच्या दहशतवादी कृत्यांविषयी कोणालाही सहजपणे संशय येणार नाही अशी त्यांना खात्री वाटली म्हणूनच त्यांनी या डॉक्टर, इंजिनिअरसारख्या तरुणांना दहशतवादी नेटवर्कमध्ये सामिल करून घेतले आणि त्या कटानुसारच १० नोव्हेंबर २०२५ ला दिल्लीच्या लाल किल्ल्याजवळ बॉम्बस्फोट घडवला गेला म्हणजे पुन्हा एकदा दिल्ली टार्गेट करून देशभरात दहशतवादाची सुरुवात करण्याचा हेतू ठेवला गेला होता. १९९६ ते डिसेंबर २०१३ पर्यंत एकट्या दिल्लीमध्ये सतरा वेळा बॉम्बस्फोट घडवण्यात दहशतवाद्यांना यश आले. त्यात ११७ लोकांना प्राण गमवावे लागले होते. याशिवाय मुंबईतला २००८ चा २६ नोव्हेंबरचा दहशतवादी हल्ला, पुन्हा २०१२ मधला लोकल बॉम्बस्फोट हे प्रकार चालूच होते. या दहशतवादाची मान पिरगळण्यात भारत यशस्वी झाला असल्याने अस्वस्थ असलेले दहशतवादी काही ना काही कुरापती चालू ठेवू शकतात. म्हणूनच पहलगाम हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर कडेकोट बंदोबस्त ठेवला गेला आहे. भारताला भविष्यकाळात यापेक्षाही अधिक सुरक्षित आणि भक्कम करायचे असेल तर केंद्र सरकारला आपल्या गुप्तचर यंत्रणा अधिक भक्कम कराव्या लागतील. कारण दहशतवादी आणि त्यांचे पोषिंदे अगदी राजकीय लाभासाठीसुद्धा वेगवेगळे तंत्र वापरत आहेत.


## सुविचार

विलास कोळेकर
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

घरातल्या निर्णयासाठी बाहेरच्या माणसांची गरज लागली तर, समजून जायचं की घरातील नाती संपलेली आहेत.

## पंचांग

मंगळवार, २१ एप्रिल २०२६
शक १९४८ पराभवनामसंवत्सर



रवी उदय- ०६-१९
रवी अस्त- १८-५७

* वैशाख शुक्ल पंचमी
* नक्षत्र - मृग

-: जन्मराशी :-
००-०१ ते १३-०१ वृषभ
१३-०२ ते २४-०० मिथुन

आद्य शंकराचार्य जयंती, मरुळाराध्य जयंती, देव वेतोबा वाढदिवस- आरवली

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादक: **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभाग: ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेल: contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती




### फणसाचे कबाब



**साहित्य :** कच्च्या फणसाचे गरे- ५०० ग्रॅम, कांद्याची पेस्ट- १ कप, बारीक चिरलेला कांदा- १/२ कप, कच्च्या पपईची पेस्ट- २ चमचे, कबाब मसाला- २ चमचे, मीठ आणि लाल मिरची पावडर- चवीनुसार, गरम मसाला आणि जिरं पावडर- चिमूटभर, कसुरी मेथी- १ चमचा, क्रश केलेल्या लाल मिरच्या- २ चमचे, चाट मसाला- २ चमचे, ब्रेड क्रॅम्स, तेल (शॅलो फ्राय करण्यासाठी).

**कृती-** फणसाचे गर मऊ, मॅश होण्यासारखे होईपर्यंत उकळवा. त्यानंतर त्यातील पाणी काढून टाका आणि मॅश करा. त्यात एकही गुठळी राहता कामा नये. मॅश करून झाल्यावर त्यात तेलव्यतिरिक्त इतर पदार्थ म्हणजेच कांद्याची पेस्ट, बारीक चिरलेला कांदा, पपईची पेस्ट, कबाब मसाला, मीठ, लाल मिरची पावडर, गरम मसाला, जिरं पावडर, कसुरी मेथी, क्रश केलेल्या लाल मिरच्या आणि चाट मसाला घाला व व्यवस्थित मिक्स करा. मिश्रणाचे १८-२० समान भाग करा आणि त्याचे गोळे तयार करून हाताने दाबून फ्लॅट करा. हे गोळे तयार करताना हाताला थोडंस तेल लावा. म्हणजे मिश्रण हाताला चिकटणार नाही.

त्यानंतर कटलेट ब्रेड क्रम्समध्ये घोळवून घ्या. पॅन थोडा गरम झाल्यावर त्यात थोडं तेल घाला आणि तेल गरम करा. तेल गरम झाल्यावर त्यावर कटलेट ठेवा. कटलेट दोन्ही बाजूने ब्राऊनीश होईपर्यंत नीट फ्राय करा किंवा तुम्ही कटलेट ग्रील देखील करू शकता.



## क्रीडा

# मुंबईचा गुजरातवर ९९ धावांनी दणदणीत विजय



**तिलक वर्माचे धडाकेबाज शतक**

**तिलक वर्माचे धडाकेबाज शतक आणि अश्वनी कुमारने ४ गडी टिपल्यामुळे आज मुंबई इंडियन्सने गुजरात टायटन्सवर ९९ धावांनी विजय मिळवला. या विजयासह मुंबईचा संघ आयपीएलच्या गुणतालिकेत ४ गुणांसह तळावरुन आठव्या स्थानावर पोहोचला. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर झालेल्या आयपीएलच्या ३० व्या सामन्यात मुंबईने १९९ धावा केल्या होत्या. या प्रत्युत्तरात गुजरातने मुंबईचा वेगवान गोलंदाज अश्वनी कुमारसह अन्य गोलंदाजांच्या अचुक माऱ्यापुढे नांगी टाकली. परिणामी गुजरातला १५.५ षटकांत सर्वबाद १०० धावांपर्यंत मजल मारता आली.**

■ अहमदाबाद

**पदार्पण** करणारा मुंबईचा सलामीवीर दिनेश मलेवार फेल ठरला. तो फक्त २ धावा करून बाद झाला. त्यानंतर क्विंटन डी कॉकला रबाडाने २ धावांवर बाद केल्यामुळे मुंबईची अवस्था ३.३ षटकांत २ बाद २५ धावा अशी झाली होती. रबाडाने सूर्यकुमार यादवचा त्रिफळा उडवला. त्याने २५ धावा केल्या. नमन धीर आणि तिलक वर्मा या जोडीने संघाची धावसंख्या १२.२ षटकांत ३ बाद ९६ वर पोहोचवली. मात्र नमन धीर स्थिरावल्यानंतर चुकीचा फटका मारुन ३२ चेंडूत ४५ धावांवर झेलबाद झाला. मग तिलक वर्माने गुजरातच्या गोलंदाजांवर हल्ला चढवून चौकार आणि षटकार मारण्यास सुरुवात केली. त्याने ३३ चेंडूत अर्धशतक पूर्ण केले. त्यानंतर त्याने आपल्या धावांची गती आणखी वाढवली. मात्र त्यात हार्दिक पंड्याला मोहम्मद सिराजने तंबूत धाडले. त्याने १६ चेंडूत १५ धावा केल्या. मग शेवटपर्यंत तिलक वर्माने आपली धडाकेबाज खेळी सुरु ठेवली आणि त्याने ४५ चेंडूत ७ षटकार आणि ८ चौकारांसह नाबाद १०१ धावा केल्या. शेर्फेन रूदरफोर्डने १ धाव करुन नाबाद राहिला. त्यामुळे मुंबईने निर्धारित षटकात ५ बाद १९९ धावांपर्यंत मजल मारली.

या धावसंख्येचा पाठलाग करताना गुजरातची सुरुवात खराब झाली. साई सुदर्शनला खाते उघडण्यापुर्वीच डावाच्या पहिल्याच चेंडूवर बाद झाला. मग दुसऱ्या षटकात जोस बटलरलाही हार्दिक पंड्याने पायचित केले. शुभमन गिल १४ धावा करुन माघारी परतला. अश्वनी कुमारने त्याला शिकार बनवले. मग मुंबईचा फिरकीपटू मिचेल सँटनरने एकाच षटकात वॉशिंग्टन सुंदर (२६) आणि ग्लेन फिलिप्सला (६) झटपट बाद केल्यामुळे गुजरातचा डाव अडचणीत आला.

गुजरातची अवस्था ७.४ षटकांत ५ बाद ५५ धावा अशी झाली होती. राहुल तेवतिया आणि एम शाहरुख खान या जोडीने संघाचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला. मात्र ८ धावांवर खेळत असताना तेवतियाला अश्वनी कुमारने यष्टीरक्षकाकडे झेलबाद केले. एम शाहरुख खान (१७)आणि रशीद खान (४) आणि कागिसो रबाडा (१२) यांना मोठे फटके मारता आले नाहीत. गुजरातला १०० धावांपर्यंत रोखल्यामुळे मुंबईने ९९ धावांनी विजय मिळवला.

# बीपीसीएल आणि आयएसपीएल संघ उपांत्यपूर्व फेरीत

## महिला गटात राजमाता जिजाऊ, धर्मवीर, विवेक बाद फेरीत

■ मुंबई



**क्रीडाप्रेमी** आमदार सुनील राऊत यांच्या संयोजनाखाली सुरू असलेल्या आमदार चषक कबड्डी स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी पुरुषांच्या व्यावसायिक गटात भारत पेट्रोलियम (बीपीसीएल), इन्शुअरकोट स्पोर्ट्स प्रा.लि. (आयएसपीएल), ठाणे महानगरपालिका, मीरा-भाईंदर महानगर पालिका, मुंबई बंदर आणि संत सोपान काका बँकेने उपांत्यपूर्व फेरीत स्थान मिळवले आहे. महिलांच्या गटात राजमाता जिजाऊ, धर्मवीर, स्वराज्य स्पोर्ट्स, शिवशक्ती आणि विवेक स्पोर्ट्स क्लबने गटविजेतेपद पटकावत उपांत्यपूर्व फेरीत मजल मारली.

हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त विक्रोळी पूर्वेला टागोर नगरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानात उभारलेल्या क्रीडानगरीत दुसऱ्या दिवशी मॅटवरच्या कबड्डीचा अस्सल व्यावसायिक संघांचा थरार हजारो कबड्डीप्रेमींना याची देही अनुभवता आला. कालच प्रभादेवीत बाजी मारलेल्या बीपीसीएलने आज मैदानात उतरताच आधी रिझर्व्ह बँकेचे ३६-१८ असे डिपॉझिट जप्त करत खणखणीत विजय मिळवला. बीपीसीएलच्या मिलन दहिया आणि प्रसाद दिघोळेच्या खेळापुढे रिझर्व्ह बँकेचे काहीएक चालले नाही. या एकतर्फी विजयानंतर बीपीसीएलने ठाणे महानगरपालिकेविरुद्धचा संघर्ष १४-१३ अशा एका गुणाने जिंकत थेट उपांत्यपूर्व फेरीत स्थान मिळवले. ठाणे महानगरपालिकेने आपल्या दुसऱ्या सामन्यात रिझर्व्ह बँकेचा ४६-३४ असा धुव्वा उडवत अंतिम आठ संघांत प्रवेश केला.

# ईटीपीएलची ग्लासगो संघाची घोषणा

## ख्रिस गेल व मुगाफी ग्रुपकडे मालकी

**मुंबई-** युरोपमधील पहिली आणि आयसीसी मान्यता प्राप्त टी-२० फ्रँचायझी लीग असलेल्या युरोपियन टी-२० प्रीमियर लीगने (ईटीपीएल) आज 'ग्लासगो मुगाफियन्स' या आपल्या ग्लासगो स्थित संघाची घोषणा केली. हा संघ स्कॉटलंडचे प्रतिनिधित्व करेल. संस्थापक भागीदार म्हणून मुगाफी ग्रुपचा पाठिंबा लाभलेल्या या फ्रँचायझीची मालकी तन्शा बत्रा यांच्याकडे आहे; तर वेस्ट इंडिजचा दिग्गज खेळाडू ख्रिस गेल हा या संघाचा सहमालक आणि जागतिक ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून यात सहभागी झाला. ईटीपीएलचा पहिला सीझन २६ ऑगस्ट ते २० सप्टेंबर या कालावधीत पार पडेल. यामध्ये ग्लासगो, मस्टरडॅम, एडिनबर्ग, डब्लिन, बेलफास्ट आणि रॉटरडॅम या शहरांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या ६ फ्रँचायझी सहभागी होतील. एकूण ३३ सामने यात खेळवले जातील.

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

**जाहीर निवेदन**

**सौरकृषीपंपाबाबतच्या तक्रार निवारण मेळाव्याचे आयोजन**

पालघर जिल्हातील तक्रारींचे निवारण करण्यासाठी महावितरणने बुधवार दि.२२ एप्रिल २०२६ व गुरूवार दि.२३ एप्रिल २०२६ रोजी उपविभागीय स्तरावर तक्रार निवारण मेळाव्याचे आयोजन केलेले आहे.

विक्रमगड, जव्हार आणि मोखाडा उपविभागांसाठी सौरकृषी पंपाबाबत तक्रार निवारण मेळावा. — दि. २२. एप्रिल. २०२६, ठिकाण –जव्हार उपविभाग कार्यालय

तलासरी, डहाणू बोईसर पालघर सफाळे उपविभागांसाठी सौरकृषी पंपाबाबत तक्रार निवारण मेळावा. — दि. २३ एप्रिल २०२६, ठिकाण – डहाणू उपविभाग कार्यालय

जव्हार व डहाणू उवविभागीय कार्यालयामध्ये सौरकृषीपंपाबाबतच्या तक्रारी जाणून घेवुन त्याचे निवारण केले जाणार आहे. या वेळी पालघर महावितरणचे अधिकारी, शाखा प्रमुख व सौरकृषीपंप एजन्सीचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. शक्य तेवढ्या तक्रारींचे निवारण जागेवरच होणार असल्याने वीजग्राहकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन पालघर महावितरणने केले आहे.

# एसएनडीटीत आंतरविद्यापीठ खो-खो स्पर्धेला सुरुवात

■ मुंबई

**एसएनडीटी** महिला विद्यापीठात आयोजित अखिल भारतीय आंतरविद्यापीठ खो-खो स्पर्धेचे (महिला) उद्घाटन आज सायंकाळी मोठ्या उत्साहात झाले. एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या जुहू कॅम्पस येथे या स्पर्धेचे उद्घाटन सोहळ्यास प्रमुख पाहुण्या म्हणून आंतरराष्ट्रीय खो-खो खेळाडू प्रियंका इंगळे, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाच्या कुलगुरू प्रा. उज्ज्वला चक्रदेव, एआययू निरीक्षक डॉ. सुजित एस नायर, प्रकुलगुरू प्रो रुबी ओझा, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी विकास देसाई, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाच्या संचालिका डॉ. कविता खोलगडे, अधिष्ठाता एच. टी.जाधव, डॉ. नितीन प्रभूतेंडोलकर यांची प्रमुख उपस्थिती होती. एसएनडीटी वुमन्स युनिव्हर्सिटी मुंबई विरुद्ध पीटीआर शुक्ला छत्तीसगड यांच्यात पहिला सामना झाला. एसएनडीटीने ७ गुणाने विजय मिळवला एमडीयू रोहतकने कालिकत विद्यापीठावर ३ गुणांनी विजय मिळवला.

**बृहन्मुंबई महानगरपालिका**
**(घनकचरा व्यवस्थापन आर/उत्तर विभाग)**

क्र. सहा. अभि. / घकव्य / 413 / आर / उत्तर दि. 20.04.2026

**जाहिरात**

**''आर/उत्तर विभागातील दहिसर हिंदू स्मशानभुमीच्या दैनंदिन रखरखाव व साफ सफाईच्या व सुविधा''**

**विषय:- ''आर/उत्तर विभागातील दहिसर हिंदू स्मशानभुमीच्या दैनंदिन रखरखाव व साफसफाईची कामे व सुविधा पुरविण्याचे काम करण्याबाबत.**

आर/उत्तर विभाग घन कचरा व्यवस्थापन खात्यामार्फत **''आर / उत्तर विभागातील दहिसर हिंदू स्मशानभुमीच्या दैनंदिन रखरखाव व साफसफाईची कामे व सुविधा पुरविण्याचे काम''** राबविण्याकरीता नव्याने संस्थाची नेमणूक करण्याकरीता मुंबई महानगरपालिका सफाई खात्यातील विविध योजने अंतर्गत ज्या सेवाभावी संस्था/कंपनी यांनी बृहन्मुंबई महानगर पालिकेसाठी पूर्वी काम केले आहे त्यामधील फक्त नोंदणीकृत सभासद सहकारी सेवाभावी संस्था / कंपनी व ज्या सेवाभावी संस्था / कंपनी स्थापनेच्या मुख्य उद्देश त्यांचे सभासदांना रोजगार देणे असा असेल. अशाच सेवाभावी संस्था / कंपनी त्यांच्या चांगल्या कामाच्या मुल्यमापनासापेक्ष या कामासाठी पात्र ठरतील. सेवाभावी संस्था / कंपनींना १ वर्षाचा अनुभवाचा कार्यदेश प्राप्त असणे आवश्यक आहे. अशाच सहकारी सेवाभावी संस्था / कंपनींना आर/उत्तर विभागातील दहिसर हिंदू स्मशानभुमीच्या दैनंदिन रखरखाव व सफाईसाठी दि. **01.05.2026** ते दि. **30.09.2026** या कालावधी करिता मोहोरबंद ईच्छापत्र मागवित आहोत.

| अनु. क्र. | योजनेचे नाव | कामाकरिता निवड करावयाच्या संस्था |
| --- | --- | --- |
| १ | **''आर/उत्तर विभागातील दहिसर हिंदू स्मशानभुमीच्या दैनंदिन रखरखाव व साफसफाईची कामे व सुविधा पुरविण्याचे काम ''** | **०१ संस्थाच्या (९ एकक)** |

अर्जाचा नमुना आणि याबाबतची नियमावली, आर / उत्तर विभाग कार्यालयातील सहाय्यक अभियंता (घन कचरा व्यवस्थापन) यांच्या कार्यालयात दि.**21.04.2026** ते दि.**27.04.2026** या कालावधीत, सकाळी 10.30 ते दुपारी 4.00 यावेळेत मिळु शकेल. पात्र संस्थांच्या / नोंदणीकृत उपक्रमे (कंपनी) यादी मधुन सोडत काढण्यात येईल. सदर सोडती मध्ये यशस्वी झालेल्या संस्थांना कामाचे वाटप, विभागाचे सहाय्यक आयुक्त, योजनेच्या नियमावलीतील नमुद केलेल्या अटी व शर्तीनुसार करतील. कामाचा कालावधी दि. **01/05/2026** ते दि. **30/09/2026** या कालावधीकरिता किंवा प्रमुख अभियंता (घ. क. व्य.) कार्यालया मार्फत सदर योजना राबविण्याबाबत नव्याने निर्देश देण्यात येतील, त्यानुसार संस्थांना स्वच्छतेचे काम करावे लागेल.

इच्छुक संस्थांनी अधिक तपशिल, अर्ज व शपथपत्राच्या नमुन्यासाठी आर / उत्तर विभाग घनकचरा व्यवस्थापन कार्यालयात संपर्क करावा किंवा महानगरपालिकेच्या **http://portal.mcgm.gov.in** या संकेत स्थळावर भेट द्यावी.

संस्थेने आर/उत्तर विभाग कार्यालयात अर्ज करण्याची अंतिम तारीख दि. **27.04.2026** (दुपारी **2.00** वाजे पर्यंत). नमूद केलेल्या कार्यालयीन कालावधी नंतर दाखल करण्यात आलेले अर्ज विचारात घेण्यात येणार नाहीत

सही/-
पीआरओ/१२६/जाहि./२०२६-२७ — सहाय्यक आयुक्त 'आर/उत्तर' विभाग

खाण्यापूर्वी तसेच शौचानंतर साबणाने हात स्वच्छ धुवावे

# उधमपूरमध्ये बस दरीत कोसळली! २० जणांचा मृत्यू

■ उधमपूर

**जम्मू-श्रीनगर** मार्गावर उधमपूर जिल्ह्यात एक प्रवासी बस दरीत कोसळल्याने २० जणांचा मृत्यू झाला. अनेक प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह अनेक नेत्यांनी दुःख व्यक्त केले आहे. पंतप्रधानांनी मृतांच्या नातेवाईकांना २ लाख रुपये आणि जखमींना ५० हजार रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली आहे.

अधिकाऱ्यांनी सांगितले की, हा अपघात आज सकाळी रामनगर परिसरातील कागोट गावाजवळ झाला. नियंत्रण सुटून बस खोल दरीत कोसळली. ही बस एका



दुर्गम गावातून उधमपूरकडे जात होती. एका वळणावर चालकाचे नियंत्रण सुटल्याने वाहन दरीत कोसळले. या अपघातात अनेक जण जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यापैकी काहींची प्रकृती गंभीर आहे. घटनेनंतर तातडीने मदत आणि बचावकार्य सुरू करण्यात आले.

प्रशासन आणि पोलिसांच्या पथकांनी स्थानिकांच्या मदतीने जखमींना रुग्णालयात पोहोचवले. अपघातानंतर केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनी उधमपूरचे उपायुक्त यांच्याशी संवाद साधला आणि गंभीर जखमींना एअर लिफ्ट करण्याची व्यवस्था करण्यात येत असल्याची माहिती दिली.

# फटाक्यांच्या कारखान्यात झालेल्या स्फोटातील मृतांची संख्या २५

**विरुधुनगर**- तामिळनाडूच्या विरुधुनगरमध्ये काल फटाक्यांच्या कारखान्यात झालेल्या स्फोटात मृतांची संख्या २५ झाली आहे. मृतांमध्ये २२ महिला आणि ३ पुरुष आहेत. यापैकी २० लोक एकाच गावातील होते. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अनेक मृतदेह इतके वाईट रीतीने जळाले आहेत की त्यांची ओळख पटवणे कठीण होत आहे. दागिन्यांच्या आधारे त्यांची ओळख पटवण्याचा प्रयत्न केला जात आहे. मुथुमणिक्कम गावातील वनजा फायरवर्क्स युनिटमध्ये हा अपघात झाला आहे. कारखान्याचा मालक फरार आहे. जिल्हाधिकारी व्ही.पी.जयसीलन यांनी सांगितले की, काल रविवारची सुट्टी असल्याने कारखाना बंद असतानाही सुरू होता. स्फोट रसायन मिसळण्याच्या शेडमध्ये झाला, जिथे सुमारे ४० मजूर काम करत होते. नियमांनुसार, एका शेडमध्ये जास्तीत जास्त ४ लोकच काम करू शकतात.

देश विदेश

# ऑस्ट्रिया बेबी फूडमध्ये उंदीर मारण्याचे विष

**व्हिएन्ना** - ऑस्ट्रियासह काही देशांतील बेबी फूडच्या डब्यातं उंदीर मारण्याचे विष सापडल्याने खळबळ उडाली आहे. हिप्प नावाच्या कंपनीच्या बेबी फूडबाबत हा प्रकार घडला असून कंपनीने ऑस्ट्रियामधून हे उत्पादन परत मागवले आहे. कंपनीने गुन्हेगारी स्वरूपाच्या छेडछाडीचा संशय व्यक्त केला आहे. ऑस्ट्रिया, स्लोव्हाकिया आणि झेक प्रजासत्ताकमध्ये घेतलेल्या बेबी फूडमध्ये नमुन्यांमध्ये उंदीर मारण्याचे विष आढळल्याने, लहान मुलांचे अन्न बनवणाऱ्या हिप्प कंपनीने खबरदारीचा उपाय म्हणून आपली अनेक उत्पादने परत मागवली आहेत. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, पाच महिने आणि त्याहून अधिक वयाच्या बालकांसाठी असलेल्या गाजर आणि बटाट्याच्या १९० ग्रॅमच्या बरण्यांमध्ये भेसळ आढळली आहे. ही बाधित उत्पादने ऑस्ट्रियामधील स्पार सुपरमार्केट्मार्फत विकली गेली होती. पहिला दूषित नमुना काल सापडला.

# उ. कोरियाचे शक्तीप्रदर्शन सुरूच बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे डागली

■ सिनपो

**अमेरिका** आणि दक्षिण कोरियाच्या लष्करी सरावाच्या पार्श्वभूमीवर उत्तर कोरियाचे राष्ट्राध्यक्ष किम जोंग उन यांनी जोरदार शक्तीप्रदर्शन सुरूच ठेवले आहे. उत्तर कोरियाने चाचणीचा एक भाग म्हणून समुद्रात बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे डागली.

उत्तर कोरियाच्या पूर्व किनाऱ्यावरील सिनपो शहराच्या जवळ पहाटे ६:१० वाजता समुद्राच्या दिशेने क्षेपणास्त्रे डागण्यात आली आणि ती सुमारे १४० किलोमीटर दूर गेली, असे दक्षिण कोरियाच्या लष्कराने एका निवेदनात म्हटले. उत्तर कोरियाची या वर्षातील ही सातवी आणि एप्रिल महिन्यातील चौथी क्षेपणास्त्रांची चाचणी असून दक्षिण कोरियाने याला 'चिथावणीखोर' कृती म्हणत उच्चस्तरीय सतर्कता जारी केली आहे. हा प्रकार संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या ठरावांचे उल्लंघन करतो आणि प्रादेशिक शांततेला धोका निर्माण करतो, असे दक्षिण कोरियाने म्हटले आहे. उत्तर कोरियाने क्षेपणास्त्र डागल्यानंतर जपान, अमेरिका आणि दक्षिण कोरिया हे तिन्ही देश एकमेकांच्या संपर्कात आहेत.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

# फडणवीसांचा खरेपणा संपत चालला आहे

**दमानियांची पोस्ट**



■ मुंबई

संसदेत महिला आरक्षण विधेयक नामंजूर झाल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पत्रकार परिषदेत मांडलेल्या भूमिकेवर सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी सोशल मीडियावर पोस्ट करून टीका केली आहे. दमानिया पोस्टमध्ये म्हणाल्या की, फडणवीसांचा खरेपणा संपत चालला आहे. पूर्वी ते तसे नव्हते. पण आता ते फक्त आणि फक्त राजकारण करत आहेत. महिला आरक्षण विधेयकाचा आणि मतदारसंघ फेररचनेचा काहीही संबंध नाही, याची पूर्ण जाणीव असताना फक्त खोटे बोलण्याचा भाजपाचा अजेंडा रेटून नेण्याचे काम फडणवीस करत आहेत.


COURT ROOM NO. 2
**IN THE BOMBAY CITY CIVIL COURT AT DINDOSHI GOREGOAN, BORIVALI DIVISION.**
SUMMARY SUIT NO. 97 OF 2025
(Under Order XXXVII Of Code Of Civil Procedure, 1908)

Mr. Sanjay Haripal Masawan & Anr ...Plaintiffs
Versus
ATS Transport & Ors ...Defendants

To,
**1. ATS Trasport**
**2. National Dairy**
**3. Mr. Anil Tarachand Sharma** ...Defendants

TAKE NOTICE that, this Hon'ble Court will be moved before His Honour Judge Mrs. Sonal Navinchadra Sachdeo, presiding in Court Room No.2 on 28th April 2026 at 11 am by the abovenamed Plaintiff for following relief:
(a) that the Defendant be ordered and decreed to pay to the Plaintiffs a sum of Rs. 53,32,932/- being the principal amount as stated in the Particulars of claim being Exhibit 'J' hereto and for further interest @ 18% p.a. from the date of the suit till payment and/or realization.
(b) that the costs of this suit be provided for.
(c) And any other relief this Hon'ble Court deems fit

**Dated this 23th day of February, 2026.**

Seal

Sd/- **Sealer**
**This 23th day of February, 2026**

Sd/- **For Registrar,** City Civil Court, Dindoshi

**Mr. Vishwabhushan Kamble**
**Advocates for Plaintiff,**
3rd Floor, 14-Rajabadhur Mansion,
Ambalal Doshi Marg, Fort, Mumbai-400001
Mob: 9930298894
vishwabhushankamble@gmail.com



**पनवेल महानगरपालिका**
**ता. पनवेल, जिल्हा - रायगड, पनवेल ४१० २०६**
दुरध्वनी क्र. : ०२२ - २७४५८०४०/४१/४२ | फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३
उपायुक्त कार्यालय : ०२२ - २७४५५७५१ | आयुक्त कार्यालय : ०२२ - २७५४२३३९
ई-मेल : panvelcorporation@gmail.com | वेबसाईट: panvelcorporation.maharashtra.gov.in

**जा.क्र. पमपा/मातंवि/२२२५/प्र.क्र.०१/८५/२०२६** | **दिनांक: २०/०४/२०२६**

| अनु. क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव |
|---|---|---|
| १. | निविदा/पमपा/मातंवि २२२५/प्र.क्र.०१/ २०२६-२७ | पनवेल महानगरपालिका मालकीच्या कार्यालयात असणाऱ्या प्रिंटरचे १ वर्षाकरिता टोनर रिफिलिंग दर मंजूर करणेबाबत. |

या निविदेबाबतची माहिती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.२१/०४/२०२६ ते दि. २७/०४/२०२६ रोजी दुपारी ०३.०० वाजेपर्यंत उपलब्ध होईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

सही/-
**उप आयुक्त (I)**
**पनवेल महानगरपालिका**

जा. क्र. पमपा/जनसंपर्क/३१२६/प्र.क्र.११०/१२०/२०२६



**प्रवेश सुरु...प्रवेश सुरु...प्रवेश सुरु**
**लेट. एन. बी. छाबडा मिलिटरी स्कूल, रायगांव, सातारा.**

मिलिटरी स्कूल (को.एज्यु.) सातारा येथे सन २०२६-२७ साठी इयत्ता ५ वी ते १२ वी (इंग्रजी माध्यम) प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

शासन नियमानुसार मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी समाजकल्याण अनुदानाची सोय आहे.

ॲडमिशनसाठी घेण्यात येणारी प्रवेश परीक्षा ही रविवार दि. २६/०४/२०२६ रोजी सकाळी ११.०० ते दु. २.०० या वेळेत आयोजित करण्यात आली आहे. इयत्ता ५ वी ते १२ वी साठी इंग्रजी, गणित व सामान्यज्ञान या विषयांचा प्रवेश परीक्षेमध्ये समावेश असेल. सदर परीक्षेचे नावनोंदणी शुल्क रु. ५००/- भरुन खाली दिलेल्या अकाउंट नंबर वर दि. २३/०४/२०२६ पूर्वी नावनोंदणी करणे बंधनकारक असेल.

**Account Details**
**Name of Bank :** Union Bank Of India Branch Satara
**A/c Name :** N.B.Chhabada Military School
**Saving A/C No. :** 579302010004089
**Amount to be deposited :**
**Code IFSC : UBINO557935**

: संपर्क :
मोबा.: 9881373735, 9822027728

: पत्ता :
सर्व्हे नं. २५९, मु.पो.रायगांव,
ता.जावळी, जि.सातारा. ४१५०२०



**2nd Call RFx (E-TENDER) NOTICE**
MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids from reputed and registered contractors of appropriate class with MSETCL. Please visit Mahatransco website **https://srmetender.mahatransco.in** for following work.

| RFx (Tender) No. | Name of work | Estimated cost in Rs. | EMD (Rs.) | Tender Fee incl. GST (Rs.) |
|---|---|---|---|---|
| 7000039506 | 2nd Call of AMC for replacement of installed failed Converter Transformer 298.6 MVA (including dismantling) by spare Converter Transformer (298.6 MVA) of either Pole-1 or Pole-2 in case of failure at HVDC Terminal Station, Padghe for the year 2026-27. | INR 50,00,000/- (including taxes) | INR 50,000/- | INR 590/- |

| | | |
|---|---|---|
| 1 | Date of download of RFx (e tender) documents | From - 21.04.2026 from 00:00 hrs. to 01.05.2026 up to 10:00 hrs. |
| 2 | Date of submission of RFx (e tender) | 01.05.2026 up to 10:00 hrs. |
| 3 | Date of technical bid opening | 01.05.2026 at 11:00 hrs. (If possible) |
| 4 | Date of commercial bid opening | 01.05.2026 at 13:00 hrs. (If possible) |

**Contact Person: The Executive Engineer (ADM),** HVDC RS (O&M) Circle, Padghe,
Mob. No.: 9011021483
For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in**

**Sd/-**
**Superintending Engineer**
**HVDC RS O&M Circle, Padghe**



**ठाणे महानगरपालिका, ठाणे**
सार्वजनिक बांधकाम विभाग
निविदा सुचना

ठाणे महानगरपालिका, ठाणे अनुभवी निविदाकारांकडुन "सार्वजनिक जमिनीवरील अतिक्रमण रोखण्यासाठी अशा जागांभोवती संरक्षक भिंत बांधणे" या लेखाशिर्षका अंतर्गत "ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.१५ ब मधील इंदिरानगर येथील दत्त मंदिर मागे असलेल्या साईबाबा मंदिर येथील शासकीय भुखंडास संरक्षक भिंत बांधणे च्या एक कामांसाठी ई-टेंडरींग पध्दतीने निविदा मागवित आहे. ज्या कंत्राटदारांविरुध्द शासकिय/ निमशासकिय/ सार्वजनिक क्षेत्रातील संस्था व उपक्रम/स्थानिक स्वराज्य संस्था इ.यांनी शिस्त भंगाचे कार्यवाहिच्या अनुषंगाने नोंदणी पत्र रद्द करण्याची कार्यवाही केली/सुरु आहे. अशा कंत्राटदारांना निविदा प्रक्रियेत भाग घेता येणार नाही. कामाची सविस्तर निविदा सुचना व निविदा प्रपत्र ठाणे महानगरपालिकेचे अधिकृत ई-निविदा संकेतस्थळ https://mahatenders.gov.in/ येथे दि. २१/०४/२०२६ ते दि. २८/०४/२०२६ रोजी १६.०० वाजेपर्यंत उपलब्ध असतील. सदर निविदा ई-टेंडरींग पध्दतीने दि.२८/०४/२०२६ रोजी १६.०० पर्यंत स्विकारण्यात येतील व शक्य झाल्यास दि. ३०/०४/२०२६ रोजी १६.०० वा उपस्थित निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी समक्ष उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/पिडब्ल्यूडी-मु/५३/२०२६-२७ | सही/-
दि:२०.०४.२०२६ | नगरअभियंता
**Pls visit our oficial web-site www.thanecity.gov.in** | ठाणे महानगरपालिका,ठाणे

**अनधिकृत बांधकामाला आळा घाला..**
**अनधिकृत बांधकाम दिसल्यास प्रभाग समितीत तक्रार करा !**



**बृहन्मुंबई महानगरपालिका**
**(घनकचरा व्यवस्थापन आर/उत्तर विभाग)**
**क्र. सहा. अभि. / घकव्य / 414 / आर / उत्तर दि. 20.04.2026**

**जाहिरात**
**''आर/उत्तर विभाग जुने कार्यालयाची साफसफाई व सुविधा''**

**विषयः- 'आर/उत्तर विभाग जुने कार्यालयाची साफसफाईची कामे व सुविधा पुरविण्याचे काम करण्याबाबत.**

आर/उत्तर विभाग घन कचरा व्यवस्थापन खात्यामार्फत **''आर/ उत्तर विभाग जुने कार्यालय व चौक्यांची साफसफाईची कामे व सुविधा पुरविण्याचे काम''** राबविण्याकरीता नव्याने संस्थाची नेमणूक करण्याकरीता अनुभवी अशासकीय संस्था / नोंदणीकृत उपक्रमे (कंपनी) यांच्यामार्फत **आर/ उत्तर विभाग जुने कार्यालयाची** सफाईसाठी / देखभालीसाठी दि. **01.05.2026** ते दि. **30.04.2027** या कालावधी करिता मोहोरबंद ईच्छापत्र मागवित आहोत.

| अनु. क्र. | योजनेचे नाव | कामाकरिता निवड करावयाच्या संस्था |
|---|---|---|
| १ | **''आर/उत्तर विभाग जुने कार्यालय व चौक्यांची साफसफाईची कामे व ईतर सुविधा पुरविण्याचे काम''** | **०१ कंपनी (६ एकक + मशिनरी + पेस्ट कंट्रोल)** |

अर्जाचा नमुना आणि याबाबतची नियमावली, http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.21.04.2026 ते 25.04.2026 या कालावधीत, मिळु शकेल. पात्र नोंदणीकृत उपक्रमे (कंपनी) यांना कामाचे वाटप, विभागाचे सहाय्यक आयुक्त, योजनेच्या नियमावलीतील नमुद केलेल्या अटी व शर्तीनुसार करतील कामाचा कालावधी दि. **01/05/2026** ते दि. **30/04/2027** या कालावधीकरिता किंवा प्रमुख अभियंता (घ.क.व्य.) कार्यालयामार्फत सदर योजना राबविण्याबाबत नव्याने निर्देश देण्यात येतील, त्यानुसार संस्थांनी स्वच्छतेचे काम करावे लागेल.

इच्छुक संस्थांनी अधिक तपशिल, अर्ज व शपथपत्राच्या नमुन्यासाठी आर / उत्तर विभाग घनकचरा व्यवस्थापन कार्यालयात संपर्क करावा किंवा **http://mahatenders.gov.in** या संकेत स्थळावर भेट द्यावी.

अशासकीय संस्था / नोंदणीकृत उपक्रमे (कंपनी) यांनी अर्ज करण्याची अंतिम तारीख दि. **25.04.2026** (दुपारी **3.00** वाजे पर्यंत) राहील.

सही/-
**सहाय्यक आयुक्त 'आर/उत्तर' विभाग**

पीआरओ/१२७/जाहि./२०२६-२७

**जेथे जेथे पाणी साचते, तेथे तेथे डासांचे फावते.**



**नवी मुंबई महानगरपालिका**
सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभाग
फेर-निविदा सुचना क्र. नमुंमपा/अ.श.अ.(स्था.)/06/2026-2027

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम (रू.) |
|---|---|---|
| 1 | नवी मुंबई महानगरपालिकेच्या बेलापूर विभागातील, सेक्टर-50, नेरूळ येथील 100.00 द.ल.लि. क्षमतेच्या मलप्रक्रिया केंद्रामध्ये केंद्र शासनाच्या "जल ही अमृत" उपक्रमाअंतर्गत प्रोत्साहनपर प्राप्त निधीतून OCEMS यंत्रणा बसविणे व अनुषंगिक कामे करणे. | रू.85,37,000/- |
| 2 | नवी मुंबई महानगरपालिकेच्या तुर्भे विभागातील, वाशी सेक्टर-18 येथील 100.00 द.ल.लि. क्षमतेच्या मलप्रक्रिया केंद्रामध्ये केंद्र शासनाच्या "जल ही अमृत" उपक्रमाअंतर्गत प्रोत्साहनपर प्राप्त निधीतून OCEMS यंत्रणा बसविणे व अनुषंगिक कामे करणे. | रू.85,37,000/- |
| 3 | नवी मुंबई महानगरपालिकेच्या कोपरखैरणे विभागातील, सेक्टर-14, कोपरखैरणे येथील 87.5 द.ल.लि. क्षमतेच्या मलप्रक्रिया केंद्रामध्ये केंद्र शासनाच्या "जल ही अमृत" उपक्रमाअंतर्गत प्रोत्साहनपर प्राप्त निधीतून OCEMS यंत्रणा बसविणे व अनुषंगिक कामे करणे. | रू.85,37,000/- |
| 4 | नवी मुंबई महानगरपालिकेच्या घणसोली विभागातील, सेक्टर-15, घणसोली येथील 30.00 द.ल.लि. क्षमतेच्या मलप्रक्रिया केंद्रामध्ये केंद्र शासनाच्या "जल ही अमृत" उपक्रमाअंतर्गत प्रोत्साहनपर प्राप्त निधीतून OCEMS यंत्रणा बसविणे व अनुषंगिक कामे करणे | रू.1,28,00,000/- |
| 5 | नवी मुंबई महानगरपालिकेच्या ऐरोली विभागातील, सेक्टर-18, ऐरोली येथील 80.00 द.ल.लि. क्षमतेच्या मलप्रक्रिया केंद्रामध्ये केंद्र शासनाच्या "जल ही अमृत" उपक्रमाअंतर्गत प्रोत्साहनपर प्राप्त निधीतून OCEMS यंत्रणा बसविणे व अनुषंगिक कामे करणे. | रू.85,37,000/- |
| 6 | नवी मुंबई महानगरपालिकेच्या बेलापूर विभागातील, सेक्टर-12, बेलापूर येथील 19.00 द.ल.लि. क्षमतेच्या मलप्रक्रिया केंद्रामध्ये केंद्र शासनाच्या "जल ही अमृत" उपक्रमाअंतर्गत प्रोत्साहनपर प्राप्त निधीतून OCEMS यंत्रणा बसविणे व अनुषंगिक कामे करणे. | रू.85,37,000/- |
| 7 | नवी मुंबई महानगरपालिकेच्या तुर्भे विभागातील, सेक्टर-20, सानपाडा येथील 37.5 द.ल.लि. क्षमतेच्या मलप्रक्रिया केंद्रामध्ये केंद्र शासनाच्या "जल ही अमृत" उपक्रमाअंतर्गत प्रोत्साहनपर प्राप्त निधीतून OCEMS यंत्रणा बसविणे व अनुषंगिक कामे करणे. | रू.85,37,000/- |

निविदा पुस्तिका ई-टेंडरिंग (E-Tendering) संगणक प्रणालीच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर या संकेतस्थळावर दि.21/04/2026 रोजी प्राप्त होतील. निविदेचे सादरीकरण https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Online करण्याचे आहे. Online निविदा सादरीकरणाच्या प्रकियेतील कोणत्याही तांत्रिक अडचणीसाठी सदर संकेतस्थळावर दिलेल्या हेल्प डेस्क नंबरवर संपर्क करावे

कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी राखुन ठेवलेला आहे.

सही/-
(अरविंद शिंदे)
अतिरिक्त शहर अभियंता (स्थापत्य)
नवी मुंबई महानगरपालिका

जा.क्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/302/2026



**महाराष्ट्र गृहनिर्माण स्वयं-समुह पुनर्विकास प्राधिकरण**
**कार्यालय :** कक्ष क्रमांक ४४३, तिसरा मजला, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०००५१

**जाहीर आवाहन**

शासन निर्णय दि.२९ सप्टेंबर, २०२५ अन्वये महाराष्ट्र गृहनिर्माण स्वयं/समूह पुनर्विकास प्राधिकरणाची स्थापना शासनाने केली असून सदर प्राधिकरणाचे कामकाज नमूद पत्त्यावर सुरु झाले आहे.

प्राधिकरणामार्फत जाहीर आवाहन करण्यात येत आहे की, स्वयंपुनर्विकास करु इच्छिणाऱ्या सहकारी गृहनिर्माण संस्थांनी मा.आ.श्री. प्रवीण दरेकर, अध्यक्ष, महाराष्ट्र गृहनिर्माण स्वयं / समूह पुनर्विकास प्राधिकरण यांच्याशी खालील दूरध्वनी क्रमांक / ई-मेलवर संपर्क साधावा किंवा सोमवार व गुरुवार या दिवशी नमूद कार्यालयात प्रत्यक्ष भेट घ्यावी.

सही/-
**सुदेश रं. रोझेकर**
**विशेष कार्य अधिकारी**

**दूरध्वनी :** ०२२-६६४०५३०० विस्तार ५३०० / **मोबाईल -** ९८२१५३५०६४/९९६७४०३३७७
**ई-मेल :** chairmanselfredevelopment@mhada.gov.in
क्रमांकः आरओसी-२०२६-२७/क्र.-५/ सी ३२७



**क्रमांक :- इएसटी २०२६/प्र.क्र.११२/का-२**

**विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई**
**येथे कक्ष अधिकारी या पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्याची करार पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत.**

विधि व न्याय विभाग (खुद्द) आस्थापना शाखेतील वेतन निश्चिती संदर्भातील प्रकरणे हाताळणे या विवक्षित कामासाठी आतपर्यंतच्या सर्व वेतन आयोगांची संपूर्ण माहिती असणाऱ्या तसेच वेतन निश्चिती संबंधातील आक्षेपांचा निपटारा करणे व वेतन आयोगातील त्रुटींच्या अनुषंगाने कार्यरत व सेवानिवृत्त अधिकारी कर्मचाऱ्यांची वेतन निश्चित करणे या कामाचा अनुभव असलेल्या कक्ष अधिकारी या पदांवरुन सेवानिवृत्त झालेल्या एका सेवानिवृत्त कक्ष अधिकाऱ्याची एक वर्षाकरीता विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई येथे करार पध्दतीने नियुक्ती करावयाची आहे.

सदर नियुक्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्र. संकीर्ण- सीबीई १५२५/प्र.क्र. ३७/ आस्थामं (का.१३), दिनांक १०.०६.२०२५ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार करण्यात येणार आहे.

अधिक माहिती विभागाचे संकेतस्थळ https://lj.maharashtra.gov.in वर उपलब्ध आहे. इच्छुक व्यक्तींनी वेबसाईटवरील माहिती पाहून अर्ज करावेत.

अर्ज जाहिरातीच्या दिनांकापासून १५ दिवसांत सादर करावा.

सही/-
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**क्रमांकः आरओसी-२०२६-२७/क्र.-५/ सी ३३४** ०२२-२०२८५००



**E-Tender Notice**
MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

**Turnkey Contract for Power Evacuation Works from EHV substation under Various Districts under 'EHV POWER EVACUATION PHASE IV' Scheme**

The Chief Engineer (Distribution), Prakashgad, Mumbai wishes the Bids from eligible bidders for Supply, Erection, Transport , construction , Testing & Commissioning of various Infrastructure Development works under Various Zones of MSEDCL, Maharashtra through **e-tendering website of MSEDCL,** duly super scribing with tender No., due date and opening date & time as follows:

| Tender No. | Zone | Tender Cost (Rs. Crore) | * Tender Fees (Rs.) |
|---|---|---|---|
| CE (Dist)/M-III/Power Evacu./ 26-27/T-01 | Latur & Amaravati | 5.7129 | 11800/- |

* Tender Fee (including 18% GST) is to be paid by e-payment only, directly through net banking to MAHADISCOM account.

- Availability of bid documents on website 21-04-2026
- Date and time of sale of bid documents 21-04-2026 at 00.10 Hrs
- Date and time of Pre-bid Meeting 28-04-2026 at 15:00 Hrs.
- Date & time of Bid Submission 11-05-2026 up to 17.00 Hrs.
- Date and time of opening of technical bids 12-05-2026 at 15.00 Hrs.

This notice is general intimation for the interested Bidders. The details of the tenders are available on MSEDCL's e-tendering Website https://etender.mahadiscom.in/eatApp/.
The Agencies are requested to visit our Website to register themselves for e-Tenders. Memorandum / corrigendum etc. will not be published in the newspaper.

**Sd/-**
**Chief Engineer (Distribution)**
**MSEDCL, Mumbai**

**HO PR No. 101/26 Dt. 20.04.2026**

# चंदेरी च्वींगम

नवा काळ

मुंबई । मंगळवार
२१ एप्रिल,२०२६

Email- contact@navakal.in
24x7 : www.navakal.in


# ‘रामायण’चा विश्वप्रकाश



**दिग्दर्शक** नितेश तिवारी यांचा ‘रामायण’ हा चित्रपट सध्या जागतिक पातळीवर चर्चेचा विषय ठरला आहे. लास वेगास येथे पार पडलेल्या ‘सिनेमाकॉन’ या जागतिक चित्रपट परिषदेत या चित्रपटाचे सुमारे २० मिनिटांचे न पाहिलेले फुटेज निवडक उपस्थितांना दाखवण्यात आले. या फुटेजला आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रचंड दाद मिळाली असून, चित्रपटाचा भव्य आवाका पाहून उपस्थित थक्क झाले आहेत. या विशेष प्रदर्शनानंतर असे समोर आले आहे की, चित्रपटाचे व्हिज्युअल्स आणि सादरीकरण अत्यंत उच्च दर्जाचे असून ते पौराणिक कथा आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा एक अद्‌भूत संगम आहे. या चित्रपटासाठी निर्माते ‘वॉर्नर ब्रदर्स’ या जगप्रसिद्ध स्टुडिओशी जागतिक वितरणासाठी चर्चा करत आ-हेत. हा करार झाला, तर ‘रामायण’ हा जागतिक स्तरावर ४,५०० हून अधिक पडद्यांवर प्रदर्शित होणारा पहिला भारतीय चित्रपट ठरू शकतो. मात्र, अद्याप निर्मात्यांनी या वितरणाबाबत अधिकृत घोषणा केलेली नाही.

केवळ प्रदर्शनच नव्हे, तर या चित्रपटाला ‘ऑस्कर’च्या शर्यतीत उतरवण्याचीही तयारी सुरू असल्याचे संकेत मिळाले आहेत. सुमारे ४,००० कोटी रुपयांच्या महाकाय बजेटमध्ये बनत असलेल्या या चित्रपटात रणबीर कपूर प्रभू रामचंद्रांच्या भूमिकेत, तर साई पल्लवी सीतेच्या भूमिकेत दिसणार आहे.

# ‘राजा शिवाजी’मध्ये सलमान खानची एन्ट्री




**अभिनेता** आणि दिग्दर्शक रितेश देशमुख याच्या ‘राजा शिवाजी’ या ऐतिहासिक महाकाव्यात बॉलिवूडचा सुपरस्टार सलमान खान एका महत्त्वपूर्ण भूमिकेत दिसणार आहे. रितेश देशमुखने ‘बिग बॉस मराठी’च्या सहाव्या पर्वातील एका भागात या वृत्ताला अधिकृत दुजोरा दिला असून, यामुळे या चित्रपटाबाबतची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. सोशल मीडियावर सलमान नेम की कोणती भूमिका साकारणार, याबाबत तर्कवितर्क लावले जात आहेत. अनेक चाहत्यांच्या मते, सलमान खान या चित्रपटात छत्रपती शिवाजी महाराजांचे अत्यंत विश्वासू आणि निष्ठावंत वीर जीवा महाल यांची भूमिका साकारण्याची शक्यता आहे. मात्र, निर्मात्यांनी अद्याप सलमानच्या भूमिकेबाबत अधिकृत माहिती गुलदस्त्यात ठेवली आहे. या चित्रपटात रितेश देशमुखसोबतच अभिषेक बच्चन, संजय दत्त, विद्या बालन, जेनेलिया देशमुख, महेश मांजरेकर, अमोल गुप्ते, भाग्यश्री, जितेंद्र जोशी, बोमन इराणी, सचिन खेडेकर आणि फरदीन खान यांसारखी तगडी स्टारकास्ट पाहायला मिळणार आहे. अजय-अतुल या दिग्गज जोडीने चित्रपटाला संगीत दिले असून, हा चित्रपट १ मे रोजी प्रदर्शित होणार आहे.

# ‘हेरा फेरी ३’ला वर्षभराचा ब्रेक



**प्रेक्षकांमध्ये** प्रचंड उत्सुकता असलेला ‘हेरा फेरी ३’ प्रदर्शित होणार की नाही याबाबत गेल्या काही दिवसांपासून सातत्याने संदिग्धावस्था आहे. पण आता खुद्द अक्षय कुमारने हा चित्रपट वर्षभरासाठी लांबणीवर पडला असल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला असून, हा निर्णय आपल्यासाठी एक मोठा ‘झटका’ असल्याचे त्याने म्हटले आहे.

अक्षय कुमार, सुनील शेट्टी आणि परेश रावल या त्रिकुटाच्या ‘हेरा फेरी’ या चित्रपट मालिकेने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवले आहे. त्यामुळे या तिसऱ्या भागाची चाहते गेल्या अनेक महिन्यांपासून आतुरतेने वाट पाहत होते. मात्र, चित्रपटाचे काम वर्षभरासाठी थांबवण्यात आले आहे. या अनपेक्षित विलंबावर आपली प्रतिक्रिया देताना अक्षय कुमारने मिश्किलपणे म्हटले आहे की, हा धक्का सहन करण्यासाठी आता मला मंत्रपठण करावे लागतील. या विधानावरून अक्षयलाही हा निर्णय अपेक्षित नव्हता, हे स्पष्ट होते. चित्रपट का थांबवण्यात आला, याचे नेमके कारण अद्याप समोर आलेले नाही. मात्र, निर्मिती प्रक्रियेतील काही अंतर्गत समस्यांमुळे हा निर्णय घ्यावा लागल्याचे समजते.

# शिवालिकाच्या घरी ‘लक्ष्मी’चे आगमन



**अभिनेत्री** शिवालिका ओबेरॉय आणि निर्माता-दिग्दर्शक अभिषेक पाठक या दाम्पत्याच्या आयुष्यात एका गोड पाहुणीचे आगमन झाले आहे. अक्षय्य तृतीयेच्या दिवशी शिवालिकाने एका गोंडस मुलीला जन्म दिला असून, या चिमुकल्या परीचे आगमन ‘आमची छोटी लक्ष्मी’ अशा शब्दांत या दाम्पत्याने केले आहे. सोशल मीडियावर एक भावुक पोस्ट शेअर करत या जोडप्याने अत्यंत प्रेम आणि कृतज्ञतेने आम्ही आमच्या प्रिय मुलीचे स्वागत करत आहोत, असे त्यांनी या निवेदनात म्हटले आहे. या पोस्टनंतर चित्रपटसृष्टीतील अनेक कलाकारांनी त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला आहे. यामध्ये अनुष्का रंजन, इशिता दत्ता, करण मेहरा, आहाना कुमरा आणि दर्शन कुमार यांसारख्या अनेक प्रसिद्ध व्यक्तींचा समावेश आहे.

शिवालिका आणि अभिषेक यांची प्रेमकहाणी २०२० मध्ये ‘खुदा हाफिज’ चित्रपटाच्या सेटवर सुरू झाली होती. सुमारे तीन वर्षे एकमेकांना डेट केल्यानंतर ९ फेब्रुवारी २०२३ रोजी गोव्यात एका शाही सोहळ्यात त्यांनी लग्नगाठ बांधली. गतवर्षी ख्रिसमसच्या मुहूर्तावर त्यांनी आपण आई-बाबा होणार असल्याची घोषणा केली होती. अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर कन्येचे आगमन झाल्याने पाठक आणि ओबेरॉय कुटुंबासाठी यंदाचा सण खऱ्या अर्थाने संस्मरणीय ठरला आहे.

# मुलांसाठी मी कुणालाही फोन करणार नाही : अर्शद

**‘मुन्नाभाई** एमबीबीएस’, ‘गोलमाल’ आणि ‘जॉली एलएलबी’ सारख्या चित्रपटांमधून प्रेक्षकांच्या मनावर राज्य करणाऱ्या अर्शदने नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत आपल्या मुलांच्या भविष्याबद्दल आणि बॉलिवूडमधील ‘स्टार किड्स’वरील दबावाबद्दल भाष्य केले आहे. अर्शद वारसी आणि मारिया गोरेटी यांना झेक आणि झेन झो ही दोन मुले आहेत. अर्शद म्हणाला, शाहरुख खान किंवा हृतिक रोशन यांसारख्या सुपरस्टार्सच्या मुलांवर एक वेगळ्या प्रकारचा दबाव असतो. त्यांना त्यांच्या वडिलांपेक्षाही मोठे होऊन दाखवावे लागते. माझ्या मुलांच्या बाबतीत तसे नाही. त्यांना फक्त चांगले कलाकार बनायचे आहे, त्यांच्यावर सुपरस्टार होण्याचे ओझे नसेल.



त्याचा मुलगा झेक सध्या सिद्धार्थ आनंद आणि राजकुमार हिराणी यांसारख्या दिग्गजांकडे सहाय्यक म्हणून काम करत अनुभव घेत आहे.

# तब्बूची वर्सोव्यात दहा कोटींची घरखरेदी



**चित्रपटसृष्टीतील** ज्येष्ठ आणि प्रतिभावान अभिनेत्री तब्बू हिने मुंबईतील रिअल इस्टेट मार्केटमध्ये मोठी गुंतवणूक केली आहे. मुंबईतील अंधेरी पश्चिम भागा-तील वर्सोवा येथील ‘गोदरेज स्कायशोर’ या आलिशान प्रकल्पात तब्बूने दहा कोटी रुपये किम तीचे एक भव्य घर खरेदी केले आहे. बॉलिवूडमधील आघाडीच्या कलाकारांचे निवासस्थान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या परिसरात तब्बूच्या या नवीन घराची सध्या चांगलीच चर्चा रंगली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार तब्बूचे हे नवीन घर २,१५३ चौरस फूट क्षेत्रा-वर पसरलेले आहे. मुंबईसारख्या गजबजलेल्या शहरात मोकळी जागा मिळणे कठीण असताना या घरात सुमारे १२७ चौरस फुटांची प्रशस्त बाल्कनी उपलब्ध आहे, जे या घराचे मुख्य आकर्षण मानले जाते. या व्यवहाराची नोंदणी २६ मार्च २०२६ रोजी करण्यात आली असून, यासाठी ५ लाख २४ हजार रुपयांचे मुद्रांक शुल्क आणि ३० हजार रुपये नोंदणी शुल्क भरण्यात आले आहे. या आलिशान घरासोबतच तिला दोन स्वतंत्र वाहनतळही मिळाले आहेत.

वर्सोवा येथील हा प्रकल्प १.५ एकर परिसरात विस्तारलेला असून, यामध्ये एक भव्य टॉवर आणि दोन विंग्स आहेत. या इमारतीत एकूण १२० सदनिका असून, समुद्रकिनारपट्टीवरील शांत आणि सुरक्षित जीवनशैलीसाठी हा प्रकल्प ओळखला जातो. चित्रपट स्टुडिओ आणि निर्मिती संस्थांची कार्यालये जवळ असल्याने अनेक कलाकार या परिसराला पसंती देतात. तब्बूच्या व्यावसायिक कारकिर्दीबद्दल बोलायचे झाले तर नुकताच तिचा ‘भूल भुलैया’ हा चित्रपट १७ एप्रिल रोजी प्रदर्शित झाला आहे. प्रियदर्शन यांच्या दिग्दर्शनाखाली बनलेल्या या चित्रपटात तब्बूने यशोदा आचार्य ही भूमिका साकारली असून तब्बल दोन दशकांनंतर ती अक्षय कुमारसोबत पडद्यावर परतली आहे.

# चंद्र होता साक्षीला

ज्योती रानडे

**अमेरिकेतल्या ह्यूस्टन गावाच्या एका शांत उपनगरात रीड वाईजमन नावाचा इंजिनिअर व त्याची पत्नी कॅरोल यांनी आपल्या वैवाहिक आयुष्याची स्वप्नं रंगवली.**

**कॅरोल एक उत्तम पेडियाट्रिक नर्स होती. नवजात बाळांची काळजी घेणारी, कोमल हातांनी त्यांना जवळ घेऊन औषधोपचार देणारी कॅरोल समाजात प्रिय होती.**

**त्यावेळी रीड नेव्ही मधे काम करत होता. नासा या कंपनीने अवकाशात जाण्यासाठी अंतराळवीर शोधण्याची मोहीम सुरू केली होती, त्यात त्याची निवड झाली होती.**

अंतराळवीर म्हणून मिळणाऱ्या ट्रेनिंगसाठी घरदार सोडून त्या कार्याला वाहून घ्यावे लागले. मुली लहान होत्या. त्या भेटत नसत.

तेव्हा कॅरोलने त्याला एकच सांगितले होते, रीड, तू अवकाशात जा, ताऱ्यांजवळ जा, मी इथून तुला पाहत राहीन!

दोन मुलींची काळजी घेत, नर्सिंगच्या शिफ्ट सांभाळत, रीडचं मनोधैर्य वाढवत कॅरोल आला दिवस चंदेरी करत होती..

पण एके दिवशी त्यांच्या आयुष्यात प्रचंड वादळ आलं

कॅरोलला कॅन्सरचं निदान झालं! मात्र, रीड व मुली तिच्या पाठीशी भक्कमपणे उभ्या राहिल्या.

तरीही ती रीडला त्याच्या प्रत्येक मोहिमेच्या तयारीसाठी प्रोत्साहन देत राहिली

Don't stop your dream because of me. Keep reaching for higher places!

(तुझं स्वप्न साकार करणं माझ्यासाठी थांबवू नकोस तुझ्या प्रगतीचा आलेख सतत नवी उंची गाठू दे!)

तिनं पाच वर्षे धैर्यानं, शांतपणे, आणि अविश्वसनीय ताकदीनं आजाराशी लढा दिला, पण परमेश्वरी इच्छेपुढे कुणाचं काही चालत नाही. १७ मे २०२० रोजी, वयाच्या केवळ ४६ व्या वर्षी, कॅरोलनं जगाचा निरोप घेतला.

रीडच्या आयुष्यात खोल, कधीही न भरून येणारी पोकळी निर्माण झाली होती. एक पोकळी, एक प्रचंड खड्डा, एक विवर पण त्यांच्या मुलींसाठी तो घट्ट राहिला.

आयुष्याला अर्थ देणारी, त्याला प्रोत्साहन देणारी कॅरोल त्यांना सोडून अनंताच्या प्रवासास निघून गेली होती. रीड सतत जगण्याचा अर्थ शोधत होता

‘कॅरोलला अंतराळ, तारे किती आवडायचे! तिनं ते पाहिले असतील का? मला दिसेल का ती परत? कुठं शोधू मी तिला?’ अशा अनेक प्रश्नांची साखळी रीडला उत्तरं शोधण्यास भाग पाडत होती..

२०२६ च्या "Artemis II' या चंद्राभोवती दहा दिवसांची फेरी मारण्याच्या मोहिमेसाठी रीडची निवड झाली.

जुलै १९६९ ला नील आर्मस्ट्राँग व बझ आल्ड्रिन यांनी चंद्रावर पाऊल ठेवलं; त्यानंतर तब्बल सत्तावन्न वर्षांनी अमेरिकेनं चार अंतराळवीर ‘मिशन आर्टेमिस’मध्ये चंद्रावर पाठवले त्यांतला एक अंतराळवीर होण्याचा सन्मान रीड वाईजमन याला मिळाला!

१ एप्रिल २०२६ रोजी ‘आर्टेमिस क्रू’ ‘इंटेग्रिटी’ नावाच्या स्पेसक्राफ्टमधून अंतराळात झेपावले. रीडनं त्याच्या दोन मुलींना भरलेल्या डोळ्यांनी निरोप दिलेला साऱ्या जगानं पाहिला.



कॅरोलनं दिलेली जिद्द, तिनं दिलेलं प्रोत्साहन व तिनं केलेलं प्रेम सोबत घेऊन रीड पृथ्वीपासून २,५२,७५६ मैलांवर चंद्राजवळ त्याच्या इतर तीन साथीदारांसह पोहोचला. चंद्रावरून निळ्या रंगाची गोल पृथ्वी पाहताना डोळ्याचं पारणं फिटलं.

साऱ्या जगाचे डोळे त्यांच्याकडे लागले होते. दुर्दम्य महत्त्वाकांक्षा व अविरत कष्ट करून ‘आर्टेमिस क्रू’ चंद्रावर पोहोचला होता!


चंद्रावर जाऊन तिथले फोटो काढताना त्यांच्या नजरेस एक अतिशय तेज:पुंज विवर पडलं लक्ष वेधून घेणारं स्वत:कडे खेचणारं विवर **crator** दरार

त्या विवराकडे बघत चारही अंतराळवीर थबकले. एकमेकांत चर्चा करून हॅन्सन या रीडच्या साथीदारानं नासाला विचारलं,

It's a bright spot on the moon.
And we would like to call it
"Carroll.

(या तेजस्वी विवराला कॅरोलचं नाव दिलं तर?)

रीडच्या नासामधल्या सहकाऱ्यांनी त्याच्या भावनेचा सन्मान केला आणि मग एक दिवस अधिकृत घोषणा झाली व त्या विवराला ‘कॅरोल’ हे नाव देण्यात आलं.




रीडनं चंद्राकडे पाहिलं

त्या रुपेरी पृष्ठभागावर चमकणारं ते विवर आता फक्त ते निनावी विवर नव्हतं.

ते होतं कॅरोलचं स्मारक, तिच्या प्रेमाचं तिच्या धैर्याचं तिच्या प्रोत्साहनाची आठवण करून देणारं स्मारक!

त्याच्या डोळ्यांत पाणी आलं, पण चेहऱ्यावर हसूही उमटलं.

कॅरोल, तू मला आजवर अवकाशात ताऱ्यांपर्यंत चंद्रापर्यंत पाठवलंस.

आज मी तुझं नाव चंद्रावर लिहिलं

आता तू कायम माझ्यासोबत आहेस. मी चंद्रावर असतानाही!

त्यांच्या डोळ्यातून घळाघळा पाणी वाहू लागलं. कॅरोलचं चंद्रावरचं स्मारक बघण्यासाठी फक्त चंद्र



साक्षीला होता! केवळ तीन क्रू मेंबर्स रीडच्या दाटून आलेल्या भावनांची साक्ष होते.

रीड चंद्रावरून १० एप्रिल २०२६ ला पृथ्वीवर परत आला. सुखरूप ‘आर्टेमिस-II’ला अभूतपूर्व यश मिळालं. या यशस्वी मोहिमेमुळे मानवी अंतराळ संशोधनात एक नवीन अध्याय सुरू झालाय!

आणि आता जेव्हा जेव्हा रीड चंद्राकडे पाहतो, तेव्हा त्याला तिथं दिसते

एक पत्नी
एक माता
एक कॅन्सरशी झगडलेली वीरांगना
आणि
एक शाश्वत प्रेमकहाणी!

(सत्य घटना एप्रिल ६, २०२६ ला घडलेली. "Artemis II' १ एप्रिल रोजी चंद्रावर जाऊन १० एप्रिल रोजी सुखरूप परत आलं, त्यावेळी घडलेली गोष्ट!)

# सोलापूर महापालिका सभागृहात पाणीपुरवठा योजनेवरून गोंधळ

■ सोलापूर

**नव्याने** राबविण्यात येणाऱ्या पाणीपुरवठा योजनेवरून सोलापूर महानगरपालिकेच्या सभागृहात आज मोठा गोंधळ उडाला. योजनेबाबत स्पष्टीकरणाची मागणी करताच सत्ताधारी आणि विरोधक आमनेसामने आले आणि वातावरण तापले.

गोंधळाच्या पार्श्वभूमीवर शिंदे गटाचे गटनेते अमोल शिंदे आणि काँग्रेसचे गटनेते चेतन नरोटे यांना महापौरांनी एक दिवसासाठी निलंबित करण्याचे आदेश दिले. या कारवाईनंतर विरोधकांनी आक्रमक भूमिका घेत घोषणाबाजी केली. सध्या सोलापुरात आठ दिवसांतून एकदाच पाणीपुरवठा होत असल्याने या योजनेला विशेष महत्त्व आहे. तरीही, सभागृहातील वादामुळे कामकाज काही काळ ठप्प झाले. महापौर विनायक कोंड्याल यांनी गोंधळानंतर निलंबनाची कारवाई करत शिस्त राखण्याचा प्रयत्न केला. मात्र, विरोधकांनी या निर्णयाचा निषेध करत सभागृहात जोरदार घोषणाबाजी केली. दरम्यान, १३७८ कोटी रुपयांच्या जल वितरण सुधारणा योजनेला भाजपाच्या बहुमताच्या जोरावर मंजुरी देण्यात आली. या योजनेसाठी सुमारे ६०० कोटी रुपयांचे कर्ज जागतिक बँकेकडून मिळणार असून, त्यासाठी करवाढीचा पर्याय सुचवण्यात आला आहे.

# ड्रग क्वीन अश्विनी पॉलला ५ कोटींच्या ड्रगसह अटक

■ टिटवाळा

**एएनसी** व कल्याण ग्रामीण पोलिसांची टिटवाळ्यात मोठी संयुक्त कारवाई करून ३५ वर्षीय ‘ड्रग क्वीन’ अश्विनी पॉलला अटक केली. मुंबईतील ड्रग प्रकरणात दोन महिन्यांपासून ती फरार होती. पद्मावती रॉयल इमारतीतील ७०५ क्रमांकाच्या रूममध्ये ती भाड्याने राहत होती. पोलिसांना याबाबत माहिती मिळताच घरावर छापा टाकला. तिच्या ताब्यातून ४०५६ एमडी (एक्स्टेसी) गोळ्या जप्त करण्यात आल्या असून, त्याची किंमत अंदाजे ५ कोटी रुपये आहे

नेस्को प्रकरणानंतर पार्टी ड्रगमध्ये असलेल्या तस्करांच्या मुसक्या आवळण्यास पोलिसांनी सुरुवात केली आहे. साकीनाका येथील कारवाईनंतर मुंबई पोलिसांनी काल टिटवाळा येथे कारवाई केली. एका घरामध्ये छापा टाकून पोलिसांनी अश्विनी पॉलला अटक केली. तिच्याकडून सुमारे पाच हजार एक्स्टसी ड्रग गोळ्या पोलिसांनी हस्तगत केल्या. पॉल ही पार्टी ड्रगची मोठी पुरवठादार असल्याचे पोलीस तपासातून उघडकीस आले आहे.

# उकाडा वाढताच वीजबिलेही वाढली! उरणकर दुहेरी संकटात


■ उरण

**उरण** तालुक्यासह रायगड जिल्ह्यात एप्रिलच्या सुरुवातीपासूनच उष्णतेचा तीव्र तडाखा जाणवत आहे. दिवसभर कडक उन्हामुळे नागरिक हैराण झाले आहेत. रात्रीही उकाडा कायम असल्याने झोपेचा त्रास होत आहे. उष्णतेपासून बचावासाठी एसी, कुलर आणि पंख्यांचा वापर वाढला आहे. त्यामुळे वीज वापरात वाढ होऊन वीजबिलेही जास्त येऊ लागली आहेत.

दुपारच्या वेळेत रस्ते ओस पडत आहेत. नागरिक घराबाहेर पडणे टाळत आहेत. घरात राहूनही उष्णतेपासून सुटका होत नसल्याने विद्युत उपकरणांचा वापर वाढत आहे.

मार्चपासूनच वीज वापर वाढल्याने अनेकांना जास्त बिलांचा फटका बसत आहे. त्यामुळे घरगुती खर्चाचे नियोजन बिघडत असल्याचे चित्र आहे. दरम्यान, कुलर, पंखे आणि ग्रीन नेट यांसारख्या साधनांच्या किमतीतही वाढ झाली आहे.

# नवाकाळ शब्दकोडे-१५८२



**आडवे शब्द –**

१. मंगळ ग्रह ४. मे महिन्यात घरोघरी होणारे मिष्टान्न ७. बहिष्कार घालणे १०. मुंगूस, महाभारतातील सहदेवाचा सख्खा भाऊ ११. निर्धास्त १२. धांदोट्या, चिंध्या १४. अधीन, ताब्यात आलेला १५. अशुद्ध रक्तवाहिनी १६. चहा-कॉफीचा कप १७. पैसेवाला १८. ताकद, शक्ती १९. महान, मोठा २१. खरबरीत २२. अरविंद केजरीवाल यांच्या पक्षाचे थोडक्यात नाव २३. पोरकट २४. फिकीर, पर्वा २६. भुईसपाट २८. सर्प २९. भोजन ३०. समुद्र ३१. मऊ रेषेदार कापड, या कापडापासून उंची पडदे व गालीचे बनवतात ३२. रगडणे, निर्दालन करणे ३४. पोपट ३६. सावकार ३८. रमलेला ४०. वाया, व्यर्थ ४०अ. युनानी औषधोपचार करणारा ४२. ढोंग ४४. झुंजार ४५. ताजा वाटाणा ४७. व्याकूळ ४८. कट्टर, जहाल ५०. कौरवांची राजधानी ५१. पाणी, जल, डोशाचा एक प्रकार ५३. मसालेदार व तिखट ५७. गाढव ५८. मुलींची लोंबती कर्णभूषणे ६०. सोटा ६१. घुंगरू, पैंजण ६३. इस्टेट, जायदाद ६५. सहस्र ६९. पर्वत ७०. पद्धत ७१. घाबरट मुलांना या नावाने चिडवतात ७५. मायभूमी ७७. तांडा, समूह ७९. लकडा, आग्रह ८०. आघाताची त्वचेवर उठलेली खूण ८१. श्वासोच्छ्श्वास ८३. चप्पल ८४. मिष्टान्नाला सुगंध देणारा प्रसिद्ध काश्मिरी जिन्नस ८६. आवड ८८. बाण ८९. सोबत ९०. सौम्य चवीचे ९२. फसवणूक ९४. वृक्ष, तरू ९५. भव्य, मोठे ९६. जुने व कडवे शत्रुत्व ९९. मांसाहार १००. सोंग आणणे, सतत सबबी सांगणे १०१. सलामी

**उभे शब्द –**

१. माहूताचे छोटे आयुध २. कपोल ३. तांडा, गणगोत ४. पाठबळ, टेकू ५. छान, भारी ६. अखंडित, विनाव्यत्यय ७. भरपूर, मोजमाप नाही असे ८. पिच्छा पुरवणे ९. अल्प, थोडे १०. नुकतेच जन्मलेले १३. तांब्या १५. ढग १६. आश्रम १८. बैल २०. इंग्रजी सहावा महिना, निबर २१. उचित २२. अतिशय स्वार्थी २५. अमली २६अ. शेवटची रास, मासा २७. दूध काढणे २८. शर्करा ३२. त्वचेवर लावण्याचे औषध ३३. गाव ३४. पाठीमागे लागलेली कटकट ३५. स्त्रियांचा दंडावर घालण्याचा अलंकार ३७. धनुष्य ३९. वेष्टन ४०अ. युद्धाच्या वेळी शिवाजी महाराजांचे मावळे ही घोषणा देत ४१. टीका, टिप्पणी ४३. पार्वती ४६. फौंटनपेनआधी वापरली जाणारी लेखणी ४८. शेळीचे पिल्लू ४९. गुणवान ५२. एक लवचिक पदार्थ ५३. फ्रॉक ५४. कुर्ता ५५. काया ५६. आगीचे लक्षण, धूम्र ५७. दुष्ट ५९. चंचल स्वभावाचा ६२. शेपूट ६३. रस्ता ६४. अभिप्रेत नसलेला ६६. ज्ञाती ६७. उणीव ६८. देवी ७१. सुमार, टुकार ७२. उसाच्या रसापासून केलेला पदार्थ, हा ढेपेच्या आकारात विकला जातो ७३. देव ७४. अपमान ७६. सोक्षमोक्ष, खातरजमा ७८. उपासमार होणे ८२. कष्टपूर्वक, जेमतेम ८५. वर्षगणनेचा एक प्रकार ८७. पर्यटन ८८. शंभर ९१. संताप ९३. गूढ, खोल ९५. जहर ९५अ. ओठ हिंदीत ९६. मक्केची यात्रा करून आलेला ९७. कायदेशीर ९८. देवापुढे जाळला जाणारा धूपासारखा सुगंधी पदार्थ •

**नवाकाळ कोडे क्रमांक १५८१ चे उत्तर**

**आडवे शब्द** : २. हपापलेला ५. साम ७. पोट ८. वाहणे १०. गंडांतर ११. पिठीसाखर १२. पांढरा १४. अनिकेत १५. कावड १७. मरीच १८. तबलजी २१. रसा २४. सवय २६. तप २९. लग्नसराई ३०. बाही ३३. तपासनीस ३७. पुळका ३८. गत्यंतर ४०. समरगीत ४२. व्यथा ४३. मका ४५. कळी ४६. देश ४८. उग्र ५०. पाकीटमार ५४. शरमिंदा ५५. मवसर ५६. कथा ५७. अंगरक्षक ५९. सिनीवाली ६०. दडस ६२. कर ६३. वेगवान ६५. स्पर्श ६७. हिवताप ७०. डर ७१. ताठा ७३. लप ७५. आवार ७६. दवा ७९. रजत ८१. तट ८२. अपरूप ८४. रजतजयंती ८७. वाकस ९०. वन ९२. वारसा ९४. कुलीन ९६. सभा ९७. पुळी १००. सारमेय १०१. धाबळी १०२. टणत्कार १०३. कलम करणे १०४. तयार १०५. थकवा

**उभे शब्द** : १. सुगंधित २. हतबल ३. पार ४. लेखनिक ५. साठी ६. मसाज ७. पोरका ८. वाढ ९. हराम ११. पितर १२. पांडव १३. तीच तूही कामिनी १६. वसई १९. बक २०. जीत २२. सालस २३. बासरी २५. यश २७. पत २८. कस ३०. बाळ ३१. बांगला देश३२. खतरा ३४. पायथा ३५. नीरस ३६. हरळी ३७. पुतना ३९. चमकी ४१. मकर ४२. व्यग्र ४४. काटकसर ४७. शर ४८. उदासीनता ४९. आवली ५०. पारदर्शक ५१. माथा ५२. जगज्जेता ५३. भक्षक ५५. मवाळ ५८. करणी ६१. वहिवाट ६३. वेडसर ६४. गर ६८. वर ६९. पदपथ ७२. गाज ७४. परिसर ७५. आतडे ७७. वारू ७८. पतन ७९. रती ८०. तवा ८३. पदभार ८५. जवळीक ८६. यंदा ८८. कवायत ८९. शैली ९१. पारणे ९३. साधार ९४. कुळीथ ९५. नटवा ९६. सत्कार ९८. प्रेम १००. सार

# 'नारीशक्ती'साठी १ कोटी सह्या! फडणवीसांची घोषणा

पान १ वरून

भारतातील समाजसुधारकांच्या विचारांवर केलेले तांडव होते. महिलांच्या अधिकारांची अशाप्रकारे भ्रूणहत्या होत असेल तर त्याविरोधात लोकशाहीत निश्चित जनमताचा रेटा तयार केला जाईल. आपण महिलांचा सामना करू शकणार नाही असे ज्या दिवशी वाटेल, त्या दिवशी हे राजकीय पक्ष वठणीवर येतील. महिला आरक्षण विधेयकाला मान्यता देतील. त्यासाठी महायुतीतील सर्वच घटक पक्ष जनमत तयार करण्याचे काम करतील. आम्ही महिलांना संघटित करण्याचे काम करू. या विधेयकाच्या समर्थनार्थ महाराष्ट्रातील १ कोटी महिलांच्या सह्या गोळा केल्या जातील. त्याचबरोबर तालुका पातळीपर्यंत मोठ्या प्रमाणात जनजागृती केली जाईल. भाजपाने यासंदर्भातील मेळावा आयोजित केला आहे. या मेळाव्यात सर्व पक्ष महिलांमध्ये जनजागृती करून महाराष्ट्रात काँग्रेस, शरद पवार गट आणि उबाठाचा चेहरा उघडा करू. जनमताचा असा रेटा तयार करू की, विरोधकांना महिला आरक्षण विधेयक मंजूर करावेच लागेल. महिलांना जोपर्यंत आरक्षण मिळत नाही तोपर्यंत आम्ही स्वस्थ बसणार नाही.

ते पुढे म्हणाले की, १९७६ मध्ये देशात डीलिमिटेशन झाले होते, तेव्हा घटनादुरुस्ती करून असा निर्णय घेण्यात आले की, १९७१ ची लोकसंख्या गोठवून २००० सालापर्यंत डीलिमिटेशन होणार नाही. २००२ साली डीलिमिटेशन कमिशन अस्तित्वात आले. तेव्हा महाराष्ट्रासह दक्षिणेतील राज्यांवर अन्याय होऊ नये यासाठी तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी डीलिमिटेशनला पुन्हा २० वर्षांची मुदतवाढ दिली. त्यानंतर २००२ मध्ये १९७१ च्याच लोकसंख्येवर आधारित राज्यांत डीलिमिटेशन झाले. त्यामुळे देशातील एकूण लोकसभेच्या जागांमध्ये कोणताही बदल झाला नाही. परंतु २०२३ साली महिला आरक्षणासाठी घटनादुरुस्ती झाली. त्यावेळी जनगणना व डीलिमिटेशन या दोन्ही गोष्टी पूर्ण करून हे विधेयक लागू करण्यात येईल अशी घटनादुरुस्ती करण्यात आली. याचा अर्थ परवा जे विधेयक मांडले ते काही अचानक मांडलेले नाही. २०२३ च्या घटनादुरुस्तीवेळी असे वाटत होते की, जनगणना पूर्ण होईल. पण कोविडमुळे जनगणना २०२७ मध्ये पूर्ण होणार आहे. लक्षात घेता २००२ मध्ये सुरू झालेली डीलिमिटेशनची प्रक्रिया २००८ मध्ये संपली होती. त्यामुळे २०२७ मध्ये डीलिमिटेशनची प्रक्रिया सुरू झाली असती तर महिला आरक्षण २०२९ मध्ये लागू झाले नसते. त्यामुळे सरकारने २०२३ च्या निर्णयाला अनुरूप यावेळी डीमिलिटेशन करण्यासाठी सरकारने विधेयक मांडले होते.

**महायुतीचा आज जनआक्रोश मोर्चा**

महिला आरक्षण विधेयकाच्या समर्थनार्थ महायुती उद्या जनआक्रोश मोर्चा काढणार आहे. जांबोरी मैदान ते वरळी डोम असा हा मोर्चा होणार असून त्यानंतर वरळी डोममध्ये जाहीर सभा होईल. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह महायुतीचे प्रमुख नेते उपस्थित राहणार आहेत.

देवेंद्र फडणवीस यांच्या पत्रकार परिषदेनंतर खा. सुप्रिया सुळे यांनी पत्रकार परिषद घेऊन भाजपाच्या टीकेला उत्तर दिले. त्या म्हणाल्या की, मुख्यमंत्री संसदेतील चर्चासत्रात नव्हते. विधेयकात झालेले दोन-तीन बदल झालेले आहेत. ही क्रमवारी माहीत असली पाहिजे. त्यावेळेस असे ठरले होते की, मतदारसंघ फेरफार आणि जनगणना या दोन्ही गोष्टींची चर्चा विधेयकात आहे. पण जनगणना कुठली? भारत सरकारने शब्द दिला होता की, जनगणना करणार. त्यानंतर मागणी झाली की, जात जनगणना करा. मात्र जातीय जनगणनेसाठी सरकारकडून पैसे देण्यात आलेले नाहीत. जात जनगणना वेळेवर का सुरू केली नाही? कारण त्यांच्याकडे हे करण्याची इच्छाशक्ती नाही. मला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून जास्त अपेक्षा होत्या. कारण देवेंद्र फडणवीस हे सुशिक्षित, हुशार आहेत. एनडीएतील सर्व पक्षांनाच एकच नोट ब्रिफिंग दिले जाते. त्यामुळे सगळे त्या मुद्यावर एकाच सुरात बोलतात. महिला आरक्षण विधेयक हे २०२३ मध्येच मंजूर झाले आहे, हे देवेंद्र फडणवीस यांना २ हजार टक्के माहिती आहे. पण दिल्लीवरून त्यांना नोट आली किंवा दबाव आला असेल की, पक्षाची हीच लाईन लावून धरा. त्या पुढे म्हणाल्या की, डिलिमिटेशन आणि महिला आरक्षणाचा संबंध काय? अधिवेशनाआधी अनेक गोष्टी आम्हाला सांगण्यात आल्या, मग त्या विधेयकात का आल्या नाहीत? ५४३ जागांमध्ये महिला आरक्षण द्या. आम्ही त्याचा विरोध कधीच करणार नाही. महिला आरक्षणाला आमचा विरोध नाहीच. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत या विषयाच्या संदर्भात चर्चा करायला मी तयार आहे. त्यांनी जागा आणि वेळ सांगावी.

काँग्रेसच्या खा. प्रणिती शिंदे यांनी असाच सूर लावत म्हटले की, महिला आरक्षणाच्या नावाखाली संसदेचे अधिवेशन हे भाजपाचे सर्वात मोठे अपयश होते. त्यांनी महिलांच्या भावनांशी खेळून, त्यांचा वापर करून डिलिमिटेशन म्हणून हे विधेयक संसदेत मांडले. परंतु २०२३ मध्येच हे विधेयक सर्वानुमते मंजूर झाले होते. भाजपाने पश्चिम बंगाल आणि तामिळनाडू विधानसभा निवडणुकांसाठी देशाची अखंडता धोक्यात आणली. प्रत्येक निवडणुकीआधी त्यांचा जुमला, त्यांची लाडकी बहीण असते. मोदी आणि शहा यांचे नेहमीच नियोजन असते परंतु यावेळी ते पूर्णतः अपयशी ठरले. संसदेच्या पहिल्याच दिवशीच्या चर्चेत ते मागे हटले.

कारण विरोधकांनी हे महिला आरक्षण विधेयक नसून डिलिमिटेशन विधेयक असल्याचे स्पष्ट सांगितले. सरकारची दोन तृतीयांश बहुमताची तयारी नसताना त्यांनी हे विधेयक का मांडले? याशिवाय १७ एप्रिलच्या चर्चेआधी लोकसभेचे सेक्रेटरी जनरल आणि गृहमंत्री यांच्यात वाद झाल्याचेही मी ऐकले आहे. कारण त्यांना काहीतरी असंविधानिक बदल करायचा होता, अशी माहिती आहे. त्यांना आम्हाला महिलाविरोधी दाखवायचे होते. मात्र त्यामध्ये ते अयशस्वी झाले. त्यांना महिलांना आरक्षण द्यायचेच नाही.

# 'डीजीसीए'च्या उपमहासंचालकासह रिलायन्स अधिकारी लाचखोरीत अटक

पान १ वरून

दिल्लीतील चार ठिकाणी छापे टाकून सुमारे ३७ लाख रुपयांची रोख रक्कम, सोन्या-चांदीची नाणी आणि काही इलेक्ट्रॉनिक उपकरणे जप्त केली. रिलायन्स इंडस्ट्रीजच्या प्रवक्त्याने या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना म्हटले की, माथूर यांना सल्लागार म्हणून नियुक्त करण्यात आले होते. त्यांचा सहभाग असलेल्या कोणत्याही व्यवहाराची आम्हाला माहिती नाही. तसेच आम्ही अशा कोणत्याही अनधिकृत व्यवहाराला मंजुरी दिलेली नाही. या कारवाईवरून शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी डीजीसीएवर गंभीर आरोप केले आहेत. ते म्हणाले की, डीजीसीएच्या एअरवर्दीनेस विभागाच्या डेप्युटी डायरेक्टरला सीबीआयने अटक केली असून, एफआयआर दाखल झाला आहे. डीजीसीएमध्ये अनेक भ्रष्ट अधिकारी असल्याचे आम्ही वारंवार सांगत आलो आहोत, हे यामुळे सिद्ध झाले आहे. अटक झालेला तर छोटा मासा आहे, याहून मोठमोठे मासे या यंत्रणेत आहेत. लाच देऊन डीजीसीएमध्ये कामे होत असतील, तर लाच देण्यात व दलाली करण्यात पटाईत असलेला व्ही.के.सिंह याने दादांच्या अपघातासंदर्भातील कागदपत्रे कशाप्रकारे 'क्लीन अप' केली असतील, याचा अंदाज येतो. एकीकडे दादांच्या अपघाताचा तपास सीबीआयकडे देण्याची विनंती करून दोन महिने उलटले तरी सीबीआयने तपास हातात घेतला नाही. परंतु दुसरीकडे इथे सीबीआय स्वतः हून कारवाई करते, हे विशेष म्हणावे लागेल. कदाचित तेलगू देसमच्या मंत्रालयाला इशारा किंवा अप्रत्यक्ष संदेश दिला असावा. त्यामुळेच प्रादेशिक अस्मिता बाजूला सारून तेलगू देसमकडून डिलिमिटेशन संदर्भात केंद्र सरकारच्या आदेशांचे तंतोतंत पालन केले जात असावे.


**जाहीर सूचना**

येथे सूचना देण्यात येत आहे की, एकनारायणशर्मा उमापती आर्यल यांचा मुलगा गिरीश एकनारायणशर्मा आर्यल हा, भारतीय नागरिकीकरणासाठी भारत सरकारच्या गृह मंत्रालयातील सचिवांकडे अर्ज करीत आहे आणि ज्या कोणत्याही व्यक्तीला, सदर नागरिकीकरण का प्रदान केले जाऊ नये, याचे कोणतेही कारण ज्ञात असेल, त्या व्यक्तीने त्याबाबतचे वस्तुस्थितीदर्शक, स्वाक्षरीसह केलेले लेखी निवेदन सदर सचिवांकडे पाठवावे.

सही/-
गिरीश ई. आर्यल

**जाहीर नोटीस**

या जाहिरातीद्वारे असे सूचित करण्यात येते की न्यू आम्रपाली सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, बि. क्र. के – ८ /२०१, सूर्या कॉम्प्लेक्स, एम.एम.आर.डी.ए. वसाहत कांजूरमार्ग (प.), मुंबई– ४०० ०७८. या खोलीचे मूळमालक बिस्मिल्ला शहा यांनी आपली खोली पुष्पांजली पुंडलिक नाईक यांना २९/०४/२०१० रोजी विक्री केली आहे तरी आता नावावर करायचे असल्याने त्यांचा आम्ही शोध घेत आहोत. तरी या घरचे मालक बिस्मिल्ला शहा स्वतः किंवा यांचे वारस ही जाहिरात प्रसिद्ध केलेल्या तारखेपासून १५ दिवसाच्या आत रूम नंबर २०१ मध्ये येऊन संपर्क साधावे.

सही /–
पुष्पांजली पुंडलिक नाईक
जाहिरातदार

**महावितरण** — विज बंदबाबत जाहीर निवेदन

कल्याण पश्चिम विभागातील सर्व विज ग्राहकांना कळविण्यात येते की, २२ केव्ही दुर्गाडी उपकेंद्रातुन निघणाऱ्या **२२ केव्ही आधारवाडी** या वाहिनीवर देखभाल व दुरूस्तीच्या कामासाठी **दि. २१.०४.२०२६** रोजी **सकाळी ८.३० ते १३.३०** वाजेपर्यत खाली नमुद केलेल्या भागाचा विज पुरवठा बंद राहील याची कृपया नोंद घ्यावी. ग्राहकांच्या होणाऱ्या गैरसोईबद्दल महावितरण कंपनी दिलगीर आहे.

| अनु. क्र. | उपकेंद्र | फिडर | भागाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | २२ केव्ही दुर्गाडी | आधारवाडी | सोनवणे कॉलेज, चंदनशिवे नगर, वाडेघर गाव, स्पोर्ट कॉम्पलेक्स, माधव बँकेट हॉल, घोडके हॉल, लीला हॉटेल, विहंग व्ह्यू, अन्नपूर्णा नगर, आधारवाडी जेल, निक्की नगर, भागीरथी नगर, साकेत तसेच आसपासचा परिसर. |

कार्यकारी अभियंता, कल्याण पश्चिम विभाग


# भेंडवळच्या घटमांडणीचे भाकीत जाहीर

अमरावती-बुलडाणा सीमेवरील भेंडवळ येथे तपस्वी चंद्रभान महाराज वाघ यांनी सुमारे साडेतीनशे वर्षांपूर्वी ही परंपरा सुरू केली. आजही त्यांच्या वंशजांकडून ती जपली जात आहे. शेतात खड्डा करून त्यात मातीचा घट, त्यावर पाण्याची घागर आणि विविध खाद्यपदार्थ ठेवून, भोवती १८ प्रकारची धान्ये मांडली जातात. सकाळी त्यातील बदलांवरून वर्षभराचे पीक-पाणी, पाऊसमान आणि देशाच्या राजकीय-सामाजिक स्थितीचे भाकीत वर्तवले जाते.

पान १ वरून

पूरस्थिती निर्माण होऊन पिकांचे नुकसान होण्याची भीतीही आहे. पिकांबाबत कापूस, तांदूळ, तीळ आणि बाजरीचे उत्पादन चांगले राहील, असा अंदाज आहे. तर ज्वारी, तूर, मूग, उडीद, मटकी, जवस आणि वाटाणा ही पिके सरासरी राहतील. यंदा पिकांवर रोगराईचे प्रमाण वाढण्याची शक्यताही वर्तवण्यात आली आहे. घटावर ठेवलेली पुरी गायब झाली होती. पुरी ही पृथ्वीचे प्रतीक असल्याने पुरी गायब होणे हे भविष्यात येणाऱ्या मोठ्या नैसर्गिक आपत्तीची शक्यता आहे.


**बृहन्मुंबई महानगरपालिका**

इंजिनियरिंग हब बिल्डींग, तळमजला, वरळी नाकाजवळ, डॉ. ई मोझेस रोड, वरळी, मुंबई-४०००१८.

क्र. उप मु.अभि./२०५/वाहतूक दि. १७ एप्रिल, २०२६

**ई-निविदा सूचना**

बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त खाली दर्शविल्यानुसार कामाकरिता मोहोरबंद निविदा मागवित आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | प्रभाग | अंदाजित मूल्य रु. मध्ये | बोली क्र. | कंत्राटाचा कालावधी | ईएमडी रु. | निविदा मूल्य रु. मध्ये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | एम/पश्चिम प्रभागामध्ये जनरल अरुणकुमार वैद्य जलतरण तलाव येथे स्ट्रीट पे ॲण्ड पार्क योजनेवर चालविण्याकरिता निविदा, श्रेणी - 'ए', अनारक्षित श्रेणी. | एम/ पश्चिम | रु. ६४,८०,०००/- | २०२६_बृमुंमपा_१२१४६७३_१ | २ वर्षे | रु. १,२९,६००/- | रु. १५,९७२/- +१८% जीएसटी |

वरील बोलीकरिता, बोली सुरु होण्याचा दिनांकः २१.०४.२०२६.

अधिक तपशिलाकरिता बृमुंमपा पोर्टल (http://mahatenders.gov.in) वर लॉग ऑन व्हा.

सही/-
उप. मुख्य अभियंता (वाहतूक)

पीआरओ/१२०/जाही/२०२६-२७

रस्त्यावरचे उघड्यावरील अन्न पदार्थ, कापलेली फळे व पेय यांचे सेवन करू नये

**मे. मर्क इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड**

सिटी सर्व्हे नं. ९२ च्या क्षेत्रामधील भाग
प्लॉट नं. जी–१, एम.आई.डी.सी, महाकाली गुफा रोड,
अंधेरी (पूर्व), मुंबई – ४०००९३

**कामगारांसाठी जाहीर सूचना/नोटीस**

या जाहिरातीद्वारे कळविण्यात येते की, आम्ही मे. मर्क इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड, सिटी सर्व्हे नं. ९२ च्या क्षेत्रामधील भाग, जी–१, एम.आई.डी.सी, महाकाली गुफा रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई – ४०००९३ या ठिकाणी आहे. ही सदरील कारखान्याची जागा विकसित/विक्री/हस्तांतरण करण्याचे आम्ही प्रस्तावित करीत आहोत. या जागेचे एकूण क्षेत्रफळ २१४३ चौ. मी. आहे. मालमत्ता पत्रका प्रमाणे याचा सिटी सर्व्हे नं. ९२ च्या क्षेत्रामधील भाग, मुळगाव गाव आहे.

या नोटिशिद्वारे सूचित करण्यात येते की या आस्थापनेत किंवा या जागेत काम केलेल्या सर्व कायम कामगार/कर्मचारी, तात्परते, कंत्राटी तसेच प्रशिक्षणार्थी कामगाराची व संघटनेची/कामगारांच्या कायदेशीर देण्याबाबत, विवादाबाबत दावे/तक्रार जागेचे व्यवस्थापक व विकासकाविरुद्ध असल्यास कोणत्याही व्यक्तीच्या दावा/मागणी/अधिकार किंवा अशा प्रकारचा कोणत्याही हक्क असल्यास त्याबाबतची लेखी तक्रार वरील दिलेल्या पत्त्यावर कंपनी व्यवस्थापनाकडे किंवा कागदपत्रांच्या पुराव्यासहित कामगार उप आयुक्त पश्चिम मुंबई उपनगर पूर्व वांद्रे (पूर्व) यांचे कार्यालय, कामगार भवन, सी २०, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, ई ब्लॉक, बी. के. सी., वांद्रे (पूर्व), मुंबई – ४०००५१ व दूरध्वनी क्र. ०२२ २६५७२९३७ आणि ईमेल आयडी mahalabourcommr@gmail-com, यांच्याकडे जाहीर नोटीस/सूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत सादर करावी. या कालावधीनंतर दाखल केलेली तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही. त्यासंदर्भात आम्ही कायदेशीररित्या जबावदार राहणार नाही.

सही/–
मे. मर्क इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड
संचालक

स्थळ: अंधेरी (पूर्व), मुंबई
दिनांक: २१ एप्रिल २०२६

**जाहीर सूचना**

**ज्याच्याशी संबंधित असेल त्याच्याकरिता**

सर्वसाधारण जनता, सर्व संबंधित पक्षकार, संभाव्य खरेदीदार, बँका, वित्तीय संस्था, विकास आणि इतर सर्व व्यक्तींच्या याद्वारे निदर्शनास आणून देण्यात येते की, श्री. सुंदर शिवलिंगम नायडू, राहणार - कार्यालय क्र. १३-ए, एस. के. कब्बूर कंपाऊंड, व्हीव्हीएफ कंपनीशेजारी, सायन (पूर्व), मुंबई - ४०००२२ यांनी निम्न उल्लेखित मालमत्तेमधील वैध हक्क, शीर्षक आणि हितसंबंध संपादित केले आहेत.

श्री. सुंदर शिवलिंगम नायडू यांनी सदर हक्क, शीर्षक आणि हितसंबंध मालकांद्वारे (पाटील कुटुंब) त्यांच्या नावे योग्यरित्या बनविलेल्या जुलै, २०१३ मधील सामंजस्य करार, जुलै २०१३ मध्ये बनविलेल्या विकास करारपत्र, दिनांक १३ ऑगस्ट, २०१३ रोजीचे अपरिवर्तनीय सर्वसाधारण मुखत्यारपत्र, जुलै/ऑगस्ट २०१३ मधील अजून एक अपरिवर्तनीय सर्वसाधारण मुखत्यारपत्र, आणि दिनांक १९ डिसेंबर, २०१७ रोजीचे विक्री करारपत्र (साठेकरार) याद्वारे संपादित केले आहेत.

**मालमत्तेचे तपशील**

सदर मालमत्ता गाव दहिसर, तालुका बोरीवली, मुंबई उपनगर जिल्हा, सर्व्हे क्र. ३२७ (हिस्सा क्र. १ आणि २) आणि सर्व्हे क्र. ३२८ (हिस्सा क्र. ३, ५, ६, ७, ८ आणि ९), सुसंगत शहर सर्व्हे क्र. १४५९, १४५८, १४६७, १४६६, १४६५, १४६४, १४६० आणि १४६१ येथे स्थित कृषिक जमीन (यापश्चात "सदर मालमत्ता" असे उल्लेखित).

**जाहीर इशारा**

जनतेचे सर्व सदस्य, संभाव्य खरेदीदार, बँका, वित्तीय संस्था, विकासक आणि इतर कोणीही व्यक्ती यांना याद्वारे सक्त ताकीद आणि इशारा देण्यात येतो की, सदर मालमत्तेसह कोणतीही खरेदी, विक्री, गहाणवट, भाडेपट्टी, विकास, कोणताही तृतिय-पक्ष हितसंबंधाची निर्मिती किंवा कोणताही इतर व्यवहार रद्दबातल मानण्यात येईल आणि कोणताही हक्क, शीर्षक किंवा हितसंबंध प्रदान करण्यात येणार नाही. असा कोणताही व्यवहार हा संबंधित पक्षकाराच्या संपूर्ण जोखीम आणि धोक्यावर असेल आणि श्री. सुंदर शिवलिंगम नायडू अशा सर्व पक्षकारांविरुद्ध उचित कायदेशीर प्रक्रिया सुरू करतील.

कोणत्याही स्पष्टीकरण किंवा पुढील माहितीकरिता कृपया संपर्क करा:
ॲड. आशुतोष सिंग
मोबा. क्र.: ९१२०७ ३०४७५

# प.बंगाल-तामिळनाडूत प्रचाराच्या तोफा थंडावल्या



**नवी दिल्ली -** पश्चिम बंगाल आणि तामिळनाडूमधील विधानसभा निवडणुकांच्या प्रचाराची मुदत आज संपुष्टात आली. प.बंगालमध्ये २९४ सदस्यांच्या विधानसभेसाठी २३ आणि २९ एप्रिल असे दोन टप्प्यांत मतदान होणार आहे. येथे ममता बॅनर्जी यांचा सत्ताधारी तृणमूल काँग्रेस आणि भाजपामध्ये थेट सामना आहे. तर तामिळनाडूमध्ये प्रामुख्याने द्रमुक आणि भाजपाच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडी यांच्यात लढत आहे. येथे २३ एप्रिल रोजी एकाच टप्प्यात मतदान होणार आहे. तर दोन्ही राज्यांच्या निवडणुकीचा निकाल ४ मे रोजी लागणार आहे. २३ एप्रिल रोजी महाराष्ट्रातील बारामती आणि राहुरी विधानसभा मतदारसंघातही पोटनिवडणूक होणार आहे.

# बिहारमध्ये सम्राटपर्व

**दोन दशकाहून अधिक काळ बिहारचे मुख्यमंत्री राहिलेल्या नितीश कुमार यांनी भाजपाच्या रेट्यापुढे विनम्र होऊन राज्यसभा खासदार म्हणून शपथ घेतली आणि मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला. त्यानंतर लगेचच भाजपाचे नेते सम्राट चौधरी यांनी बिहारचे २४ वे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. राज्यात नितीश कुमार यांचा जनता दल युनायटेड आणि भाजपा यांचे युती सरकार आहे. नितीश कुमार हेच मुख्यमंत्री असतील असे जाहीर करून भाजपाने विधानसभा निवडणूक लढवली होती. राज्य विधानसभेत सर्वाधिक आमदार असलेला भाजपा हा नंबर १ पक्ष आहे. पण चार महिन्यांतच नितीश कुमार यांना राष्ट्रीय पातळीवर जाण्याची सूचना मित्रपक्षाकडून आली आणि नितीश कुमार यांना ती मान्य करावी लागली. बिहारमधे आता सम्राट पर्वाची सुरुवात झाली आहे.**

**२०१४ मधे** देशात मोदी पर्व सुरू झाल्यापासून दीड डझन राज्यात भाजपाने स्वबळावर किंवा मित्र पक्षाला बरोबर घेऊन सत्तास्थापन केली. आजवर बिहारमधे भाजपाचा कधी मुख्यमंत्री झाला नव्हता. हिंदी भाषिक प्रदेशात बिहार या मोठ्या राज्यात आपला मुख्यमंत्री नाही, ही भाजपाला सल बोचत होती. पण भाजपाने मोठ्या खुबीने नितीश कुमार यांना पाटण्यातून दिल्लीला नेले व मुख्यमंत्रिपदावर सम्राट चौधरींना बसवले. चौधरी हे काही मुळचे भाजपाचे नाहीत, ते संघ परिवारातील नाहीत, ते संघाचे स्वयंसेवक होते असे कधी कोणी सांगितलेही नाही. लालूप्रसाद यादव यांच्या राष्ट्रीय जनता दलात ते निष्ठावान कार्यकर्ते होते. नंतर नितीश कुमार यांच्या जनता दल युनायटेडमधे आले. त्यानंतर बिहारचा वेगाने विकास करण्यासाठी ते भाजपामधे आले. काही काळ जीतनराम मांझीच्या हिंदुस्थान आवाम पक्षात होते. राजद ते भाजपा, हिंआप व जनता दल मार्गे हा त्यांचा चार पक्षांतील राजकीय प्रवास एखाद्या कथा-कांदबरीसारखा आहे.

आठ वर्षांपूर्वी त्यांनी भाजपामध्ये प्रवेश केल्यानंतर कधी मागे वळून बघितले नाही. आपल्याला मुख्यमंत्रिपदाच्या सिंहासनावर भाजपाच नेऊ शकतो, हा त्यांना विश्वास होता.

बिहारमधील ज्येष्ठ समाजवादी नेते शकुनी चौधरी यांचे सम्राट हे पुत्र. आपल्या राजकीय प्रवासाची सुरुवात त्यांनी लालू यादव यांच्या राजदपासून केली. सम्राट चौधरी भाजपामधे आल्यापासून पक्षाने सतत त्यांच्यावर संघटनात्मक जबाबदारी देणे सुरू केले. भाजपामधे प्रवेश केल्यापासून त्यांच्या राजकीय करिअरचा आलेख सतत उंचावतच राहिला. वडील शकुनी चौधरींबरोबर ते अनेक वर्षे राजदमध्ये राहिले. नंतर नितीश कुमार यांच्या जनता दल युनायटेडमधे गेले. तिथे फारसे मन रमले नाही म्हणून ते जीतनराम मांझी यांच्या हिंदुस्तान



आवाम मोर्चात गेले. सन २०१८ मधे ते भाजपात आले. भाजपाचे दिवंगत उपमुख्यमंत्री सुशील मोदी यांनीच सम्राट यांना भाजपात आणले. त्यावेळी बिहारचे भाजपाचे प्रदेशाध्यक्ष नित्यानंद राय होते. नित्यानंद यांच्या टीममधे सम्राट यांच्यावर प्रदेश उपाध्यक्ष म्हणून जबाबदारी देण्यात आली. सन २०२० मधे राज्यात एनडीएचे सरकार स्थापन झाले तेव्हा सम्राट चौधरी यांचा पंचायतराज राज्यमंत्री म्हणून सरकारमधे समावेश झाला. २०२१ मधे एनडीएमधे फूट पडली, तेव्हा सम्राट यांच्यावर विधान परिषदेतील विरोधी पक्षनेता म्हणून पक्षाने त्यांच्यावर जबाबदारी सोपवली. विरोधी पक्षनेता म्हणून सम्राट यांनी प्रभावी कामगिरी केली. भाजपाने मार्च २०२३ मधे त्यांच्यावर बिहार प्रदेश अध्यक्षपदाची जबाबदारी सोपवली. सम्राट यांना चार राजकीय पक्षांचा दांडगा अनुभव. त्यांनी भाजपाचा राज्यात वेगाने विस्तार केला. राजद आणि महाआघाडीवर ते सतत घणाघाती हल्ले करीत. सुशील मोदी यांच्या निधनानंतर भाजपामधे राज्यात नेतृत्वाची पोकळी निर्माण झाली होती, ती सम्राट यांनी भरून काढली. २०२४ मधे निनतीश कुमार यांच्या नेतृत्वाखाली राज्यात एनडीएचे सरकार स्थापन झाले, तेव्हा उपमुख्यमंत्रिपद व सरकारमधील दोन क्रमांकाचे स्थान सम्राट यांना देण्यात आले. लोकसभा निवडणूक काळात तेच प्रदेशाध्यक्ष होते. बिहारमधून भाजपाचे बारा खासदार निवडून आले.

नोव्हेंबर २०२५ मधे झालेली विधानसभा निवडणूक पक्षाने सम्राट चौधरींच्या नेतृत्वाखाली लढवली. मतदारांना आकर्षित करणाऱ्या घोषणा सम्राट यांनीच केल्या. बिहारमधील

**- डॉ. सुकृत खांडेकर**

प्रशासनावरही सम्राट यांनी चांगली पकड निर्माण केली. विधानसभेत भाजपाचे सर्वाधिक म्हणजे ८९ आमदार निवडून आले. तरीही दिलेला शब्द पाळण्यासाठी भाजपाने नितीश कुमार यांना मुख्यमंत्रिपद दिले. मात्र सम्राट यांना उपमुख्यमंत्री करताना त्यांच्याकडे गृह खाते देण्यास भाजपाने नितीश यांना भाग पाडले. एनडीएच्या सरकारमधे गृहखाते उपमुख्यमंत्र्यांकडे असे कधी घडले नव्हते. एनडीएचे सरकार असले तरी मुख्यमंत्री, गृहमंत्री व विधानसभा अध्यक्ष ही तीन पदे भाजपा नेहमीच आपल्याकडे ठेवते. कारण त्या पदांवर सरकारचे भवितव्य अवलंबून असते.

सम्राट चौधरी हे बिहारमधे दबंग नेते म्हणून ओळखले जातात. सामदामदंडभेद सर्वांचा वापर करून सत्ता कशी खेचायची यात ते तरबेज आहेत. नितीश कुमार हे महाआघाडीचे मुख्यमंत्री असताना त्यांच्यावर सम्राट जोरदार प्रहार करीत असत. त्यांना सत्तेवरून हटविण्यासाठी त्यांनी एकदा अयोध्या येथे जाऊन मुंडनही केले होते. ५७ वर्षांच्या सम्राट चौधरींकडे संघटन कौशल्य आहे. भाजपाला बिहारमधे कोणी चेहरा नव्हता तो सम्राटच्या रूपाने मिळाला आहे. ते कोईरा जातीचे (कुशावह) आहेत. बिहारमधे ओबीसीमधे हा प्रभावी समाज आहे. १९९० मधे लालू प्रसाद यादव यांच्या राजदमधे प्रवेश करून त्यांनी सार्वजनिक जीवनात प्रवेश केला. त्यांचे वडील शकुनी हे मुंगेर जिल्ह्यातील तारापूर मतदारसंघातून सहा वेळा काँग्रेस, समता पार्टी किंवा राजदचे आमदार म्हणून निवडून आले होते. १९९९ मधे सम्राट हे आमदार म्हणून निवडून आले तेव्हा राबडी देवी यांच्या सरकारमधे कृषीमंत्री म्हणून त्यांचा समावेश झाला. वयाची तेव्हा पंचवीस वर्षे पूर्ण झाली नसताना ते आमदार-मंत्री कसे झाले, असा वाद निर्माण झाला व त्यातून त्यांचे मंत्रिपद गेले. २००० च्या निवडणुकीत ते पुन्हा आमदार म्हणून निवडून आल्यावर राजद सरकारमधे मंत्री झाले. २००५ मधे राजदचा पराभव झाला, पक्षाने त्यांची मुख्य प्रतोद म्हणून नियुक्ती केली. सन २०१४ मधे सम्राट चौधरी हे राजदच्या अकरा आमदारांसह बाहेर पडले आणि जीतनराम मांझी यांच्या सरकारमधे मंत्री झाले. मांझी यांना हटवून नितीश कुमार पुन्हा मुख्यमंत्री झाले तेव्हा मात्र सम्राट यांना मंत्रिपद गमवावे लागले.

सम्राट हे भाजपाचे पहिले मुख्यमंत्री आहेत आणि राज्यातील भाजपाचा ओबीसींचा शक्तिशाली चेहरा आहे. सन २०२९ च्या लोकसभा निवडणुकीची तयारी म्हणूनच भाजपाने पक्षातील निष्ठावंतांना बाजूला ठेऊन चार पक्ष फिरून आलेल्या आयाराम सम्राट चौधरी यांच्यावर मुख्यमंत्रिपदाची जबाबदारी दिली आहे. लालू प्रसाद यादव, राबडी देवी, नितीश कुमार यांचे गेली पस्तीस वर्षे बिहारवर वर्चस्व होते. बिहारमधे आपला मुख्यमंत्री देण्याची खेळी भाजपाने यशस्वी करून दाखवली आहे. पाच महिन्यांपूर्वी झालेल्या विधानसभा निवडणुकीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा तारापूर मतदारसंघात मतदारांना आवाहन करताना म्हणाले होते, सम्राट चौधरी यांना प्रचंड मताधिक्यांनी निवडून द्या, लवकरच तो खूप मोठा माणूस १होणार आहे.

# सरसंघचालक झेड प्लस सुरक्षेचा खर्च वसुलीची याचिका कोर्टाने फेटाळली

■ नागपूर

**मुंबई** उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांना पुरवण्यात येणाऱ्या 'झेड प्लस' सुरक्षेचा खर्च त्यांच्याकडून वसूल करण्याची मागणी करणारी जनहित याचिका फेटाळली. या प्रकरणात न्यायालयाने हस्तक्षेप करण्यास स्पष्ट नकार दिला. मुख्य न्या. चंद्रशेखर आणि न्या. अनिल किलोर यांच्या खंडपीठासमोर आज झालेल्या सुनावणीत हा निर्णय झाला.

नागपूरचे सामाजिक कार्यकर्ते ललन किशोर सिंग यांच्या याचिकेनुसार मोहन



भागवत यांच्या सुरक्षेवर दरमहा सुमारे ४० ते ४५ लाख रुपये खर्च होत असल्याचा दावा केला होता. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही नोंदणीकृत संस्था नसतानाही संघप्रमुखांना झेड प्लस सुरक्षा पुरवण्यात येत आहे. या सुरक्षेचा खर्च करदात्यांच्या पैशातून केला जात असल्याने सरकारी तिजोरीवर अनावश्यक भार पडतो. त्यामुळे हा खर्च संबंधितांकडून वसूल करावा. याचिकाकर्त्याने आपल्या दाव्याच्या समर्थनार्थ सर्वोच्च न्यायालयाच्या २०२३ मधील 'केंद्र सरकार विरुद्ध बिकाश साहा' प्रकरणाचा संदर्भ दिला होता.

# डोंबिवलीत लोकलचा डबा घसरला मध्य रेल्वेची वाहतूक विस्कळीत

■ डोंबिवली

**डोंबिवली** रेल्वे स्थानकात आज सकाळी रिकाम्या लोकलचा एक डबा रुळावरून घसरल्याने मध्य रेल्वेची वाहतूक विस्कळीत झाली. आठवड्याच्या पहिल्याच दिवशी घडलेल्या या घटनेमुळे कामावर निघालेल्या हजारो प्रवाशांचे हाल झाले. या कालावधीत कल्याणच्या दिशेने जाणाऱ्या धीम्या मार्गावरील सेवा काही काळ ठप्प झाली होती.

सीएसएमटीहून कल्याणकडे जाणारी रिकामी लोकल सकाळी सुमारे ८.३० च्या सुमारास डोंबिवली स्थानकातून मार्गस्थ होत असताना तिचा एक डबा रुळावरून घसरला. फलाट क्रमांक १ जवळील वळणदार मार्गावर ही घटना घडल्याने मोठा आवाज झाला. यामुळे स्थानक परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. डबा रुळावरून घसरल्यानंतर या मार्गावरील लोकल सेवा तातडीने थांबवली. डबा घसरलेल्या लोकलच्या मागे उभ्या असलेल्या अनेक गाड्या



जागच्या जागी अडकल्या. त्या लोकलमधील प्रवाशांनी डब्यांतून उतरून डोंबिवली, कोपर आणि इतर स्थानकांकडे जाण्याचा मार्ग स्वीकारला. यावेळी रूळांवर मोठी गर्दी झाली होती.

# आयपीएल संघमालकाची काळी जादू ललित मोदी यांच्या आरोपाने खळबळ

■ मुंबई

**आयपीएल** २०२६ हंगामात हैदराबाद-चेन्नई यांच्यातील सामन्यानंतर 'काळ्या जादू'च्या कथित प्रकारावरून नवा वाद निर्माण झाला आहे. या प्रकरणात आयपीएलचे माजी अध्यक्ष ललित मोदी यांनी समाज माध्यमावर प्रतिक्रिया देत भूतकाळात एका संघमालकाने अशा प्रकारात सहभाग घेतल्याचा दावा केला. मात्र, संबंधित संघ किंवा व्यक्तीचे नाव त्यांनी स्पष्ट केले नाही.

१९ एप्रिल रोजी हैदराबाद येथील राजीव गांधी आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम येथे झालेल्या सामन्यादरम्यान स्टँडमधील एका चाहत्याचा व्हिडिओ व्हायरल

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

झाला होता. या व्हिडिओमध्ये संबंधित चाहता 'लेमन ट्रिक' करताना दिसतो. त्यानंतर लगेचच चेन्नईचा फलंदाज शिवम दुबे बाद झाल्याने चर्चांना उधाण आले.

या वादानंतर चेन्नई सुपर किंग्सने बीसीसीआयला लिहिलेले तक्रारपत्र व्हायरल झाले. हे पत्र बनावट असल्याचे म्हटले जात आहे. ललित मोदी म्हणाले की, हे पत्र बनावट वाटत असले तरी यापूर्वी एका संघाचा मालक अशा प्रथेत सामील असल्याची माहिती मिळाली होती. २०११ च्या हंगामात विरोधी संघाच्या ड्रेसिंग रूममध्ये असाच प्रकार झाल्याची माहिती ठोस पुराव्यांसह मिळाली होती.

# स्वरसम्राज्ञी आशा भोसलेंच्या अस्थींचे गंगा नदीत विसर्जन

■ मुंबई

**भारतीय** संगीतविश्वातील अजरामर आवाज म्हणून ओळखल्या जाणाऱ्या



आशा भोसले यांच्या इच्छेनुसार त्यांच्या अस्थींचे आज वाराणसी येथील पवित्र गंगा नदीमध्ये विधिवत विसर्जन करण्यात आले.

आशा भोसलेंच्या निधनानंतर नवव्या दिवशी हा विधी पार पडला. वाराणसी येथील नमो घाटावरून त्यांच्या छायाचित्राने सजवलेल्या फुलांच्या बोटीतून अस्थिकलश नेण्यात आला. यावेळी एनडीआरएफच्या जवानांनी मानवंदना दिली. मणिकर्णिका घाटावर पोहोचल्यानंतर आशाताईंचे चिरंजीव आनंद भोसले यांनी विधिवत पिंडदान करून अस्थिविसर्जन केले. यावेळी कुटुंबियांसह आनंद यांची पत्नी अनुजा, मुलगी जनाई उपस्थित होत्या. तसेच राज्याचे सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार, योगेश खडीकर, स्थानिक आमदार अवधेश सिंह हेही उपस्थित होते.



वडाळा येथे दोन स्लीपर प्रवासी बसला भीषण आग लागली होती. त्यानंतर अग्निशमन दलाच्या जवानांनी शर्थीचे प्रयत्न करून आग विझवली. (छाया- दीपक साळवी)

# टीसीएस कंपनी प्रकरणी निदा खानच्या जामिनावर सोमवारी सुनावणी होणार

■ नाशिक

**नाशिकच्या** टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) या माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील दिग्गज कंपनीत महिलांचे शोषण आणि बळजबरीने धर्मांतर करण्याप्रकरणी एक संशयित निदा खान हिच्या अटकपूर्व जामीन अर्जावरील सुनावणी नाशिक जिल्हा आणि सत्र न्यायालयात आज पूर्ण होऊ शकली नाही. न्यायालयाने पुढील सुनावणी २७ एप्रिलला घेण्याचे निश्चित केले. मात्र तोपर्यंत निदा खानला अटकेपासून संरक्षण दिलेले नाही. त्यामुळे तिच्या डोक्यावर अटकेची टांगती तलवार कायम आहे.

टीसीएसमध्ये हे प्रकरण उघडकीस आल्यापासून निदा फरार आहे. ती या कंपनीत प्रोसेस असिस्टंट या पदावर काम करत होती. तिला अटक करण्यासाठी नाशिक पोलिसांची तीन पथके तिचा शोध घेत आहेत. काही दिवसांपूर्वी तिच्या मोबाईलच्या लोकेशनवरून ती मुंबईतील मुंब्रा या मुस्लीमबहुल भागात असल्याचे संकेत मिळाले होते. मात्र निदा अद्याप पोलिसांच्या हाती लागलेली नाही. आजच्या सुनावणीदरम्यान निदा खानच्या वकिलांनी आपल्याला बाजू मांडण्याची संधी दिली जावी, अशी विनंती न्यायालयाला केली. ती न्यायालयाने मान्य केली. आता पुढील सुनावणीदरम्यान निदा खानचे वकील, फिर्यादीचे वकील आणि सरकारी वकील अशा सर्वांचे युक्तिवाद ऐकल्यानंतर निदाच्या अटकपूर्व जामिनावर न्यायालय निर्णय देणार आहे.

# नरेंद्र मोदींच्या हस्ते उद्घाटन त्याआधी रिफायनरीला आग

■ जयपूर

**राजस्थानच्या** बलोत्रा जिल्ह्यातील पचपदरा येथील मोठ्या रिफायनरी संकुलात आज दुपारी अचानक

**अब्जावधी रुपयांचा तेलसाठा भस्मसात**

भीषण आग लागली. आग लागताच काळ्याकुट्ट धुराच्या लोटांनी संपूर्ण आभाळ व्यापून टाकले. महत्त्वाची बाब म्हणजे हा देशातील पहिला ग्रीन रिफायनरी प्रकल्प असून, उद्या पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते या प्रकल्पाचे उद्घाटन होणार होते. ही केवळ एक रिफायनरी नाही तर पेट्रोकेमिकल डेपो व रिफायनरी प्रकल्प आहे. आग लागल्याने ज्वलनशील पेट्रोलियम रसायनांचा भडका उडाला. त्यामुळे अवघ्या काही क्षणात आगीने भीषण रुप धारण केले. अग्निशमन दलाचे २० बंब आणि जवान आग आटोक्यात आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करत होते. आगीचे कारण समजू शकले नाही. या अग्निकांडात सुदैवाने जीवितहानी झाली नाही. मात्र अब्जावधी रुपयांचा तेलसाठा भस्मसात झाला.

# वारकरी संप्रदायातील घुसखोरांची यादी! लवांडेंवर गुन्हा दाखल

■ पंढरपूर

**वारकरी** संप्रदायात घुसखोरी केली असा आरोप करत काही महाराजांची नावे जाहीर केल्याप्रकरणी शरद पवार गटाचे प्रवक्ते विकास लवांडे यांच्या विरोधात पंढरपूरमध्ये गुन्हा दाखल झाला आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी वारकरी संप्रदायात प्रतिगामी विचारांच्या लोकांची घुसखोरी वाढत असल्याचे वक्तव्य केले होते. त्यांच्या या विधानानंतर राजकीय चर्चांना उधाण आले होते. त्याच पार्श्वभूमीवर लवांडे यांनी सोशल मीडियावर वारकरी संप्रदायात घुसखोरी केल्याचा आरोप करत २० जणांची यादी जाहीर केली होती. या यादीत अनेक संत-महंतांची नावे असल्याने ते आक्रमक झाले आहेत. आता वारकरी संप्रदायाच्या वतीने पंढरपूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, लवांडे यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.

# निष्ठावान सभासद असतील तर संस्था संपत नाही

## सहकारी संस्था कार्यकर्ता चर्चासत्रादरम्यान मंत्री शिवेंद्रराजे भोसलेंचे प्रतिपादन

■ सातारा

**आमचाही** कारखाना अडचणीत होता. सभासदांचे जर संस्थेवर प्रेम, विश्वास असेल तर काय होऊ शकतं याचे उदाहरण 'अजिंक्यतारा सहकारी साखर कारखाना' आहे. सभासदांचा संस्थेवर विश्वास, निष्ठा होती म्हणून संस्था पुन्हा एकदा मूळ पदावर येऊ शकली. जर सभासद संस्थेसोबत निष्ठेने असले तर संस्थेला कितीही अडचणी आल्या तरी ती कधीही संपू शकत नाही, असे प्रतिपादन



सहकारी संस्था कार्यकर्ता चर्चासत्राचा शुभारंभ करताना सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले, राज्य संघाचे अध्यक्ष आमदार प्रविण दरेकर, सातारा बँकेचे अध्यक्ष खासदार नितीन पाटील, आयोजक धनंजय शेडगे आदी मान्यवर उपस्थित होते.

सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी केले.

महाराष्ट्र राज्य सहकारी संघ व सातारा जिल्हा सहकारी बोर्डाच्या वतीने अद्ययावत सहकार प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन व सहकारी बोर्ड यांच्या वतीने आयोजित सहकारी संस्था कार्यकर्ता चर्चासत्राचा शुभारंभ आज सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले आणि महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचे अध्यक्ष आमदार प्रविण दरेकर यांच्या शुभहस्ते पार पडला. यात्प्रसंगी सातारा जिल्हा सहकारी बँकेचे अध्यक्ष खासदार नितीनकाका पाटील, उपाध्यक्ष अनिल देसाई, संचालक सुनील खत्री, कांचन साळुंखे, राज्य सहकारी संघाचे संचालक नंदकुमार काटकर, अनिल गजरे, पान २ वर